सप्टेंबर '७५
३ रूपये

# अर्थ



# नव्या वर्षाचे आर्थिक भविष्य

( राजकीय, औद्योगिक, व्यापारी, शेतकी, शेअर, सोने-बाजार इ. क्षेत्रांतील व्यक्तींना तसेच सर्वसामान्यांना मार्गदर्शक व उपयुक्त होतील असे भावी परिस्थितीचे अंदाज. )

हे भविष्य—

प्रोफेसर के. पी. क्षीरसागर

भूगोलविभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, ह्यांचेकडून शास्त्रीय व गणिती निकषांच्या आधारे 'अर्थ'करिता मुद्दाम तयार करवून घेतले आहे.

---

परमवीरचक्र मानकरी मेजर रामा राघोबा राणे, मेजर रेगे, सहकारनेते श्री. तात्यासाहेब कोरे, चित्रपटदिग्दर्शक विश्राम बेडेकर, नाट्यदिग्दर्शक भालबा केळकर, क्रीडापटु श्री. गेरॉल्ड हेडझर व रणजित भोसले ह्यांच्या मुलाखती व लेख.

अर्थचे आद्यसंपादक

**प्रो. वामनराव काळे ह्यांच्या हृद्य आठवणी.**

(१) प्रा. एस. आर. दारसनीस,
भूतपूर्व उपप्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज, पुणे.

(२) श्री. बा. काळे व अन्य परिचितांकडून.

(३) श्री. रा टिळेकर.

---

काही 'आश्वासित' लेख ह्या दिवाळीच्या मेजवानीत आयत्या वेळी सादर करण्यात येतील. वाचकांची व आमचीही उत्कंठा शिगोशीग वाढवावी अशी त्या लेखकांची इच्छा आहे !!

असा हा विशेषांक प्रसिद्ध झाल्यावर आठवड्यानंतर मागणी करूनही मिळणे कठीण होईल. त्याकरिता अगोदरच आपली प्रत राखून ठेवा. जाहिरातदारांनीही आपल्या व्यवसायाबद्दलची खास दिवाळीची जाहिरात द्यावी.

# 'अर्थ'चा दिवाळी विशेषांक नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध होत आहे

☆ नेहमीपेक्षा वेगळी सदरे

☆ चर्चा-संवाद ह्यांमुळे मजकुराला जिवंतपणा व रसरशीतपणा

☆ वर्षभर संग्रही ठेवण्याजोगी महत्त्वपूर्ण माहिती

☆ राजकारण–नेतृत्व, उद्योग–व्यवस्थापन, बँकिंग–व्यापार, शिक्षण–संशोधन, कृषि–सहकार, चित्रपट–नाट्य, कला व क्रीडा इत्यादी क्षेत्रांतील महाराष्ट्रातील मान्यवर व्यक्तींचे लेख व मुलाखती.

---

## ह्याशिवाय काही विशेष प्रयासाने लाभलेले लेख

(१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांचा 'अमृत' लेख.

(२) श्री. बा. मा. भिडे (महाराष्ट्र बँक) ह्यांची मुलाखत.

(३) प्रा. नी. वि. सोवनी ह्यांचा 'केन्सच्या अर्थशास्त्रावरील टीकात्मक निबंध.

(४) मराठी साहित्य (१९५१–१९७५) ह्या कालखंडातील लोकप्रियता व खप ह्यांच्या दृष्टीने मराठी–लेखन-प्रकाशन-व्यवसायाचा अभ्यास—
प्रा. स. शि. भावे, प्रा. भीमराव कुलकर्णी,
प्रा. मुकुंद महाजन व श्री. श्रीपाद जोशी

(५) पुणे ग्राहक-चळवळीचा परिचय.
सूर्यकांत पाठक

(६) डॉ. व्ही. पी. पेठे ह्यांचा हिंदू–मुस्लीम लोकसंख्येवरील अभ्यासपूर्ण लेख.

(७) 'जय संतोषी माँ' व 'पांडू हवालदार' ह्या चित्रांच्या निमित्ताने चित्रपटांच्या आर्थिक यशाचे रहस्य या विषयावर प्रकाश.

# अर्थ

आर्थिक विषयांच्या अभ्यासास प्राधान्य देणारे मासिक
दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होते.

संपादक : **प्रा. कमलाकर परचुरे**

वर्ष : पहिले — अंक : सहावा : सप्टेंबर ७५

किंमत : ३ रुपये — वार्षिक वर्गणी : ३० रुपये

क्रम : — पृष्ठ

| क्रम | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | आलोक | ... | १ |
| २. | प्रा. सौ. कुमुद पोरे | ... | ७ |
| ३. | प्रा. नी. वि. सोवनी | ... | ९ |
| ४. | प्रा. मा. ल. अंत्रे | ... | १६ |
| ५. | प्रा. प्र. वि. सोवनी | ... | २० |
| ६. | प्रा. एस्. एन्. माने | ... | २३ |
| ७. | डॉ. व्यं. सु. पाटणकर | ... | २७ |
| ८. | राजेंद्र पटवर्धन | ... | ३० |
| ९. | श्री. द. जळूकर | ... | ३९ |
| १०. | बाळकृष्ण दत्तात्रय कुलकर्णी | ... | ४१ |
| ११. | पुस्तक परीक्षण | ... | ४२ |
| १२. | वाचकांची पत्रे | ... | ४५ |
| १३. | श्री. वा. काळे | ... | ४८ |

# आलोक

## गुड बाय.......पौंड !

गेल्या चार वर्षांत आंतरराष्ट्रीय नाणेविषयक परिस्थिती फार अस्थिर झाली आहे. स्थिर विनिमयदरांच्या ऐवजी तरत्या विनिमयदरांचे धोरण बऱ्याच देशांनी स्वीकारले. डिसेंबर ७१ मध्ये, निरनिराळ्या देशांनी आपल्या चलनांची किंमत सोन्यात निश्चत करून देण्या–घेण्याच्या समतोलानुसार त्या दरात थोडासा बदल करण्याचे ठरविले. त्या वेळी भारताने १ पौंड = १८·९६७७ रुपये हा मध्यवर्ती विनिमयदर ठरवून त्याच्या आसपास बदलणाऱ्या फरकाची मर्यादा २¼ टक्केपर्यंत निश्चित केली. स्वातंत्र्य मिळाले तरी रुपयाचा संबंध पौंडाशीच ठेवण्यात आला होता. त्यानंतर १९४९ व १९६६ च्या अवमूल्यनाच्या वेळी रुपयाचा पौंडाशी असणारा संबंध तोडावा की काय असा प्रस्ताद आलेला होता. कारण विशेषत: १९६० नंतर भारताचा परदेशी व्यापार केवळ ब्रिटनशीच संबंधित राहिला नसून विविध देशांशी त्याची देवाणघेवाण वाढली आहे. १९७२ मध्ये ब्रिटनने पौंड तरंगता ठेवल्यापासून पौंड पेचात आला आहे. युरोपच्या नाणेबाजारात डॉलरची मागणी वाढल्यामुळे व पौंडाचे रुपांतर डॉलरमध्ये करण्याचीही प्रक्रिया सुरू झाल्याने पौंड डळमळीत झाला होता. नुकताच म्हणजे जून १९७५ मध्ये पौंड अस्थिर झाल्याने भारताने नित्याच्या व्यवस्थेत बदल न करता पौंडाचा दर १ पौंड = १८·८० रुपये असा निर्धारित केला. म्हणजे पौंड रुपयाच्या दृष्टीने स्वस्त झाला. मात्र पौंड व रुपया ह्यांचा संबंध तोडला गेला नाही. त्या वेळी असा तडकाफडकी बदल करून आपल्या जागतिक व्यापारातील ३० टक्के ब्रिटनशी चालणाऱ्या व्यापाराला बाधा येऊ नये म्हणून रुपया व पौंड हा पूर्वापार चालत आलेला संबंध टिकवण्याचे म्हणजेच 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचे धोरण आम्ही पत्करले.

नुकताच म्हणजे २४ सप्टेंबरला भारत सरकारने अखेर पौंडाशी असलेला संबंध तोडण्याचा निर्णय घेतला ही गोष्ट वास्तविक बरीच आधी व्हायला पाहिजे होती. अर्थात उशिरा का होईना; पण चांगलाच निर्णय घेतला गेला. ब्रिटनच्या पौंडाचे अमेरिकन डॉलरच्या संबंधात १९७१ ते ७५ ह्या अवधीत, एकूण २८·२ टक्क्यांनी अवमूल्यन झाले. पौंड–डॉलर विनिमयदर २३ सप्टेंबर १९७५ रोजी फारच घसरला. तेव्हा अशा डळमळीत पौंडाशी संबंध ठेवण्यापेक्षा रुपया आंतरराष्ट्रीय नाणेबाजारात स्वतंत्र करावा ह्या दृष्टीने २४ सप्टेंबर रोजी

पत्रव्यवहाराचा पत्ता : 'अर्थ' मासिक, ९०६ शिवाजीनगर, पुणे ४.

आपण हा निर्णय घेतला. १९७४–७५ च्या परदेशी व्यापारातील तुटीमुळेच आपण हे लक्षात घ्यावयास पाहिजे होते की पौंडाशी असणाऱ्या संबंधाने परदेशी व्यापारातील अपेक्षित फायद्यापेक्षा तोटेच जास्त होत आहेत. आमच्या वित्त-तज्ज्ञांना एखादी घटना घडण्याच्या आधी त्याचा योग्य तो अंदाज घेता येत नसावा किंवा पुरेशी हिंमत नसावी. कारण की घटना झाल्यानंतर त्या अनुरोधाने फक्त प्रतिक्रिया द्यावयाची एवढीच बचावात्मक भूमिका आपण घेतलेली आहे असे दिसते. जुलै १९७५ मध्येच स्टर्लिंग पौंडाच्या मूल्यात २७% घट झाली असता आपण रुपयाचे मूल्य फक्त वाढवले; मात्र पौंडाशी संबंध तोडला नाही. २४ सप्टेंबरला जो निर्णय घेतला गेला आहे तो निश्चित आत्मविश्वासपूर्ण आहे ह्यात शंका नाही.

ह्यापुढे रुपयाचा स्थिर विनिमयदर पौंडाशी बांधील राहणार नाही; तर तो एकाच वेळी डॉलर, मार्क, येन व पौंड ह्यांच्या एकूण समूहाशी ठरवला जाईल. दैनंदिन परिस्थितीनुसार रुपयाचा विनिमयदर तरता ठेवून आवश्यकतेनुसार बदलला जाईल. तथापी पौंड हा भारताचा इतर देशांच्या चलनाला सांधणारा दुवा राहीलच. तसेच रुपयाचा विनिमयदर पौंडाच्या प्रमाणात जाहीर केला जाईल. म्हणजे अप्रत्यक्षरीत्या रुपया–पौंड हा संबंध अनौपचारिकपणे चालू राहील.

पौंडाशी संबंध तोडल्यामुळे भारताच्या रुपयाचे मूल्य सुधारेल. तसेच आता नजीकच्या काळात अवमूल्यनाची भीती रहाणार नाही अशी अपेक्षा आहे. आपल्या रुपयाचे बाह्य मूल्य वास्तविक पहाता, भारतातल्या अंतर्गत आर्थिक परिस्थितीनुसार बदलते ठेवले पाहिजे; पण आतापावेतो ब्रिटनमध्ये झालेल्या घडामोडींनुसार त्यांच्या पौंडाच्या बाह्य मूल्यात बदल झाले की आपण तसेच इकडे करत असू.

ही गोष्ट कोणत्याच दृष्टीने योग्य व सुसंगत ठरत नाही. ऑगस्ट ७४ ते ऑगस्ट ७५ ह्या एकाच वर्षात तुलना केल्यास असे आढळेल की पश्चिम युरोपातल्या देशांत भाववाढ होत असता व भाववाढीचे तिकडील दरवर्षीचे प्रमाण ८ टक्के असून तसेच ब्रिटनमधील त्याच अवधीतील भाववाढ ३० टक्के असता व भारतातल्या किमतींचा निर्देशांक उतरत असता, आपल्या रुपयाचे बाह्यमूल्य मात्र त्या प्रमाणात वाढले नाही. असो.

आता रुपया स्वतंत्र झाल्यामुळे भारतातल्या किमतींची पातळी स्थिर ठेवण्याची आपली जबाबदारी वाढली आहे. तसेच आयात–नियंत्रण व निर्यात–वाढ ह्यावर आपल्याला भर द्यावा लागेल. वित्तमंत्रालयाकडून जे निवेदन दिले गेले आहे त्यात सध्याचा हा निर्णय, संक्रमणावस्थेतील असून तात्पुरता आहे असे सूचित केले आहे. म्हणजे अजूनही आपली अशी समजूत आहे की जग तरत्या विनिमयदरांकडे पुन्हा एकदा झुकेल; पण अमेरिकेच्या कोषागाराचे सचिव श्री. विल्यम सिमॉन ह्यांना तशी शक्यता दिसत नाही. तरत्या विनिमयदरांमुळे विविध देशांचे परदेशी देण्याघेण्याचे प्रश्न सोडवणे सोपे झाले असल्यामुळे १९५० पूर्वीचे जागतिक चलनविषयक धोरण जे एकदा मागे पडले ते जवळजवळ भूतकाळात आता जमा झाले असा जगातील वित्त–तज्ज्ञांचा कयास आहे.

## यूनोचे खास अधिवेशन

८ सप्टेंबर रोजी यूनोचे सातवे खास अधिवेशन भरले होते. ह्यात जागतिक अर्थकारणात सुधारणा करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय झाला. आतापर्यंत 'तिसऱ्या जगातील' (अविकसित) ७७ भिन्न राष्ट्रांचे प्रतिनिधी, तसेच युरोपीय आर्थिक कुल ह्यांच्या प्रतिनिधींनी आपल्या सूचना मांडल्या आहेत. अमेरिकन सरकारच्या वतीने पुढील सूचना मांडण्यात आल्या आहेत. (१) विकसनशील देशांचे निर्यात उत्पन्न वाढण्याकरता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमार्फत काही सुरक्षा–सवलती मिळाव्यात. (२) जगातील महत्त्वाच्या वस्तू उदा. तांबे इ. ह्यांच्या ग्राहक–उत्पादक ह्यांचे परस्पर सहकार्य वाढविण्याकरता संघटना उभाराव्या. (३) खाजगी क्षेत्रातील भांडवल विकसनशील देशातील उद्योगधंद्यांत गुंतवणुकीसाठी उपलब्ध करण्याकरता 'आंतरराष्ट्रीय गुंतवणूकनिधी' निर्माण करावा. (४) सध्याचे आंतरराष्ट्रीय वित्तमहामंडळाचे भांडवल चौपट वाढवावे व त्यातून अविकसित देशांना मदत उपलब्ध करावी. (५) कच्चा माल व इतर साधनवस्तूंचे उत्पादन वाढविण्याकरिता विशेष प्रयत्न केले जावेत. (६) विकसित देशांनी अविकसित देशांतील भांडवली संस्थांचा विकास करण्याकरता तांत्रिक सल्ला व तज्ज्ञांचा पुरवठा करावा. (७) आंतरराष्ट्रीय दर्जा संशोधनसंस्था स्थापण्यात यावी. (८) १९८५ पर्यंत जागतिक अन्नटंचाई नाहीशी करण्याकरता आंतरराष्ट्रीय सहकार्य व संशोधन ह्यांचा फायदा अविकसित देशांना उपलब्ध करावा.

## भारत व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (I M F)

तेलाच्या किमती ह्याच महिन्यात वाढत असल्याकारणाने भारताला परदेशी देण्या–घेण्यात चालू वर्षी सुमारे १०० कोटी

रुपयांची तूट वाढेल. ती तूट भरून काढण्याकरता भारताने नाणेनिधीकडे २० कोट एस्. डी. आर्. चे कर्ज मागितले होते. नाणेनिधीने ते मंजूर केले आहे. मागल्या वर्षी भारताने तितक्याच रकमेचे कर्ज घेतले होते; पण त्या वेळच्या विनिमय-दराप्रमाणे १९५ कोट रुपये ह्याच कारणाकरता उपलब्ध झाले होते. ह्या उचलीवर सरासरी ७३/४ टक्के व्याज आकारण्यात येईल.

## हिऱ्यांच्या खाणी

भू-शास्त्रीय सर्वेक्षण मंडळाचे संचालक डॉ. एस्. एन्. सेन ह्यांनी एक नुकतेच निवेदन दिले. त्यावरून असे समजते की, कृष्णा-खोऱ्यात तसेच पन्ना येथील सध्याच्या खाणींजवळ हिऱ्यांचे साठे असलेले निद्रिस्त ज्वालामुखी आहेत. ह्या नव्या साठ्यांबद्दलचे प्राथमिक संशोधन आता पूर्ण झाले आहे.

## सिंगापूर

सिंगापूरचे परराष्ट्रमंत्री श्री. एस्. राजरत्नम् ह्यांनी सिंगापूरमधील चिनी लोकांना अशी विनंती केली आहे की त्यांनी सिंगापूर हाच आपला मायदेश समजावा. सिंगापूरच्या एकूण लोकसंख्येपैकी ८०% लोक चीनी आहेत. चीनने आतापर्यंत सिंगापूरमध्ये आपला वकील पाठवला नव्हता. चीनने आपला राजनैनिक प्रतिनिधी पाठविण्याची इच्छा नुकतीच व्यक्त केली आहे. तेव्हा ह्या वकिलातीमुळे चिनी लोकांनी सिंगापूरच्या-बद्दलची राष्ट्रनिष्ठा भंग पावेल असे कोणतेही कृत्य करू नये असा इशारा त्यांनी दिला आहे.

## उपग्रह दूरदर्शन

१ ऑगस्टला प्रधानमंत्र्याच्या एका छोटयाशा भाषणाने 'उपग्रह-दूरदर्शना'चे उद्घाटन झाले. त्या दिवशी सहा भिन्न राज्यातील हजारो टेलेव्हिजन सेटवर संध्याकाळी ठीक ६ वाजून २० मिनिटांनी 'उपग्रह दूरदर्शन' हे शब्द ऐकविण्यात आले. त्यानंतर ११ मिनिटांचे प्रधानमंत्र्यांचे भाषण पहायला मिळाले. जमिनीपासून ३६००० किलोमीटर अंतराळात असलेल्या उपग्रहांची (ATS-6) ह्याकरता मदत घेण्यात आली. डॉ. विक्रम साराभाई ह्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने जे अविरत प्रयोग केले त्याचे हे एक फळ होय.

## थायलंड

थायलंडकडून चीनने २ लक्ष टन तांदूळ खरेदी करण्याकरता नुकताच एक करार केला. ह्यावर्षी चीनमध्ये तांदुळाचे उत्पादन नेहमीपेक्षा जास्त आहे व चीनने तांदुळाची निर्यातही केली आहे; पण थायलंडमध्ये तांदुळाचे उत्पादन जास्त झाल्याकारणाने व त्याला स्थानिक बाजारात पुरेशी मागणी नसल्यामुळे, ह्या करारामुळे थायलंडला स्थानिक बाजारात किंमती स्थिर करण्याकरता व परदेशी चलन मिळण्याकरता एक प्रकारची मदतच झाली आहे. अमेरिकेने ५ लक्ष टन तांदूळ, आशियातील बाजारात विशेषत: कंबोडिया व दक्षिण व्हिएतनाममध्ये देऊ केल्यामुळे थायलंडमध्ये तांदुळाच्या किंमती घसरू लागल्या होत्या. गेल्या आठवड्यात टनामागे किंमती ६२५ डॉलरवरून ३५० डॉलरपर्यंत खाली आल्या. सिंगापूर-मध्ये २०० डॉलर टन ह्या भावाने तेथील व्यापाऱ्यांना अमेरिकेने तांदूळ विकला. १९७४ मध्ये ३ लक्ष टन तांदुळाचे साठे थायलंडमध्ये विक्री अभावी शिल्लक राहिले होते. चीनने हे सहाय्य देण्याचे कारण नुकतीच थायलंडचे पंतप्रधान कुक्रीत प्रमोज ह्यांनी चीनला भेट दिली होती. चीनकडून थायलंडला क्रूड व डिझेल, तसेच इतर वस्तू आयात करता येतील. चीन त्याच्याजवळील जास्तीचा तांदूळ ब्रह्मदेश व श्रीलंकेला पुरवित असतो. थायलंड व लाओस ह्यांच्यामधील राजनैतिक संबंधातील तणाव फारच वाढले असून थायलंडच्या व्यापारी दूतावासांवर लाओसमध्ये बंदी घालण्यात आली आहे. 'बँकॉक डेली' ह्या पत्रावरही बंदी घालण्यात आली आहे. लाओसमधील फौज वाढत असल्याकारणाने थायलंडला चिंता वाटत आहे.

## कुवेत

कुवेतच्या मध्यवर्ती बँकेच्या अहवालावरून असे दिसते की चालू वर्षाचे तेलाचे उत्पन्न ८१० कोटी डॉलर असून मागील वर्षापेक्षा ते तिप्पट झाले आहे. एकूण सरकारी उत्पन्न ८८५ कोटी डॉलर आहे. म्हणजे एकूण सरकारी आय-रकमेपैकी ९० टक्क्यांहून जास्त केवळ तेलाच्या निर्यात उत्पन्न व त्यावरील करां-

मुळे जमा झाले आहेत. कुवेतच्या दिनारचे बाह्यमूल्य चालू वर्षी ४.८ टक्क्यांनी वाढले आहे.

## सौदी अरेबिया

सौदी अरेबियाचे तेलमंत्री शेख अहमद झाकी यामाणी ह्यांनी रोम येथे पत्रकारांना नुकतीच मुलाखत दिली. ओपेकची सदस्य राष्ट्रे- ऑक्टोबरनंतर अजूनही३५ टक्क्यांनी तेलांच्या किंमती वाढवणार आहेत असे त्यांनी सांगितले. किंमत वाढवण्याम अनुकूल असणारी सदस्य राष्ट्रे म्हणजे इराण, व्हेनिझुएला, इक्वेडोर, अल्जेरिआ, इराण, गबन व लिबिया. ज्याप्रमाणे जगातील बड्या राष्ट्रांकडून आम्ही किंमती वाढवून घेतो हे ठीक त्याचप्रमाणे ओपेकच्या सदस्यांनी जागतिक अर्थव्यवस्था विस्कळीत होईल अशी कृती टाळणे हेही उचित होईल. एकट्या सौदी अरेबियाने इतर पेट्रोलनिर्यात करणाऱ्या देशांशी स्पर्धा करावयाचे ठरवले तर ते त्याला अशक्य नाही. कारण ११ दशलक्ष बॅरल्स दररोज उत्पादन करणे त्याला शक्य असूनही फक्त ३.५ दशलक्ष बॅरल्सचेच उत्पादन सीमित ठेवले आहे. आम्ही उत्पादन वाढवले तर ओपेकच्या एखाद्या सदस्य राष्ट्रावर अन्याय होईल आणि आहे त्यापेक्षा उत्पादन कमी केले तर ग्राहक राष्ट्रांवर अन्याय करण्यासारखे आहे. सौदी अरेबिया तेलाच्या किंमती स्थिर करण्यासाठी ओपेकच्या सदस्यांवर प्रभाव पाडू शकेल; पण त्याकरता विकसित देशांनी त्यांच्या निर्यात वस्तू स्वस्त दराने पेट्रोल निर्यात करणाऱ्या देशांना पुरविल्या पाहिजेत असे त्यांनी आवाहन केले.

## एशियन डेव्हलपमेंट बँक (ADB)

आशियाई विकास बँकेने आशियातील २१ देशांच्या १९९ प्रकल्पांना २०६ कोटी डॉलर्सइतके एकूण कर्ज पुरविले आहे. २०० कोटी डॉलर हा बँकेच्या कर्जाचा इष्टांक होता. आशियाई विकास निधी १२ राष्ट्रांच्या वर्गणीतून उभारण्यात आला आहे. ह्या निधीची रक्कम २४.५ कोट डॉलर असून त्यातील सर्वांत मोठा वाटा म्हणजे १०.५ कोट डॉलर जपानने दिला आहे. आशियाई बँकेचा १९७५ वर्षाचा कर्जाचा इष्टांक ७० कोट डॉलर असून त्यापैकी २५ कोट डॉलर्सचे कर्ज सवलतीच्या दराने देण्यात येणार आहे. आशियाई निधीकडून दरडोई ३०० डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या राष्ट्रांना सहाय्य केले जाते. जपानच्या खालोखाल आशियाई निधी उभारण्यात भारताचा वाटा दुसऱ्या क्रमांकाचा आहे. आशियाई बँकेच्या १९६८ मधील स्थापनेपासून भारताने ह्या बँकेकडून कर्ज घेतलेले नाही. बँकेचे भांडवल गेल्या २ वर्षांत दीडपट वाढवण्यात आले आहे. १९७६-८० ह्या वर्षात बँकेकडून एकूण ५०० कोटी डॉलर्स कर्ज देण्याची सोय करण्यात येईल.

## भारतीय आयुर्विमा मंडळाचे कार्य-विस्तार

आयुर्विमा मंडळाने गेल्या १९ वर्षांत नेत्रदीपक प्रगती केली आहे ह्यात शंका नाही. एकूण उत्पन्न गेल्या १९ वर्षांत ७ पटीने वाढले आहे. १९५७ साली ते ११३ कोट होते, मार्च ७५ मध्ये ते ७१६ कोटीपर्यंत गेले आहे. वैयक्तिक विमाधारकांच्या संख्येत ६ पटीने वाढ झाली आहे. सर्व वैयक्तिक पॉलिसींची १९५७ मध्ये एकूण रक्कम २८० कोट रुपये होती ती चालू वर्षी १७७२ कोट रुपये झाली आहे.

गटविम्याचा उद्योग १९६५ साली (Group Insurance) ७०१ कोटी होता तो चालू वर्षी ३११३ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे. अशा प्रकारे विमा-निधीतही सातपटींहून अधिक वाढ झाली आहे.

भारतीय आयुर्विमा महामंडळ ही जगातील सर्वांत मोठी विमासंस्था असून तिची स्थापना सप्टेंबर १९५६ मध्ये झाली. चालू महिना हा महामंडळाचा वर्धापन–मास आहे.

'योगक्षेमं वहाम्यहम्' हे मंडळाचे ब्रीद असून देशातील नागरिकांना आयुर्विमाद्वारे संरक्षण देणे, विमापत्रधारकांचे हितसंबंध राखणे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या निधीतून राष्ट्राच्या विकास व कल्याणाकरता कर्जे उपलब्ध करणे ही त्याची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

१९७०-७१ पासून महामंडळाची वाढ प्रकर्षाने झाली असे दिसते. १९५६ ते १९७० ह्या १३ वर्षांत जे १००० कोटी रुपयांचे काम झाले तितकेच ७०-७३ ह्या तीनच वर्षांत तेवढेच काम झाले. त्याचे कारण गटविमायोजनेच्या व्यवहारांना १९६९-७० पासून जास्त गती आली आहे. मार्च १९७५ अखेर गटविमायोजनेखाली २५ लक्ष लोकांच्या आयुष्याचा विमा उतरविण्यात आला. १९६८-६९ नंतर ग्रामीण भागातील विम्याचा व्यवहारही जलदगतीने वाढत आहे. ६८-६९ मध्ये ग्रामीण भागात एकूण ४ लक्ष विमापत्रके असून त्यांची एकूण रक्कम २३५ कोटी रुपयांच्या आसपास होती. १९७३-७४ मध्ये विमापत्रकांची संख्या ६॥ लक्ष होऊन

विम्याची रक्कम सुमारे ५०० कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. महामंडळाच्या दरसालच्या नव्या व्यवहारापैकी सुमारे ३० ते ३५ टक्के व्यवहार ग्रामीण भागातून होतो. ग्रामीण भागातील लोकांना बचतीची सवय लावण्याचे कामही अप्रत्यक्षपणे व प्रभावीपणे केले आहे. विशेषत: नोकरी करणाऱ्या कामगार, मध्यमवर्गीय व्यक्तींना पगारपत्रक बजतयोजना (Salary Saving Scheme) फारच सोयीची झाली आहे. १९७१-७२ मध्ये या योजनेखाली सुमारे ६ लक्ष लोकांनी विमे घेतले तर १९७३-७४ मध्ये हीच संख्या ६ लक्ष ३०००० झाली असून ३०० कोटींवरून ४०० कोटींपर्यंत एकूण व्यवसातात वाढ झाली असे दिसते.

दररोज सरासरी १३०० च्या वर मागण्यांची प्रकरणे महामंडळ हातावेगळी करत असते. १९५६ पासून ११५० कोटी रुपयांच्या विम्याच्या रकमा मंडळाने चुकत्या केल्या आहेत. आतापावेतो ३२ लक्ष कुटुंबांना विमापत्रकाची मुदत पूर्ण झाल्यामुळे किंवा मृत्यूमुळे विम्याची रक्कम मिळाली आहे.

महामंडळाने आतापावेतो ३०८५ कोटी रुपयांची प्रचंड गुंतवणूक केली आहे. त्यापैकी ११३९ कोटी रु. सरकारी रोख्यात, ५७० कोटी रुपये अन्य रोख्यांत, ११२० कोटी रुपये बॉंडमध्ये असे गुंतवले आहेत. त्यामुळे सरकारला आर्थिक विकासाच्या योजना पार पाडण्यासाठी आयुर्विमामंडळाने फार मोठा हातभार लावला आहे असे दिसते. बीजमंडळांना ५६२ कोटी रुपये, शहरी पाणीपुरवठा योजनांकरता ७१८ नागरी संस्थांना मदत राज्यसरकारे, गृहनिर्माणमंडळे अशा महत्त्वाच्या सरकारी, निमसरकारी योजनांना मंडळाने सहाय्य केले आहे. मंडळाच्या सहाय्यामुळे आतापावेतो ६ लक्ष घरे बांधली गेली असून त्याकरता ५०९ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध झाले आहे.

[ पत्रसूचना कार्यालयाचे सौजन्याने ]

## सार्वजनिक क्षेत्रातील अवजड उद्योगधंदे

देशातील अवजड अभियांत्रिकी उद्योग हे स्वयंपूर्ण आर्थिक विकासाचे अत्यंत महत्त्वपूर्ण अंग आहे. ऊर्जा, वाहतूक, पोलाद, खते, कृषि-अवजारे व यंत्रे, बीजवाहन, खाण-उपकरणे, बांधणी, अवजड मोटारी, ट्रक्स, रसायने इ. प्रमुख उद्योग ह्यात समाविष्ट होतात. ह्यापुढे ह्या उद्योगांकरिता परकीय आयातीवर अवलंबून रहाणे तितकेसे उचित नसल्यामुळे फेब्रु. १९७३ मध्ये ह्या उद्योगांचे संवर्धन करण्याकरता 'अवजड उद्योग खात्या'ची स्थापना करण्यात आली आहे. ह्या खात्याने नुकताच खालील कार्यक्रम स्वीकारला आहे. १. व्यवस्थापनाचे व्यावसायीकरण, आर्थिक शिस्तीवर भर, उत्पादनयोजना, विशेष कौशल्य व सार्वजनिक क्षेत्राची प्रतिमा उंचावणे. २. अधिकारवाटपाच्या बाबतीत सुधारणा आणि जबाबदारी निश्चित करणे. ३. उत्पादनक्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग करण्यावर भर. ४. बांधकाम चालू असलेल्या प्रकल्पांची कामे तातडीने पूर्ण करणे. ५. आजारी उद्योगांचे पुनर्वसन करणे. ६. पाचव्या योजनेची गरज भागविण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या काही नवीन उद्योगांची स्थापना करणे.

ह्या दृष्टीने हिंदुस्थान मशीन टूल्स या उद्योगाच्या उच्च व्यवस्थापनरचनेत बराच बदल करण्यात आला आहे व उद्योग-घटकांना स्वायत्तता देण्यात आली आहे. फक्त मूळ धोरण व सूत्रचालन उच्च पातळीवर नियंत्रित होईल.

भारत हेवी इलेक्ट्रिकल्समध्येही बदल झाल्याकारणाने त्याने उपउद्योग सुरू केले आहेत. उदा. ऊर्जा केंद्रांची उभारणी, तेलविहिरी खोदण्याकरता ड्रीलिंग रिग्जचे उत्पादन इ.

१९७१-७२ या साली सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे उत्पादन २०८ कोटी रुपये किंमतीचे होते. ७३-७४ मध्ये त्यात दुप्पट वाढ झाली आहे. (४०९ कोटी रुपये) १९७४-७५ साली त्यात आणखी वाढ झाली आहे ती म्हणजे ५५७ कोटी रुपयांची.

चालू वर्षाचे उत्पादनलक्ष्य ७२५ कोटी रुपयांचे ठरले असून ते ३ वर्षांमागच्या उत्पादनाच्या साडेतीनपट जास्त आहे.

७२-७३ ह्या वर्षी एकूण १३ कोटी रुपयांचा तोटा ह्या उद्योगांना झाला होता; पण ७४-७५ वर्षी त्यांनी ११ कोटी रुपये नफा कमविला आहे.

दर्जेदार उत्पादनातही वाढ झाली आहे. अणुशक्तीकेंद्रासाठी 'भेल' उद्योगाने २३५ एम. डब्ल्यू. सेटच्या उत्पादनास सुरुवात केली आहे. भाभा अणु संशोधनकेंद्रासाठी २६२ टन वजनाचे 'एनर्जी सायक्लोट्रॉन' नावाचे अजस्त्र लोहचुंबक त्याने तयार केले आहे. ३०० टन लोखंडाचा चुरा करणारे ४१३ टन वजनाचे यंत्रही 'भेल'मध्ये तयार झाले आहे. भेल, एच. एम. टी., रिचर्डसन व क्रूडास इत्यादी उद्योगांनी निर्यातवाढीवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. (प. सू. का.)

## उद्योगात काम करणाऱ्या भारतीय महिला

आर्थिक विकासाच्या सध्याच्या युगात महिला ह्यासुद्धा पुरुषांच्या बरोबरीने व्यवसाय, व्यापार, उद्योग, नोकरी इ.

क्षेत्रांत भाग घेऊ लागल्या आहेत. ५६ कोटी लोकसंख्येपैकी ढोबळपणे निम्मी संख्या महिलांची आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार भारतातील महिलांची संख्या २६·४ कोटी होती व त्यांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ४८ टक्के होते. त्यांपैकी ३ कोटी महिला म्हणजेच सुमारे १२•टक्के महिला नोकरी करीत आहेत. नोकरी करणाऱ्या महिलांपैकी ८०% महिला कृषिक्षेत्रात काम करतात; पण आता उद्योग–कारखाने–दुकाने ह्यातही महिलांना कामगार म्हणून नोकऱ्या मिळू लागल्या आहेत. त्यातल्या त्यात आंध्र, गुजरात, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, तामिळनाडू व प. बंगाल ह्या राज्यांत महिलाश्रमिकांची संख्या जास्त आहे. कारखान्यातल्या कामगारमहिलांपैकी ८८% महिला ह्याच राज्यातील कारखान्यांत काम करतात.

महिला व्यवस्थापनाच्या, नेतृत्वाच्या व उद्योगधंद्यांच्या संघटनकार्यातही सूत्रधार म्हणून प्रभावीपणे काम करताहेत. उदा. जहाजउद्योगात श्रीमती सुमती मोरारजी ह्यांचे नाव उल्लेखनीय आहे. त्या जगातील जहाजमालकांच्या संघटनेच्या एकमेव प्रमुख कर्णधार महिला आहेत. 'विकासप्रकाशन' ह्या जगभर पसरलेल्या पुस्तकप्रकाशनाचा व्याप श्रीमती शारदा चावला ह्या कुशलतेने पाहत आहेत. बड्या कंपन्यांचे सेक्रेटरी म्हणून कुमारी जरीपुराणवाला, सौ. धांडी, सौ. लाहिरी ह्यांची नावे घ्यावी लागतील. काही प्रमुख उद्योगसमूहांमध्ये स्त्रिया संचालक म्हणूनही काम पाहत आहेत.

अन्न, पेये, कापडउद्योग, तंबाखू-उद्योगात महिलांना कामगार म्हणून जास्त नोकऱ्या मिळाल्या आहेत. १९७२ मध्ये कारखान्यातील कामगारांपैकी ९ टक्के कामगार महिलावर्गातील आहेत. चहा, कॉफी, रबर, कोको व सिकोना तसेच खाणकाम व पायरवट कामे ह्यातही स्त्रियांना रोजगार मिळतो. अभ्रक, कोळसा ह्या खाणीत १९७२ च्या आकड्यांनुसार ७६ हजार स्त्रियांना रोजगार मिळाला आहे. खाणीतल्या खोल भागात जाण्यास त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खाणींवर निर्बंध घातले गेले आहेत.

मँगनीज खाणीत ३६००० व कोळसा खाणीत २२ हजार महिला काम करतात.

संघटित क्षेत्रातील १९२ लक्ष श्रमिकांपैकी २१ लक्ष महिला कामगार आहेत व त्यांची संख्या संघटित कामगारांमध्ये वाढत आहे. ७१ ते ७४ ह्या कालखंडात स्त्रियांना मिळणाऱ्या नोकऱ्यांचे प्रमाण पुरुषांच्या मिळणाऱ्या नोकऱ्यांतील नव्या वाढीपेक्षा जास्त आहे असे आढळते. महिलांना व पुरुषांना एकाच प्रकारच्या कामाकरता समान वेतनाचा वटहुकूमही सप्टेंबर महिन्यात निघाल्यामुळे महिला कामगारांचे शोषण कमी होईल. महिलांना समान संधी, समान हक्क, समान कल्याण ह्या गोष्टींना आर्थिक न्यायाच्या दृष्टीने विकसनशील भारतात महत्त्व दिले जाण्यास सुरुवात झाली आहे असे ह्या महिलावर्षाच्या वेळी म्हणावयास हरकत नाही.

---

## सार्वजनिक उद्योगांचे नवे उत्पादन

[ प. सू. का. सौजन्याने ]

---

हिंदुस्थान टेलिप्रिंटर्स लि. मद्रास ह्या संस्थेने संपूर्ण देशी बनावटीचा इलेक्ट्रिकल टाइपरायटर तयार करण्यात नुकतेच यश संपादन केले आहे. ह्या टंकयंत्राची किंमत ६५०० रु. राहील. परदेशी बनावटीचा टाइपरायटर घ्यावयास किमान रु. ८०००/– लागतात. त्या दृष्टीने हा टाइपरायटर परदेशी चलन वाचविण्यास उपयुक्त तर होईलच; पण टायपिस्ट लोकांची कार्यक्षमता वाढविण्यासही त्याची मदत होईल.

सेंट्रल मेकॅनिकल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिटयूट, दुर्गापूर ह्या संस्थेने एक वेगळाच नवा प्रयोग यशस्वी केला आहे. पायांनी चालविल्या जाणाऱ्या रिक्शाला ४९ / ५० सी. सी. क्षमतेचे पेट्रोलएंजिन जोडल्यामुळे सायकलरिक्शा चालवणाऱ्या व्यावसायिकांचे श्रम, दगदग, शारीरिक उपाधी व वेळ वाचून त्यांना जास्त धंदा करता येईल. ही नवी पेट्रोलएंजिन जोडलेली सायकल-रिक्शा एक लिटर पेट्रोलमध्ये ४० किलोमीटर अंतर जाईल. ह्या रिक्शाचा पर्याप्त वेग दर ताशी २० किलोमीटर असून किंमत वाजवी ठेवली जाणार आहे. राष्ट्रीकृत बँकांच्या नव्या योजनांनुसार अशा सायकल-रिक्शा खरेदी करण्याकरता कर्जसहाय्य मिळू शकेल व त्यामुळे उपेक्षित कष्टकऱ्यांना त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. [ इंजिनचे वजन १५ किलो व हॅंडल बारला जोडलेले क्लच, गिअर बॉक्स असे यांत्रिक भाग आहेत. ]

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांनी आता अशा सर्वसामान्य लोकांना अत्यावश्यक उपयोगाच्या वस्तू बनविण्यास सुरुवात केली आहे ही एक स्वागतार्ह घटना आहे.

# भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचा सहभाग

प्रा. सौ. कुमुद पोरे

भारतीय पारंपारिक समाजरचनेच्या केन्द्रस्थानी असलेली स्त्रीची दुय्यमता नाकारून भारतीय राज्यघटनेने स्त्री–पुरुष–समानतेची ग्वाही दिलेली आहे. राज्यघटनेतील हे समानतेचे तत्त्व हे एक प्रगतीचे पाऊल मानले तरीही भारतातील स्त्रियांची वास्तविक परिस्थिती ही कुणाही समंजस माणसाला विचार करायला लावणारी अशी आहे.

भारतीय स्त्रीची प्रतिमा ही काही एकजिनसी नाही. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही भारतीय स्त्रियांमध्ये वैविध्य आहे. निरनिराळ्या भौगोलिक विभागांतील वेगळेपणा, विविध धर्मांमुळे, जातींमुळे इ. असलेले वैचित्र्य, शिक्षणातील फरक आणि मुख्य म्हणजे आर्थिक परिस्थितीतील तफावत ह्या सर्व गोष्टी भारतीय स्त्रीत्वाला आडवे–उभे छेद देतात. भारतीय स्त्रीला ती ज्या विशिष्ट वर्गात मोडते त्या वर्गाच्या विशिष्ट समस्यांना तोंड द्यावे लागते. शिवाय स्त्री म्हणूनही तिला काही समस्यांना तोंड द्यावे लागते.

भारतीय स्त्रीची आर्थिक परिस्थिती ही सहसा स्वतंत्रपणे चर्चिली जात नाही याचे कारण भारतीय समाज हा स्त्रियांचे अर्थार्जन दुय्यम मानतो; एवढेच नव्हे तर खुद्द स्त्रीही स्वतःच्या एकूण आयुष्यात अर्थार्जनाला आज दुय्यम स्थान देत आहे; परंतु समाजात कोणत्याही सामाजिक घटकाचे स्थान हे बरेचसे त्या घटकाच्या आर्थिक सहभागावर व अर्थोत्पादनातील त्याला मिळणाऱ्या वाट्यावर अवलंबून असते. त्या दृष्टीने भारतीय स्त्रीचा अर्थव्यवस्थेतील सहभाग पाहाणे उद्बोधक ठरेल.

भारतातील आर्थिक विकासाबरोबर स्त्रियांचा आर्थिक सहभाग वाढला असेल अशी सर्वसामान्य माणसाची समजूत असते; परंतु विसाव्या शतकाच्या सुरुवातीस हिंदुस्थानातील जवळजवळ एकतृतीयांश स्त्रिया कामकरी स्त्रिया होत्या. हे प्रमाण १९७१ च्या शिरगणतीनुसार जवळजवळ एकअष्टमांशावर घसरले आहे. १९६१ ते १९७१ ह्या दहा वर्षांच्या देशाच्या आर्थिक विकासाच्या काळामध्ये कामकरी स्त्रियांचे नुसते प्रमाणच घसरले नाही तर कामकरी स्त्रियांची संख्याही कमी झाली. भारतातील निरनिराळ्या घटकराज्यांमधील कामकरी स्त्रियांचे प्रमाण १९६१ व १९७१ ह्या दोन शिरगणत्यांकरता तुलनीय अशा पद्धतीने तक्ता क्र. १ मध्ये दाखविले आहे.

स्त्री–कामकरी बहुतांशी खेड्यांपाड्यातून काम करीत आहेत. आजही जवळजवळ ९० टक्के स्त्रीकामकरी खेड्यांतून काम करताना आढळतात. त्यांच्यांतील शेतीवर अवलंबितांचे प्रमाण ग्रामीण विभागात गेल्या दहा वर्षांत ८२·६० टक्क्यांवरून ८७·०२ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. तक्ता क्र. २ मध्ये दाखविल्याप्रमाणे, बहुसंख्य स्त्रिया ह्या प्राथमिक उद्योगात असल्या तरी म्हणण्यासारख्या प्रमाणात त्या फक्त शेतमजुरीतच आहेत. बाकीच्या सर्व क्षेत्रांत एकूण कामकऱ्यांमध्ये त्यांचे प्रमाण फार थोडे आहे. बिगरशेतीउद्योगधंद्यांमध्ये यांत्रिकीकरणाच्या आणि आधुनिकीकरणाच्या ह्या युगामध्ये निरक्षर, बिनकसबी स्त्री कामकऱ्यांची पीछेहाट चाललेली दिसते. उदा. कापडउद्योगातील स्त्रीकामकऱ्यांची संख्या १९५२ ते १९६९ ह्या काळात ९५००० वरून ५१००० पर्यंत घसरलेली आढळते.

ग्रामीण विभागातील ९२ टक्के कामकरी–स्त्रिया आणि शहरी विभागातील ६६ टक्के कामकरी–स्त्रिया आजही निरक्षर आहेत. एवढे असूनही तांत्रिक शिक्षण न घेतलेल्या स्त्रियांमध्ये कामकरी–स्त्रियांचे प्रमाण कमी आढळते. सामान्यतः शिक्षणाबरोबर कामकरी–स्त्रियांचे प्रमाण वाढत जाते असे असले तरी बिगर तांत्रिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांपेक्षा तांत्रिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांचा आर्थिक सहभाग किती तरी अधिक असल्याचे आढळते.

ज्या स्त्रिया कामकरी नाहीत अशांपैकी निम्म्याहून अधिक स्त्रिया गृहिणी सांभाळीत असतात. काम न करणाऱ्या स्त्रियांपैकी शिक्षण घेत असलेल्यांचे प्रमाण खेड्यापाड्यांतून नऊ टक्क्यांपेक्षाही कमी आहेच; परंतु शहरातही ते १९ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. विशेषतः १५ ते १९ या वयोगटामध्ये काम

न करणाऱ्या स्त्रियांपैकी जवळजवळ तीनचतुर्थांश स्त्रिया घरकामातच व्यग्र होत्या. (पहा तक्ता–३) खेड्यापाड्यांतून तर हे प्रमाण ८१·४ टक्के आढळते.

ह्यापैकी अनेक स्त्रियांना अर्थार्जन करावेसे वाटते हे तक्ता क्र. ४ वरून दिसून येईल. पूर्ण वेळ कामासाठी उपलब्ध असलेल्या स्त्रियांपैकी ५५·६ टक्के स्त्रिया ह्या गृहिणी होत्या आणि आंशिक कामाकरता उपलब्ध असलेल्या स्त्रियांपैकी ७७·२ टक्के स्त्रिया गृहिणी होत्या. असं असूनही बेकार स्त्रियांची नोंद मात्र रोजगारविनिमयकेन्द्रामध्ये फारशी होत असल्याचे आढळत नाही. १९७१ मध्ये हिंदुस्थानात जवळ जवळ ४० लाख स्त्रियांना काम हवे आहे असे म्हणता येईल. ह्या आकडा गेल्या पाच वर्षांत आणखी काही लाखांनी वाढला असेल; परंतु निरक्षर स्त्रियांपैकी जवळजवळ कुणाचीही बेकार म्हणून नोंद होत नाही. मॅट्रिक किंवा त्याहून अधिक शिकलेल्या स्त्रियांमध्येही निम्म्याशिम्म्या बेकार स्त्रिया रोजगार हवा म्हणून आपली नावे नोंदतात असे आढळते. (तक्ता ५ पहा.)

शिकलेल्या स्त्रियांची परिस्थिती काय आहे ? उच्च पदवीधारक स्त्रिया नोकरीत असल्याचे किंवा नोकरी शोधत असल्याचे प्रमाण पुष्कळ मोठे आहे; परंतु पदवीधर स्त्रियांमधील फक्त ५३–५४ टक्के स्त्रिया नोकरी करत असलेल्या किंवा कामाच्या शोधात असलेल्या आढळतात. ह्याउलट सर्टिफिकेट कोर्स किंवा डिप्लोमा घेतलेल्या स्त्रिया अधिक प्रमाणात आर्थिक व्यवहारात सहभागी असलेल्या आढळतात. आजच्या समाजातील शिक्षण, शिक्षणउद्देश आणि शिक्षण कोण घेते ह्यावर प्रकाश टाकणारी ही वस्तुस्थिती आहे.

व्यावहारिक पातळीवर ह्या प्रश्नाचा दुहेरी विचार व्हावयास हवा. एक तर आज समाजात ज्या शिक्षित स्त्रिया आहेत त्यांचा काय उपयोग करून घेता येईल आणि दुसरं, अधिक महत्त्वाचं असं की आज जे शिक्षण दिलं जातं त्या शिक्षणात कोणते बदल घडवून आणावे म्हणजे स्त्रिया काम करण्याकरता अधिक उद्युक्त तसेच अधिक लायक होतील.

ह्यामध्ये एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात ठेवणे आवश्यक आहे की सद्यःपरिस्थितीमध्ये शिक्षित पुरुष आणि शिक्षित स्त्री दोघांवरही बेकारीची कुऱ्हाड बसलेली आहे; परंतु त्याचा मोठा आघात स्त्रीवर होतो आहे हे तक्ता ६ वरून लक्षात येईल.

---

**तक्ता क्र. १** • Participation Rates and Number of workers of 1961 and 1971 Census adjusted for conceptual differences ( Females only )

No. in '000

| India / States | Adjusted 1961 | Sensus 1971 |
|---|---|---|
| Participation Rate | 22·85 | 11·85 |
| No. of workers | 48,622 | 31,298 |
| **Assam** | | |
| Participation Rate | 28·48 | 05·45 |
| No. of workers | 16·07 | 03·86 |
| **Andhra Pradesh** | | |
| Participation Rate | 36·17 | 24·16 |
| No. of workers | 64·46 | 51·93 |
| **Bihar** | | |
| Participation Rate | 22·87 | 08·88 |
| No. of workers | 52·96 | 24·41 |
| **Delhi** | | |
| Participation Rate | 05·29 | 04·75 |
| No. of workers | 00·61 | 00·86 |
| **Gujrat** | | |
| Participation Rate | 20·93 | 10·26 |
| No. of workers | 20·93 | 13·23 |
| **Haryana** | | |
| Participation Rate | 16·27 | 02·41 |
| No. of workers | 05·74 | 0·112 |
| **Himachal Pradesh** | | |
| Participation Rate | 30·22 | 20·79 |
| No. of workers | 04·12 | 03·52 |
| **Jammu & Kashmir** | | |
| P. R. | 11·98 | 03·86 |
| No. of workers | 02·00 | 00·84 |
| **Karnatak** | | |
| P. R. | 26·93 | 14·20 |
| N. of workers | 31·09 | 20·34 |
| **Kerala** | | |
| P. R. | 17·26 | 13·49 |
| No. of workers | 14·74 | 14·52 |

[ पृष्ठ ४६ वर

चलन वित्त बँका विकास नियोजन

# अर्थव्यवस्थेतील एकुणात मागणी

## संबंधीचे सिद्धांतन

प्रा. नी. वि. सोवनी
गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

विसाव्या शतकाच्या अर्थशास्त्रामध्ये समष्टीय विवेचनाला (Macroeconomic analysis) केन्स ह्यांच्या सिद्धांतामुळे एक वेगळीच कलाटणी मिळाली.
केन्सनंतरच्या अर्थशास्त्रज्ञांनी एकुणात मागणी, (Aggre gate demand) पूर्ण रोजगार (Full employmet), एकूण उत्पादन, उत्पन्न व विकास (growth) ह्या विविध प्रश्नांच्या विश्लेषणात विशेष रस घेतलेला आहे.
समष्टीय अर्थशास्त्राच्या प्रगतीचे ढोबळमानाने तीन भाग करता येतील : एक म्हणजे केन्सपूर्वीचा एकुणात मागणीचा विचार, दुसरा म्हणजे खुद्द केन्स ह्यांचा आणि तिसरा, केन्सनंतरच्या विद्यमान अर्थशास्त्रज्ञांचा.
अर्थशास्त्राचे जिज्ञासू आणि अधिक सखोल अभ्यास करणारे वाचक, पदव्युत्तर विद्यार्थी व अभ्यासू प्राध्यापक ह्यांना एखाद्या प्रमुख आर्थिक सिद्धांताचा समग्र परिचय करून देणारा व संदर्भास कायम उपयुक्त होईल असा निबंध उपलब्ध करून द्यावा ह्या दृष्टीने मी प्रा. सोवनी ह्यांना भेटलो. अर्थच्या ध्येयाविषयी त्यांना नितांत आसक्ती व प्रेम असल्यामुळे त्यांनी माझी विनंती मान्य करून 'एकुणात मागणी'चे समग्र विवेचन एकत्रित देणारा असा एक निबंध तयार केला. ह्या विषयावर त्यांचे गेली अनेक वर्षे चिंतन, परीक्षण व अभ्यास चालू आहे. शिवाय त्यांचे ह्या संकल्पनेच्या बाबतीतही स्वतःचे काही स्वतंत्र विचार आहेत. त्यांचा निबंध ह्या अंकापासून तीन भागांत प्रसिद्ध होईल. प्रस्तुतच्या पहिल्या भागात केन्सपूर्वीचे 'एकुणात मागणी'चे विवेचन आले आहे. ह्यापुढच्या क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या अंकात केन्सचा सिद्धांत व त्यानंतरच्या अंकात अत्याधुनिक सिद्धांत येईल.
अर्थशास्त्रातल्या प्रमुख सिद्धांतनांचा उदाहरण मागणीचा, व्यष्टीय-सिद्धांत (Microeconomic Theory of Demand), किंमतींचा सिद्धांत, खर्चाचे सिद्धांत, उद्योगसंस्थेचा समतोल, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा प्रगाढ अभ्यास (Advanced Studies) होण्याच्या दृष्टीने अधिकारी व प्राध्यापकांकडून स्वतंत्र निबंध तयार करवून घेऊन ते संग्रहरूपाने (Collected readings) मराठी भाषेत प्रथमच सादर करण्याची 'अर्थ' मासिकाची योजना आहे.
ह्या संकल्पित योजनेची मुहूर्तमेढच प्रा. सोवनी ह्यांच्या लेखाने होत आहे. •

—संपादक

---

अर्थव्यवस्थेतील प्रक्रियांचा व्यष्टी (Micro) आणि समष्टी (Macro) या दोन्ही दृष्टींनी अर्थशास्त्रात विचार करण्याचा प्रघात आहे. अर्थव्यवस्थेतील एका व्यक्तीची एका वस्तूसंबंधीची मागणी कशी अभिव्यक्त होते, वस्तूची उपयुक्तता तिच्या मागणीची जननी कशी असते, त्यात सीमान्त उपयुक्तता का व कशी निर्णायक असते वगैरे गोष्टींचा विचार करून त्याच्या सहाय्याने एका व्यक्तीच्या व एका वस्तूच्या अनुषंगाने मागणीसिद्धांत कसा मांडता येतो हे मागणी-संबंधीचे व्यष्टीय विवेचन होय. तेच पुढे चालवून एका व्यक्तीवरून अर्थव्यवस्थेतील सर्व व्यक्तींची एका वस्तूला—उदाहरणार्थ कापडाला—येणारी एकंदर मागणी अभ्यासता येते. त्याही पुढे जाऊन अर्थव्यवस्थेतील सर्व व्यक्तींची सर्व वस्तूंना असणारी एकुणात मागणी कशी निर्माण होते, तिचे आकारमान कसे ठरते, ती कशी बदलते, तिच्याशी इतर आर्थिक घडामोडींचा काय संबंध असतो यासंबंधीचे विवेचन हा मागणीसंबंधीचा समष्टीय विचार होय.

**मागणीसंबंधीचे व्यष्टीय विवेचन हे बहुधा भोग्यवस्तूंसंबंधी असते व निगमनात्मक असते. मागणीसंबंधीचे समष्टीय विवेचन हे भोग्यवस्तू व उत्पादकवस्तू या सर्वांबद्दल असते.** किंबहुना अर्थव्यवस्थेतील कोणत्याही वस्तूचा व सेवेचा त्याला वगळ नसतो. ते सर्वांना सामावणारे असते. हे विवेचन विगमन व निगमन या दोन्ही रीतींनी केले जाते. **या विवेचनातच 'तथाकथित' सार्थ (effective) मागणीच्या सिद्धांताचा समावेश होतो. या समष्टीय मागणीचे विवेचन येथे करण्याचे योजिले आहे.**

कोणत्याही अर्थव्यवस्थेत केले जाणारे उत्पादन, त्याला येणारी मागणी व तिच्यामधील लोकांना मिळणारी उत्पन्ने व त्यांच्यातून होणारा खर्च यांचे परस्परांशी घनिष्ठ नाते असते हा विचार निसर्गवाद्यांच्या वेळेपासून अर्थशास्त्रात रुजलेला आहे. कने याने मांडलेला अर्थव्यवस्थेतील घडामोडींचा आराखडा (Tableau Economique) हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. तीच विचारधारा पुढे वाहून रिकार्डो, से, माल्थस् (प्रत्यक्षात उच्चार माल्टस् असा आहे), यांनी अर्थव्यवस्थेतील एकुणात मागणीसंबंधी अधिक विस्तृत विवेचन केलेले आढळते. त्याचा मागोवा घेतच विषयप्रवेश करू.

**राष्ट्रांची अर्थव्यवस्था मानवी शरीरासारखी असते व मानवी शरिरातील रुधिराभिसरणाप्रमाणे अर्थव्यवस्थेतील विनिमय हा अर्थव्यवहार असतो हे निसर्गवाद्यांनी अर्थशास्त्रात प्रथम मांडले.** सर्व अर्थव्यवस्थेसंबंधी साकल्याने विचार केला तर तिच्यामधील अर्थव्यवहारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे कल्पिता येते. दरवर्षी अर्थव्यवस्थेतील कामगार तिच्यातील भांडवलाच्या (उत्पादनसामग्रीच्या) सहाय्याने तिच्यातील नैसर्गिक संपत्तीवर उत्पादनाचे संस्कार करून निरनिराळ्या वस्तू व सेवा यांच्या उत्पादनाचा एक ओघ (flow) निर्माण करतात. अर्थव्यवस्थेतील लोक त्या उत्पादनाचा त्या वर्षात उपभोग घेऊन आपला योगक्षेम चालवतात, भांडवलाची उत्पादनात झालेली झीज भरून काढतात व पुढील वर्षी पूर्वीप्रमाणेच अर्थव्यवहारांचे चक्र चालू राहील अशी व्यवस्था करतात. अर्थव्यवस्थेत श्रमविभागाचे तत्त्व अनुस्यूत असल्यामुळे त्यातील प्रत्येकजण आपल्याला लागणाऱ्या सर्व वस्तू अगर सेवा स्वतःच निर्माण करीत नाही. म्हणजेच तो स्वयंपूर्ण नसतो. प्रत्येक कामगार काही विशिष्ट वस्तू अगर सेवा निर्माण करतो व त्या सेवेची अगर वस्तूची स्वतःची गरज भागवून उरलेल्या निर्मिताच्या विनिमयाने स्वतःला लागणाऱ्या इतर वस्तू व सेवा त्यांच्या निर्मात्यांकडून खरेदी करतो. उत्पादन व त्याला येणारी मागणी ही परस्परांशी इतकी निगडित असतात याचे कारण ती एकाच गोष्टीची दोन अंगे असतात. वर उल्लेखिलेला अर्थव्यवस्थेतील एका वर्षातील उत्पादनाचा ओघ म्हणजेच तिचे त्या वर्षातील राष्ट्रीय उत्पन्न. एका बाजूने पाहिले तर राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे त्या काळातील एकंदर उत्पादन. दुसऱ्या बाजूने, अर्थव्यवस्थेतील उत्पन्नप्रापकांची (Income receipients) एकत्रित केलेली उत्पन्ने. तिसऱ्या बाजूने पाहिले तर त्या वर्षात अर्थव्यवस्थेतील लोकांनी वस्तू व सेवा विकत घेण्यासाठी केलेला एकुणात खर्च असे राष्ट्रीय उत्पन्नाचे स्वरूप दिसते. म्हणून या तिन्हींपैकी कोणत्याही माध्यमातून राष्ट्रीय उत्पन्न अंदाजता येते. प्रत्यक्षातही या तिन्ही पद्धतींचा उपयोग करूनच राष्ट्रीय उत्पन्नाचे अंदाज केले जातात. **अर्थव्यवस्थेतील एकुणात उत्पादन व तिच्यात निर्माण होणारी एकुणात मागणी ही प्रत्यक्षात (घटनोत्तर) एकरूपच असतात हे या साध्या प्रतिमानातून (model) सहजपणे सुचते व प्रत्ययास येते.**

**अर्थव्यवस्थेतील घडामोडीकडे साकल्याने पाहण्याचा हा दृष्टिकोण अर्थशास्त्राच्या सुरुवातीच्या काळातच उदय पावला.** यातूनच १९ व्या शतकाच्या सुरुवातीस ज्याँ बॅपटिस्ट से या फ्रेंच अर्थशास्त्रज्ञाचा मागणीसंबंधीचा सुप्रसिद्ध सिद्धांत निघाला. १८०३ साली प्रसिद्ध झालेल्या त्याच्या अर्थशास्त्रावरील पुस्तकात से याने हा सिद्धान्त पुढील शब्दांत सांगितला आहे.

**'अर्थव्यवस्थेतील कोणत्याही वस्तूची निर्मिती पूर्ण झाली की त्या क्षणापासून इतर वस्तूंना तिच्या विनिमयमूल्याइतकी मागणी निर्माण होते हे येथे आवर्जून सांगणे आवश्यक आहे. कोणताही उत्पादक आपण निर्माण केलेल्या वस्तूचे (विनिमय) मूल्य कमी होईल या भीतीने ती लगेच विकून टाकण्यास उत्सुक असतो आणि ती विकून येणारा पैसाही लगेच खर्च करावयास तो उत्सुक असतो. कारण पैशाची क्रयशक्तीही कमी होईल अशी त्याला भीती असते. पण पैसे खर्च करावयाचे म्हणजे उत्पादन झालेल्या काही इतर वस्तू विकत घेणे आलेच. त्यामुळे कोणतीही वस्तू निर्माण झाली या घटनेमुळेच इतर वस्तूंना तिच्या (विनिमय) मूल्याइतकी मागणी निर्माण होते.'** [1]

**कोणतेही उत्पादन इतर उत्पादनाला आपल्या विनिमयमूल्याइतक्या मागणी सकटच जन्मते असा सेचा सिद्धान्त**

1 : Jean Baptist Say, A Treatise of Political Economy (English Translation), London, 1821, Vol I, p. 16.

थोडक्यात सांगता येईल. या सिद्धांताप्रमाणे अर्थव्यवस्थेत एकुणात मागणी व पुरवठा हीं नेहमी एकमेकाइतकीच असतात. त्यामुळे एकुणात पुरवठ्यापेक्षा जादा मागणी अगर एकुणात मागणीपेक्षा जादा पुरवठा ( उत्पादन ) असा असमतोल अर्थव्यवहारात संभवतच नाही. उत्पादनाला मागणीही असतेच.

सेच्या सिद्धान्ताचे एक दोन विशेष नीटपणे समजावून घेतले पाहिजेत. एक तर सेचा सिद्धान्त हा एक प्रकारे वस्तुविनिमयच ज्या अर्थव्यवस्थेत चालतो तिला उद्देशून आहे. **कारण सेच्या प्रतिमानात पैसा (चलन) हे फक्त विनिमयाचे माध्यम आहे.** तो उत्प्रेरकाप्रमाणे ( catalyst ) आहे. स्वत: अबाधित राहून वस्तूवस्तूतील विनमय तो सुकर व वेगवान करतो. याखेरीज त्याला स्वतंत्र कर्तृत्व अगर महत्त्व नाही. सेच्या सिद्धान्ताचे हे एक गृहीतक आहे. त्याचे दुसरे गृहीतकही प्रच्छन्नपणे त्याच्या वर दिलेल्या विवेचनात आहे. ते म्हणजे अर्थव्यवस्थेतील सर्व मिळवती माणसे किंवा उत्पन्न प्रात्पक आपली मिळकत भोग्य अगर उत्पादक वस्तूंच्या प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष खरेदीत खर्च करतात. मिळकतीपैकी काही भाग नुसताच पैशाच्या स्वरूपात (रोकड म्हणून) कोणीही-नुसत्या पैशाच्या राशीकडे पाहून आनंद मानणारा चिकटोपंत सोडला तर—साठवून ठेवीत नाही. ही गृहीतकृत्ये येथे बुद्धया मांडण्याचे कारण ती तशी आहेत हे अनेक दशके अर्थशास्त्रज्ञांच्या प्रकट (conscious) मनांना जाणावलेच नाही. त्यामुळे या सिद्धान्ताची अन्वेषणा जितक्या बारकाईने व्हावयास पाहिजे होती तितकी झाली नाही व सनातन अर्थशास्त्रात सेचा सिद्धान्त एक प्रतिष्ठित सिद्धान्त म्हणून स्वीकारला गेला.

**परंतु हे सर्वस्वी होण्यापूर्वी त्यावर रिकार्डो व माल्थस् यांच्यात पत्रद्वारे बराच वाद झाला.** या वादविवादात रिकार्डो हा सेचा पक्षपाती होता व माल्थस् हा त्याच्या विरोधी होता. या वादविवादात माल्थसची हार झाली व सेचा सिद्धान्त वर सांगित्याप्रमाणे अर्थशास्त्रात सिद्ध म्हणून स्वीकृत झाला. पुढे विसाव्या शतकात केन्स यांनी माल्थसच्या विचारांना प्रसिद्धी देऊन पुन्हा उजळा दिला. तेव्हा त्यांच्याकडे विचारवंताचे लक्ष पुन्हा वेधले गेले. रिकार्डो व माल्थस् यांच्यामधील यासंबंधीच्या पत्रव्यवहारासही प्रसिद्धी मिळाली व तो सर्वच वाद संपूर्णपणे पुन्हा पुढे आला. या वादाचा आता थोडक्यात परामर्ष घेऊ.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीस नेपोलियनशी प्राणपणाने लढत असलेल्या इंग्लंडमधील आर्थिक परिस्थिती अनुभववादी माल्थस्च्या समोर होती. नेपोलियनशी चाललेल्या दीर्घकालीन लढ्यामुळे इंग्लंडमधील आर्थिक परिस्थिती पार बिघडून गेली होती. कामगारांची बेकारी, त्यामुळे कमी झालेली त्यांची क्रयशक्ती त्यामुळे बाजारात जाणवणारा मागणीचा अपुरेपणा, त्यामुळे वस्तूंच्या फाजील पुरवठ्याचा निर्माण झालेला प्रश्न हे त्याला हरघडी जाणवत होते आणि सेच्या सिद्धान्ताच्या अगदी विरुद्ध असा हा बनाव होता. त्यामुळे साहजिकच माल्थस्ला सेच्या सिद्धान्ताची सत्यता मुळीच पटणारी नव्हती.

**रिकार्डोच्या निव्वळ सैद्धान्तिक दृष्टीला सेचा सिद्धान्त स्वयंसिद्धच वाटत होता.** अर्थव्यवस्थेत एकुणात पुरवठ्यापेक्षा (उत्पादनापेक्षा) एकुणात मागणी कमी अशी परिस्थिती येतच नाही आणि यदाकदाचित् आलीच तर फार काळ टिकत नाही असे त्याचे म्हणणे होते. अर्थव्यवस्थेच्या काही भागात, काही विशिष्ट वस्तूंच्या संबंधात, अल्पकाळपर्यंत उत्पादनाच्या मानाने अपुऱ्या मागणीचा प्रश्न उद्‌भवू शकेल; परंतु तसा तो उद्‌भवताच तर इतर वस्तूंना असणारी मागणी वाढेल. (म्हणजे ज्या वस्तूंसाठी मागणी कमी झालेली असेल तिकडून ती इतर वस्तूंकडे वळेल.) त्यांच्या किंमती वाढतील व नवे भांडवल त्यांच्या उत्पादनाकडे आकर्षित होईल. त्यामुळे त्यांचे उत्पादन वाढेल. उलट अपुऱ्या मागणीची परिस्थिती असलेल्या वस्तू अगर अर्थव्यवस्थेचे भाग यातील उत्पादनाच्या किंमती कमी होतील. त्यांच्या उत्पादनात नवीन भांडवलाची गुंतवणूक कमी होईल. किंमतींच्या चढउतारामुळे झालेल्या या आर्थिक घडामोडींमुळे आपोआपच मागणी—पुरवठ्याचा (उत्पादनाचा) समतोल सर्व भागांत व पर्यायाने सर्व अर्थव्यवस्थेत होईल. हे व्हावयाला जेवढा काळ लागेल तेवढ्या वेळातच अर्थव्यवस्थेच्या काही भागात ही अपुऱ्या मागणीची परिस्थिती टिकेल. **म्हणजेच दीर्घकालीन दृष्टिकोणातून विचार केला तर एकुणात अपुऱ्या मागणीची परिस्थिती कधीच निर्माण होणार नाही. एवढेच नव्हे तर अपुऱ्या मागणीची किंवा जादा पुरवठ्याची अशी आंशिक (partial) परिस्थिती चिघळून संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संदर्भात अशी परिस्थिती निर्माण होण्याची मुळीच शक्यता नाही.**

माल्थस्ने आपल्या अर्थशास्त्रावरील पुस्तकात लिहिले की 'से याचा सिद्धांत मला दोन्ही निगमन व विगमन चिकित्सांच्या पद्धतीप्रमाणे सदोष वाटतो.' परंतु हा त्याचा युक्तिवाद उचलून धरण्यासाठी लागणारे अर्थशास्त्रीय विवेचन त्याला प्रभावीपणे करता न आल्यामुळे त्याला विवादात हार खावी लागली. सेच्या सिद्धान्ताविरुद्ध त्याने असे विवेचन केले की कोणत्याही अर्थव्यवस्थेतील उत्पादनाचे दोन वर्ग पाडता येतात अन्न, वस्त्र वगैरेसारख्या अगदी जीवनावश्यक वस्तूंचा एक आणि

इतर-म्हणजे, चैनीच्या वस्तूंचा. यापैकी पहिल्या गटाच्या वस्तूंच्या बाबतीत जादा पुरवठ्याचा प्रश्न निर्माण होण्याचा संभवच नाही. कारण त्याच्या स्वतःच्याच लोकसंख्यासिद्धान्ताप्रमाणे या वस्तूंचा पुरवठा (उत्पादन) वाढला तर त्याच प्रमाणात लोकसंख्येची वाढ होते व तितकी जादा मागणी निर्माण होते. परंतु दुसऱ्या वर्गाच्या-म्हणजे चैनीच्या- वस्तूंना श्रीमंत लोकांकडून मागणी येते. जमीनदार व उद्योगपती यांचाच हा वर्ग असतो. बाकीच्या सामान्य जनांची उत्पन्ने अगर मिळकत पहिल्या वर्गातील अत्यंत जरुरीच्या वस्तूवर खर्च होऊनच संपते. तेव्हा जमीनदार व उद्योगपती यांनी जरुरीच्या आणि चैनीच्या भोग्य वस्तूंवर भरपूर खर्च केला नाही व त्याऐवजी बचत करून भांडवलनिर्मितीवरच किंवा भांडवली वस्तूत गुंतवण्यासाठीच जर आपल्या उत्पन्नाचा जादा भाग वापरला तर निकडीच्या गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंच्याशिवाय इतर वस्तूंना त्यांच्या उत्पादनाच्या मानाने कमी मागणी येईल. त्यांच्या उत्पादनात गुंतलेल्या कामगारात बेकारी निर्माण होईल व त्यामुळे अपुऱ्या एकुणात मागणीचा प्रश्न निर्माण होईल. म्हणून बचत करून भांडवलात भर घालणारा हा देशाचा उपकारकर्ता आहे हे स्मिथ किंवा रिकार्डो यांचे म्हणणे चूक आहे. मितव्ययाचा अतिरेक झाला तर त्यामुळे अपुऱ्या एकुणात मागणीचा किंवा जादा एकुणात उत्पादनाचा (पुरवठ्याचा) प्रश्न निर्माण होणारच. यासाठी जमिनदार व उद्योगपती यांचे चैनीच्या वस्तूंवरील खर्च हे आर्थिक समृद्धीच्या दृष्टीने समर्थनीय आहेत असे माल्थसने प्रतिपादिले आहे.

हा वादविवाद काही वर्षे चालला परंतु त्यात माल्थसला अर्थशास्त्रज्ञांचा पाठिंबा मिळाला नाही. २४ जानेवारी १८१७ रोजी माल्थसला लिहिलेल्या पत्रात रिकार्डोने या चर्चेचा समारोप केला व त्यात म्हटले की 'तुमचे म्हणणे अल्पकालीन परिस्थितीचाच विचार केल्यास बरोबर ठरेल. परंतु अशा तात्पुरत्या आणि चंचल घडामोडींचा विचार बाजूस ठेवून दीर्घकालीन व कायमच्या प्रवृत्ती वा घडामोडी लक्षात घेतल्यास माझेच म्हणणे बरोबर ठरते असे दिसून येईल.'[2] माल्थसची यामुळे खात्री पटली नाही व त्याने आपले मतही बदलले नाही. यानंतरच्या काळात ही चर्चा बाजूस पडली व सेचा सिद्धान्त हा सनातन अर्थशास्त्राचा एक स्वीकृत व सिद्धभाव ठरला.

2 : P. Sraffa ( Ed ), The Works and Correpondence of David Ricardo, Vol. VIII, p. 120, Cambridge University Press, 1951–73.

खरी गोष्ट अशी की एकुण उत्पादन व मागणी यांच्यामधील परस्परसंबंधांचे संपूर्ण आकलन त्या वेळच्या अर्थशास्त्रज्ञांना झाले नाही. से, रिकार्डो, माल्थस् वगैरे अर्थशास्त्रज्ञांच्या भोवतालची आर्थिक परिस्थिती संक्रमणाची होती. औद्योगिक क्रांतीचा तो प्रभातकाळ होता. पूर्वीच्या शेतकीप्रधान अर्थव्यवस्थेकडून नव्या औद्योगिक अर्थव्यवस्थेकडे हळूहळू प्रगती होत होती. उदय पावणारी ही भांडवलशाही औद्योगिक अर्थव्यवस्था अजून पूर्वावस्थेत होती. अर्थव्यवस्था अजूनही शेतकीप्रधानच होती. पैसा (चलन) व त्याच्याशी संबंधित असलेल्या संस्था यांचा अजून विकास व्हावयाचा होता. पतपैसा, कागदी चलन, अधिकोश (बँका), वगैरे अजून नवीनच होत्या. शेतकीप्रधान अर्थव्यवस्थेपेक्षा औद्योगिक भांडवलशाही अर्थव्यवस्था किती अधिक गुंतागुंतीची आहे, कशी निराळी आहे, तिच्या आर्थिक प्रक्रिया किती वेगळ्या आहेत याचे संपूर्ण ज्ञान त्या वेळच्या अर्थशास्त्रज्ञांना झाले नसले तर त्याबद्दल त्यांना दोष देता येणार नाही. आणि हे ज्ञान नसल्यामुळेच सेचा सिद्धान्त व त्याच्या मर्यादा त्यांच्या नीटपणे ध्यानात आल्या नाहीत असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

त्यानंतरच्या शंभराहून अधिक वर्षांच्या अर्थशास्त्रातील प्रगतीच्या खांद्यावर उभे राहून आपण आता असे म्हणू शकतो की शेतीप्रधान व उद्योगप्रधान अर्थव्यवस्था यातला मुख्य फरक म्हणजे उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेतील मानवनिर्मित उत्पादनसाधनांचे (भांडवलाचे) असाधारण महत्त्व. शेतकीप्रधान अर्थव्यवस्थेत जमीन हाच सर्वांत महत्त्वाचा उत्पादन घटक. तोही निसर्गाने दिलेला, ठरलेला. मानवी प्रयत्नाने त्यात फार मोठी भर घालण्याची शक्यता अगदी मर्यादित. या उलट नवीन यंत्रसामुग्रीच्या रूपाने सिद्ध होणारा उत्पादन घटक हा सर्वस्वी मानवाच्या कर्तृत्वाधीन. त्याच्या मर्जीप्रमाणे बदलणारा, वाढणारा. त्याच्यावर उत्पन्नाचे आकारमान पुष्कळसे अवलंबून. त्यामुळे हा घटक नवीन अर्थव्यवस्थेत कसा ठरतो, त्यामागच्या प्रक्रिया काय असतात, त्यातल्या निर्णायक कोणत्या वगैरे या अर्थव्यवस्थेसंबंधीचे प्रश्न महत्त्वाचे ठरतात. पुढे दाखविल्याप्रमाणे या प्रश्नांची नीट चिकित्सा झाल्याखेरीज सेच्या सिद्धान्तासारख्या सिद्धान्ताची मूलगामी चिकित्सा होणे दुरापास्तच होते आणि त्याप्रमाणे झालेही हे आपल्याला ठाऊक आहे.

रिकार्डोच्या विचारसरणीचा पुढील आविष्कार दोन निरनिराळ्या मार्गांनी झाला. सनातन अर्थशास्त्राचा मूलस्रोत जॉन स्टुअर्ट मिलने पुढे वाढवला व समाजवादी अर्थशास्त्राचा विकास रिकार्डोच्या सिद्धान्तांच्या आधारे मार्क्सने केला. या दोघांनीही

अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीविषयी आपआपल्या दृष्टिकोणातून लिहिले आहे. मिलने माल्थसच्या अपुऱ्या मागणीच्या विवेचनाशी विरोध दाखवून रिकार्डो व से यांचे म्हणणे उचलून धरले व सनातन अर्थशास्त्रातील सेच्या सिद्धान्ताची स्वीकृती पक्की केली. सेच्या सिद्धान्ताला उचलून धरून माल्थसचा प्रतिरोध करण्यासाठी मिलने स्वतःच प्रतिपादिलेल्या वेतननिधी सिद्धान्ताचा उपयोग केला. या सिद्धान्ताप्रमाणे औद्योगिक उत्पादक आपल्या एकंदर भांडवलापैकी कामगारांना द्याव्या लागणाऱ्या वेतनाइतका एक वेतननिधी ठेवतात— फिरत्या भांडवलाचा एक भाग म्हणून— व हा वेतननिधी जितका असेल त्यावर व उपलब्ध कामगारांच्या संख्येवर—सर्व उपलब्ध कामगारांना रोजगार मिळतोच हे यात गृहीत आहे— कामगारांना मिळणाऱ्या वेतनाचा दर अवलंबून असतो. इतर कोणत्याही गोष्टीवर नसतो. 'वस्तूंसाठी असणारी मागणी म्हणजे कामगारांच्यासाठी असणारी मागणी नव्हे.' या प्रसिद्ध मिलप्रणीत उक्तीमध्ये या सिद्धान्ताचे रहस्य साठविले होते. या सिद्धान्ताप्रमाणे कामगारांचा रोजगार हा वेतननिधीवर अवलंबून असतो. त्याचा अपुऱ्या एकूण मागणीशी सुतराम् संबंध नसतो. म्हणून माल्थसचे अपुऱ्या मागणीचे विवेचन शास्त्रीय नाही. या संबंधात मौजेची गोष्ट अशी की मिलने संकल्पिलेला वेतन निधी प्रत्यक्षात मुळीच नसतो, उद्योगपती अशा प्रकारचा निधी ठेवीत माहीत आणि कल्पितसुद्धा नाहीत हे जेव्हा मिलच्या टीकाकारांनी प्रत्यक्षातील अनुभवजन्य माहितीच्या आधारे त्याच्या नजरेस आणले, त्या वेळी त्या उदारमतवादी विचारवंताने जाहीरपणे आपला सिद्धान्त चुकीचा आहे असे सांगितले व तो मागे घेतला. परंतु या सिद्धान्ताच्या आधारे आपण अपुऱ्या मागणीचा सिद्धान्त खोडला व सेचा उचलून धरला म्हणून तो युक्तिवादही चुकीचा ठरतो हे त्याच्याही ध्यानात आले नाही व इतर अर्थशास्त्रज्ञांनाही तसे वाटले नाही. त्यामुळे सेचा सिद्धान्त सनातन अर्थशास्त्रात सामावलेलाच राहिला.

मार्क्सने आपल्या विवेचनात अपुऱ्या एकुणात मागणीचा सिद्धान्त भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कसा अंगभूतच आहे हे प्रतिपादिले. त्याच्या विचारसरणीप्रमाणे भांडवलशाहीचा आत्मा म्हणजे औद्योगिक उत्पादकांना मिळणारा लाभ. हा लाभ उत्पादनातील वाढाव्यातून निर्माण होतो. कामगारांना त्यांच्या किमान योगक्षेमापुरते वेतन देऊन, त्यांच्याच श्रमाने निर्माण झालेला वाढावा भांडवलदार स्वतःच्या घशात घालतात. अधिक वाढावा निर्माण करून अधिक लाभ मिळावा म्हणून भांडवलदार तो पुन्हा स्थिर भांडवलात (यंत्रसामुग्री वगैरे) गुंतवतात. त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्थिर भांडवलाची एकसारखी वाढ होत राहते. स्थिर भांडवलाने एकंदर भांडवलातील प्रमाण वाढते व फिरत्या भांडवलाचे कमी होते. फिरत्या भांडवलातूनच कामगारांना वेतन दिले जाते व फिरत्या भांडवलाच्या प्रमाणावरच वाढाव्याचा दर अवलंबून असतो. फिरत्या भांडवलाचे प्रमाण कमी झाले की वाढाव्याचा दरही कमी होतो व त्यामुळे भांडवलावर सुटणाऱ्या लाभाचा दरही कमी होतो. फिरत्या भांडवलावर कामगारांना उपलब्ध होणारा रोजगार अवलंबून असतो. फिरत्या भांडवलाचे प्रमाण जसजसे कमी होत जाते तसतसे नवीन रोजगारी निर्माण होण्याचा दरही कमी कमी होत जातो. नवीन भांडवलनिर्मितीतून जास्त जास्त यंत्रसामग्री उत्पादनात आणली जाते व नव्या कामगारांची जागा यंत्रसामग्री घेते. या सर्वांचा परिपाक म्हणून कामगारांची बेकारी निर्माण होते. वाढत्या स्थिर भांडवलामुळे होणाऱ्या वाढत्या उत्पादनाला कामगारांच्या वाढत्या बेकारीमुळे कमी मागणी येते. त्यातूनच जादा उत्पादन अगर अपुऱ्या मागणीचा पेचप्रसंग निर्माण होतो. त्यातून आर्थिक मंदी उत्पन्न होते. अशा प्रकारची मंदी हा भांडवलशाहीचा शरीरधर्मच आहे. माल्थसपेक्षा अगदी वेगळ्या मार्गाने मार्क्सने हे अपुऱ्या मागणीचे विवेचन केले आहे.

सनातन व नवसनातन अर्थशास्त्राच्या मुख्य स्रोतात अपुऱ्या एकुणात मागणीचा विचार शिरू शकला नाही; परंतु व्यापारचक्र किंवा तेजीमंदी चक्राचा ज्या ज्या अगर उजव्या अर्थशास्त्रज्ञांनी विचार केला त्यांनी या ना त्या स्वरूपात अपुऱ्या एकुणात मागणीचा विचार केलेला आढळतो. या विचारांचा थोडक्यात परामर्श घेऊ.

अर्थव्यवस्थेतील एकुणात मागणी ही एकजिनसी आहे असे न मानता त्यात अन्नधान्यादि निकडीच्या वस्तूंना असणारी मागणी व कमी निकडीच्या व चैनीच्या वस्तू यांना असणारी मागणी असे त्याचे दोन भाग आहेत असे मानून विवेचन केले पाहिजे असे माल्थसने मांडले होते हे आपण पूर्वी पाहिले आहे. (याउलट सेचा सिद्धान्त मान्य करणारे अर्थव्यवस्थेतील एकुणात मागणी एकजिनसी आहे असे समजून विवेचन करतात.) तेजीमंदीच्या चक्राचा विचार करणाऱ्यांनीही अर्थव्यवस्थेतील एकुणात मागणी एकजिनशी नसते असे मानून व तिचे विभेद करून आपले विवेजन केलेले आहे. त्यांनी पाडलेले मुख्य भाग म्हणजे भोग्यवस्तूंना असणारी मागणी व उत्पादक वस्तूंना असणारी मागणी हे दोन आहेत. या दोहोंमधील चढउतार एकमेकसापेक्ष व स्वतंत्रपणे कसे होतात, त्यामुळे उत्पा-

दन वगैरे प्रक्रियांवर काय परिणाम होतो यांचाच मुख्यतः विचार या निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी केलेला आहे. यासंबंधीच्या विवेचनांचा साकल्याने विचार करता असे दिसते की यांपैकी काही भोग्यवस्तूंच्या अपुऱ्या मागणीवर भर देतात तर दुसरे उत्पादक वस्तूंच्या मागणीपेक्षा जादा निर्मितीच्या प्रवृत्तीवर भर देतात. एकंदर राष्ट्रीय उत्पन्न (उत्पादन) म्हणजे पूर्वी सांगितलेल्या एका दृष्टीने भोग्यवस्तूंवरील खर्च अधिक उत्पादक गोष्टींवरील खर्च असल्यामुळे, भोग्यवस्तूंवर खर्च न करता लोकांनी नेहमीपेक्षा जादा बचत केली व त्या बचतीचे रूपांतर गुंतवणुकीमार्फत उत्पादन वस्तूंच्या जादा मागणीत व उत्पादनात झाले तर भोग्यवस्तूंना असणारी अपुरी मागणी व उत्पादनवस्तूंची जादा मागणी व उत्पादन म्हणजे एकाच घटिताच्या (phenomenon) दोन बाजू असतात असे लक्षात येते. उत्पादनवस्तूंची जादा निर्मिती ही नेहमीपेक्षा जादा बचतीमुळे—म्हणजे भोग्यवस्तूंवर नेहमीपेक्षा कमी खर्च केल्याने— होते म्हणजेच तिचे वर्णन जादा बचतीची परिस्थिती असेही करता येईल. याचा अर्थ अपुऱ्या मागणीच्या (under–consumption) सिद्धान्तांचे जादा बचतीचे (over–saving) किंवा उत्पादनवस्तूंच्या जादा निर्मितीचे (over–investment) सिद्धान्त असेही वर्णन करता येईल व ते एकाच प्रकारचे असतात असे म्हणता येईल; परंतु त्या त्या सिद्धान्ताचे उद्घोषक तसे मानीत नाहीत. म्हणून त्यांचे विवेचन थोडे तपशिलात जाऊन नोंदविले पाहिजे.

जादा गुंतवणुकीचे (over–investment) सिद्धान्त म्हणून ओळखले जाणारे सिद्धान्त तीन प्रकारचे होते.

(१) पैसा व पतपैसा यांचा व्यवहार करणाऱ्या संस्थांच्या (बँकांच्या वगैरे) व्यवहारपद्धतीमुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादनाच्या वरच्या (उत्पादनवस्तूंच्या) व खालच्या (भोग्यवस्तूंच्या) उत्पादनाच्या स्तरामध्ये असमतोल निर्माण होतो. विक्सेल, हायेक वगैरेंनी केलेले नैसर्गिक व पैशाचे व्याजांचे दर व त्यांच्यातील तफावतीमुळे उत्पादनाच्या संरचनेत व किंमतीत पडणारे फरक यांच्या विवेचनांचा या प्रकारच्या सिद्धान्तात समावेश होतो.

**(२) उत्पादनसाधनांची जादा निर्मिती ही नवीन तांत्रिक शोध, नव्या बाजारांची वाढ वगैरे गोष्टींमुळे होते.** या गोष्टी बहुधा गुच्छाप्रमाणे (bunch) एकदम येतात. कालौघात सतत सारख्या वेगाने येत नाहीत. त्यामुळे उत्पादनसाधनांची जादा निर्मिती होते. पैशाचा संबंध असतोच; परंतु मुख्य प्रेरणा वरील गोष्टी कालौघात गुच्छाप्रमाणे येतात याची असते. कॅसल, शुंपीटर वगैरे मंडळींनी या प्रकारचे सिद्धान्त मांडले आहेत.

**(३) भोग्यवस्तूंच्या उत्पादनातील चढ-उतार हे फार प्रकंपित प्रमाणात उत्पादनसाधनांच्या उत्पादनात प्रतिबिंबित होतात. यासंबंधी अनुजात (derived) मागणीच्या त्वरणाचा (acceleration) व विशालनाचा (expansion) सिद्धान्त महत्त्वाचा आहे.** (उत्पादनसाधनांना असणारी मागणी अनुजात असते, प्रत्यक्ष नसते हे येथे सांगणे नलगे). या सिद्धान्ताप्रमाणे नवीन भांडवलगुंतवणूक (उत्पादनसाधनांवर होणारा खर्च) ही राष्ट्रीय उत्पन्न (उत्पादन) कमीजास्त होण्याचा वेग ज्या दराने बदलतो त्यावर अवलंबून असते. यालाच त्वरण म्हणतात. **आफ्टेलिऑं, क्लार्क, पिगू वगैरे मंडळींनी हा सिद्धान्त मांडलेला आहे.**

अपुऱ्या एकुणात मागणीचे म्हणून ओळखले जाणारे सिद्धान्त दोन प्रकारचे होते.

**(१) तांत्रिक प्रगती व नवे शोध वगैरे कारणांमुळे होणारी भांडवलाची (उत्पादनसाधनांची) बेसुमार वाढ. त्यामुळे मागणीपेक्षा जादा उत्पादन होते—म्हणजेच अपुऱ्या मागणीची परिस्थिती निर्माण होते.**

**(२) काही कारणामुळे अर्थव्यवस्थेतील सर्वसाधारण क्रयशक्तीचा काही भाग अर्थव्यवस्थेतील चलनाभिसरणाच्या ओघात कोठे तरी साकळतो.** त्यामुळे तो ओघ क्षीण होतो. हा साकळलेला भाग लोकांच्या उत्पन्नाच्या रूपाने अर्थव्यवहारात प्रवेश करीत नाही व म्हणून योग्य वस्तूंना मागणी म्हणून प्रकट होत नाही. ते चलन नाहीसे होते किंवा निव्वळ साठविले जाते. त्यामुळे चलनाचा अभिसरण वेग कमी होतो. **या अर्थाने अपुरी मागणी म्हणजे चलनक्षयाच्या (deflation) अवस्थेहून फारशी निराळी नसते हे उघड आहे.**

अपुरी एकुणात मागणी म्हणजे जादा बचत असे समीकरण मांडणाऱ्या या सिद्धान्ताच्या प्रकाराचा आविष्कार बराच झालेला होता. जादा बचतीची प्रवृत्ती निर्माण होण्याचे कारण **हॉबसन याच्या मते समाजातील उत्पन्नाची विषम वाटणी हे होय.** कामगारवर्गाला आपल्या मिळकतीतून फारशी बचत करता येत नाही. अर्थव्यवस्थेतील बहुतेक बचत श्रीमंत मंडळीच करतात. त्यांचे उत्पन्न जसे वाढते तसे त्यांची बचत करण्याची प्रवृत्तीही वाढते. त्यातूनच जादा बचतीचा प्रश्न निर्माण होतो. **समाजातील उत्पन्नाची ही विषम वाटणी कमी झाली व त्यात अधिक प्रमाणात समता आली तर हा प्रश्न सुटेल.**

**जादा गुंतवणुकीचे सिद्धान्त व अपुऱ्या मागणीचे सिद्धान्त यांचे बारकाईने विश्लेषण केले तर एकाच घटिताच्या त्या दोन बाजू आहेत असे दिसते.** जादा गुंतवणुकीच्या सिद्धान्तात

उत्पादनरचनेतील निरनिराळ्या स्तरांमधील असमतोलावर भर दिला जातो, तर अपुऱ्या मागणीच्या सिद्धान्तात उत्पादन-रचनेतील समस्तरावर होणाऱ्या असमतोलावर भर दिला जातो; परंतु हे दोन्ही असमतोलही एकाच घटिताच्या दोन बाजू असतात असे आढळते. प्रत्यक्षात दोन्हीही असमतोल जोडीनेच सापडतात. तेव्हा या दोन सिद्धान्तांचे स्वरूप भिन्न असले तरी अर्थ अगर आशय फारसा निराळा नाही.[3]

[3] G. Haberler, Prosperity and Depression. A Theoretical Analysis of Cyclical Movements, George Allen and Unwin, Londen, 1958, Chapter 3.

वर सांगितलेले विचार तेजीमंदी-चक्राचा उलगडा करण्या-साठी केलेल्या विचारमंथनातून प्रकट झालेले आहेत हे पूर्वी सांगितले आहेच. नवसनातन अर्थशास्त्रात तेजीमंदीचे चक्र म्हणजे अर्थव्यवस्थेची विकृती, प्रकृती नव्हे असे मानले जात होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकृतीसंबंधीचे हे विचार हे अर्थशास्त्राच्या मूलस्रोताच्या बाहेरच राहिले. त्यात ते प्रवेश करू शकले नाहीत. कडेकडेने वाहणारे निरनिराळे प्रवाह असेच त्यांचे स्वरूप राहिले. मूळ प्रवाहाचा भेद करून त्यात ही नवी विचारधारा प्रबल स्वरूपात सोडण्याचे कार्य केन्स यांनी विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात केले.


# ५ सप्टेंबर !

डॉ. राधाकृष्णन् यांचा जन्मदिन-
शिक्षकदिन


सर्व शिक्षकांना विनम्र अभिवादन ।

## विद्या सहकारी बँक लि.

जुन्नरकर दत्तमंदिर इमारत,
कॉमनवेल्थजवळ, लक्ष्मीरोड,
पुणे ३०

प्रा. प. वि. पटवर्धन
अध्यक्ष

# भारतातील सिमेंट उद्योगाची वाटचाल



उद्योग व्यवस्थापन

**प्रा. मा. ल. अंत्रे**
व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख,
संगमनेर महाविद्यालय,
संगमनेर

भारतीय अर्थशास्त्राच्या बी. ए. व बी. कॉमच्या विद्यार्थ्यांना तसेच एम्. ए. च्या 'इंडस्ट्रिअल इकॉनॉमिक्स' विषयाच्या विद्यार्थ्यांना भारतातील प्रमुख उद्योगांची माहिती मिळवून त्यांच्या समस्यांचा अभ्यास करावयाचा असतो. प्रा. अंत्रे ह्यांच्या लेखात सिमेंटउद्योगाची माहिती एकत्रितपणे आली आहे. ह्याच पद्धतीने, वस्त्र, साखर, चहा, लोखंड-पोलाद इ. प्रमुख उद्योगांचीही माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी असा विचार आहे. विद्यार्थ्यांनी त्या दृष्टीने आपल्या सूचना जरूर पाठवाव्या.

---

आजच्या औद्योगिक संस्कृतीच्या युगात नवीन स्वरूपाचे उद्योगधंदे स्थापन करीत असताना सिमेंट आवश्यक व महत्त्वाचा घटक मानला जातो. विशिष्ट राष्ट्राची नव्हे तर, जगाची अर्थव्यवस्था सिमेंट उद्योगावरच आधारित आहे, हे आधुनिक स्वरूपाची धरणे, पूल, इमारती सिमेंटच्या सहाय्याने मूर्त स्वरूप घेतात, यावरून लक्षात येईलच. याव्यतिरिक्त सिमेंटचा वापर फरशा, पाइप्स. टाक्या तसेच आधुनिक स्वरूपाचे जिने यासाठी होत असल्यामुळे सदर उद्योगाला अग्रक्रम देणे भाग पडते. आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत मोठमोठ्या उद्योगधंद्यांना अग्रक्रम दिल्यामुळे उद्योगाचा विकास जलद झाला; परंतु सद्यःपरिस्थितीत सिमेंटचा पुरवठा मागणीच्या मानाने कमी आढळतो. म्हणूनच सिमेंटची मागणी व पुरवठा यांमधील फरक वाढतच आहे. या दृष्टीने त्यात समन्वय घडवून आणणे आवश्यक आहे, हे नाकारता येत नाही.

आपल्या पूर्वजांना सिमेंट हे नाव माहीत नसले तरी घरबांधणीसाठी त्याचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात होता हे मोहेंजोदडो व हडप्पा या संस्कृतींवरून लक्षात येते. ग्रीक लोकांनीसुद्धा सिमेंटचा वापर मोठ्या प्रमाणावर केला होता. आज खाजगी व सार्वजनिक क्षेत्राकडून त्याला जास्त मागणी येत असल्यामुळे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे.

भारतात १९०४ मध्ये मद्रास मध्ये सिमेंट उत्पादनास सुरुवात झाली. परंतु १९१४ पर्यंत या उद्योगाचा विकास फारसा होऊ शकला नाही. याच सुमारास १९१४ मध्ये पोरबंदर येथे 'इंडियन सिमेंट कंपनीने' सिमेंट उद्योगास सुरुवात केली. या कंपनीची उत्पादनक्षमता १००० टन होती. आज भारतात ५८ सिमेंट कारखाने असून त्यांची उत्पादन क्षमता अंदाजे २१ द. ल. टनस् आहे. या उद्योगापैकी ८ उद्योग सार्वजनिक क्षेत्रात आहेत. सिमेंट उद्योगात जवळजवळ ३०० कोटी रुपयांची भांडवल गुंतवणूक झालेली असून ८५ हजार कामगारांना रोजगार उपलब्ध होऊ शकला. त्याचबरोबर सदर उद्योगाने १९७० साली ७५० द. ल. रुपयांची राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकली ती वेगळीच. आज जागतिक उत्पादनाच्या बाबतीत भारताचा नववा क्रमांक लागत असून रशियाचा पहिला क्रमांक लागतो.

कोणत्याही उद्योगाचा अभ्यास करते वेळेस उद्योगाच्या स्थानियीकरणास महत्त्व दिले जाते. ज्या ठिकाणी कच्चा माल (लाइम स्टोन, चुना, जीप्सम व सिमेंटसाठी उपयोगात येणारी माती) मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असेल, अशाच ठिकाणी झालेले आढळते. त्यामुळे कच्चामाल वाहतुकीचा खर्च कमी होण्यास मदत होते. ज्या भागात उच्च दर्जाचा लाइम स्टोन

उपलब्ध आहे अशा पश्चिम व दक्षिण भागात सिमेंट उद्योगांचे केंद्रीकरण झालेले आहे. राज्यवार उद्योगांची संख्या पुढीलप्रमाणे देता येईल.

| राज्य | उद्योगांची संख्या | राज्य | उद्योगांची संख्या |
|---|---|---|---|
| *आंध्र प्रदेश | ६ | *कर्नाटक | ५ |
| आसाम | १ | केरळ | १ |
| *बिहार | ७ | *मध्यप्रदेश | ५ |
| *गुजरात | ५ | महाराष्ट्र | १ |
| हरियाना | २ | ओरिसा | २ |
| जम्मू व काश्मीर | १ | राजस्थान | ४ |
| *तामीळनाडू | ७ | उत्तर प्रदेश | २ |

आंध्रप्रदेश, बिहार, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश व तामीळनाडू या सहा राज्यांत सिमेंटउद्योग मोठ्या प्रमाणावर स्थापन झालेले दिसतात. आपल्या देशातील सिमेंटउद्योगाचा विकास कसा होत गेला हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होईलच.

### सिमेंटउद्योगाच्या विकासाचे मूल्यमापन करणारा तक्ता ( लाख टनात )

| वर्ष | उत्पादनक्षमता | उत्पादन | उत्पादनक्षमतेचा वापर% |
|---|---|---|---|
| १९५१ | ३५·६० | ३२·०० | ८९·९० |
| १९५५ | ४७·३० | ४४·९० | ९४·९० |
| १९६० | ८७·१० | ७८·४० | ९०·०० |
| १९६१ | ८८·७१ | ८३·२४ | ९३·८३ |
| १९६२ | ९२·५२ | ८६·७९ | ९३·८० |
| १९६३ | ९५·०५ | ९६·६६ | ९३·४३ |
| १९६४ | १०४·२५ | ९७·२४ | ९३·२७ |
| १९६५ | ११०·४० | १०५·९२ | ९५·९४ |
| १९६६ | ११६·९१ | ११०·२० | ९४·२६ |
| १९६७ | १२२·७७ | ११२·६४ | ९५·७४ |
| १९६८ | १३८·६४ | ११९·४७ | ८६·१७ |
| १९६९ | १५३·३३ | १३६·२८ | ८८·८८ |
| १९७० | १६७·५८ | १३९·५१ | ८३·२४ |
| १९७१ | १८२·८५ | १४९·४० | ८१·७० |
| १९७२ | १९०·०४ | १५७·०० | ८३·६० |
| १९७३ | १९२·१३ | १४९·६३ | ७७·९० |
| १९७४ | १९४·५२ | १४२·७४ | ७३·३० |

या तक्त्याच्या आधारे सहज लक्षात येते की, उत्पादनक्षमतेच्या प्रमाणात उत्पादनवाढ झालेली नाही. याचाच अर्थ उद्योगाच्या उत्पादनशक्तीचा योग्य असा पूर्ण वापर करण्यात

*संदर्भ : कॉमर्स, जुले १९७५.

आला नाही. पहिल्या पंचवार्षिक योजनेत उत्पादनवाढीचा दर सरासरी १४%, दुसऱ्या योजनेत ११·५% व तिसऱ्या योजनेत ६·४% असा होतो. १९६६-६९ साली ३·७ होता त्यास विभागीय औद्योगिक पीछेहाट हे कारण देता येईलच; परंतु चौथ्या योजनेच्या काळातही उत्पादनवाढीचा वेग ६·२% पेक्षा जास्त नव्हता असे आढळून आले. उद्योगाची उत्पादनक्षमता व प्रत्यक्षात होणारे उत्पादन ह्यातील अंतर सतत कसे वाढत जाते हे वरील तक्त्याच्या आधारे स्पष्ट होते. १९७२ पासून उत्पादनाचे प्रमाण कमी होण्यास खालील परिस्थिती कारणीभूत आहे.

'During the past two or three years either because of power cut, shortage of coal and wagons, or because of squeezing of the profitability, cement production has been lagging behind the installed capacity.'

यावरून असे म्हणता येईल की, वेळोवेळी रेल्वेवॅगन्सचा अपुरा पुरवठा, २० ते २५% वीजकपात, (म. प्रदेश सोडून) कोळशाची टंचाई, क्रूड ऑइलची कमतरता, संप, तसेच कच्च्या मालाची कमतरता इ. अनेक कारणांमुळे उत्पादन सतत घटत चाललेले आहे. १९७३ साली वरील कारणांमुळे उत्पादनखर्च वाढल्यामुळे चवथ्या पंचवार्षिक योजनेत सिमेंट–उत्पादनाचे ध्येय साध्य करता आले नाही. याशिवाय काही उद्योगांनी याच योजनेच्या काळात सिमेंटचे उत्पादन बंद करून दुसऱ्या वस्तूंच्या ( साखर, कागद इ. ) उत्पादनास सुरुवात केली.

गतिमान अर्थव्यवस्थेत सातत्याने बदल होत असल्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत सिमेंट–उद्योगाचे महत्त्व वाढले आहे. अविकसित राष्ट्रांना औद्योगिक विकास साध्य करून घेण्यासाठी सिमेंटची गरज महत्त्वाची मानली जाते. जागतिक उत्पादनात रशियाचा पहिला क्रमांक आहे.

### जागतिक उत्पादनातील निवडक देश (१९७०)

| देश | उत्पादन ( द. ल. टनात ) |
|---|---|
| रशिया | ८९·४ |
| अमेरिका | ७०·५ |
| जपान | ४८·१ |
| प. जर्मनी | ३६·७ |
| इटली | ३१·५ |
| फ्रान्स | २८·१ |
| इंग्लंड | १७·९ |
| भारत | १३·९ |
| स्पेन | १५·९ |

वरील तक्त्याच्या आधारे १९७० साली जगातील इतर राष्ट्रांनी किती उत्पादन केले त्याची सद्यःस्थिती दर्शविली आहे. आज त्या उत्पादनात वाढ निश्चित झालेली असेल तरी पण इतर देशांशी तुलना करता आपले सिमेंट–उत्पादन फारच कमी आढळते. पंचवार्षिक योजनेच्या काळातील सिमेंट–उत्पादनाची परिस्थिती निराशजनकच आहे. नियोजनमंडळाने पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळातील सिमेंट–उत्पादनाचे ध्येय २५ द. ल. टन ठरविले आहे. सिमेंट–उद्योगात नफ्याचे प्रमाण कमी असल्यामुळे नवीन भांडवल–गुंतवणुकीस पायबंद बसतो. सिमेंट उत्पादक संघटनेने ( Cement manufacturers' Association ) सिमेंट निर्माण करणाऱ्या १७ कंपन्यांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून खालील प्रकारचे मत मांडले आहे.

"... It shows that upto the year 1967–68, as many as 16 were making profits after depreciation and tax. This number declined to 15 in 1969–70, to 12 in 1971–72 and to 7 in 1972–73. The aggregate profits of these companies after depreciation and tax declined from Rs. 10·98 crores in 1970–71 to Rs. 1·63 crores in 1972–73."

यावरून उद्योगाची वाटचाल कशी आहे हे लक्षात येईलच. म्हणूनच सिमेंट–उद्योगाच्या विकासास चालना देणे आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे.

भारतातील सिमेंटवापराचा दर माणशी उपभोग इतर निवडक देशांशी तुलना केल्यास फारच कमी आढळतो. या बाबतीत भारताचा जगात १५ वा क्रमांक लागतो. ही तुलनात्मक परिस्थिती पुढील तक्त्यात निर्देशित केली आहे.

## निवडक देशांतील सिमेंटचा दर माणशी उपभोग

| देश | दर माणशी उपभोग किलोत | देश | दर माणशी उपभोग किलोत |
|---|---|---|---|
| स्विझरलॅन्ड | ७१५ | कॅनडा | ३०६ |
| ऑस्ट्रिया | ५९३ | नेदरलॅंड | ३७६ |
| प. जर्मनी | ५६३ | स्पेन | ३७७ |
| स्वीडन | ४८१ | जपान | ३६५ |
| बेल्जम | ४६३ | रशिया | ३४३ |
| फ्रान्स | ४५७ | अमेरिका | ३४२ |
| इटली | ४२६ | इंग्लंड | ३०५ |
| भारत | ०२६ | | |

टीप : भारतातील लोकसंख्या जास्त असल्यामुळे दरमाणशी सिमेंटच्या उपयोगाचे प्रमाण कमी आढळेल; पण ही तुलना उद्‌बोधक आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय सिमेंट हलक्या प्रतीचे मानले जाते. भारत काही अविकसित राष्ट्रांना सिमेंट निर्यात करीत असून आर्थिक विकासाला परकीय चलन मिळवून देत आहे. इतर राष्ट्रांत सिमेंटची मागणी वाढत असल्यामुळे भारत सरकारने १९६८ नंतर सिमेंटनिर्यातीला उत्तेजन व मदत देण्याचे ठरविले आहे. आज राज्य व्यापार महामंडळाने निर्यातीचे काम आपल्याकडे घेतले आहे. आज सिमेंटचा विदेशी व्यापार फायदेशीर असाच आहे. भारत सरकारने १९७३–७४ साली २·२ कोटींचे परकीय चलन मिळविले होते. १९७४–७५ मध्ये २·८२ लाख टन सिमेंट निर्यात करून ९·५ कोटी रुपये परकीय चलन मिळविले आहे. चालू वर्षी २५ कोटी रुपये किंमतीच्या सिमेंटच्या निर्यातीचे करार केल्याचे समजते.

भारत सरकार निर्माण होणाऱ्या सिमेंटच्या किंमती ठरवून देते. १९६८ साली भारत सरकारने एक टन सिमेंटची किंमत ( उत्पादन व सिमेंट पॅकेजिंग धरून ) १७२·५ रुपये ठरविण्यात आली. हीच किंमत १९७३ पासून २१३·१३ रुपये केली आहे. कारण कच्चा माल, वाहतूकखर्च, श्रमिकांचे वेतन या सर्व खर्चात वाढ झाल्यामुळे उत्पादनखर्चात वाढ झाली. प्रत्येक उद्योगात ५०% सिमेंट खुल्या बाजारात विकता येत असून ४५% सरकारी खात्यास सरकारी करारानुसार व ५% इतर. अशा प्रकारे उत्पादित सिमेंटची विभागणी होत असते. उत्पादकांनी उत्पादन केलेल्या सिमेंटच्या वितरणामध्ये व किंमतीमध्ये समन्वय साधण्यासाठी 'सिमेंट अलोकेशन अँन्ड कोऑर्डिनेटिंग ऑर्गनायझेशन' ही संघटना स्थापन केली. सिमेंट–वाटपाचे काम याच संघटनेकडे आहे. या संघटनेद्वारे ५०% सिमेंट सार्वजनिक क्षेत्रासाठी, १०% प्रमुख व आधारभूत, १०% निमसरकारी क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात येत असून ३०% परवाने असणाऱ्या दुकानांमार्फत विकण्यात येते. आज सिमेंट–उद्योगाच्या विकासासाठी सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया स्थापन केलेली असून सार्वजनिक क्षेत्रात नवीन कारखाने उभारणे, परवाने देणे व नियंत्रण अशा प्रकारची कामे महामंडळाला करावी लागतात. आज देशात सर्वांत मोठी सिमेंट कंपनी 'दि असोसिएटेड सिमेंट कंपनी' ही असून त्यानंतर दि इंडियन सिमेंटस् लि., दि जयपूर उद्योग लि., श्री दिग्वजय सिमेंट कं. लि., बिर्ला सिमेंट मॅन्यु. कं. लि., सौराष्ट्र सिमेंट अँन्ड केमिकल्स इंडस्ट्रीज लि., डालमिया सिमेंट

लि., म्हैसूर सिमेंटस् लि., ओरिसा सिमेंटस् लि. यांचा क्रमांक लागतो.

आज सिमेंट उद्योगास पुढील प्रश्न भेडसावीत आहेत हे नमूद करावेसे वाटते.

**(१) यंत्रसामुग्रीचा प्रश्न :** सिमेंट उद्योगाच्या बाबतीत यंत्रसामुग्रीचा प्रश्न महत्त्वाचा आहे. आपल्या देशात अलीकडेच निर्मितीस आवश्यक असणाऱ्या यंत्रांची निर्मिती करण्याचे कार्य सुरू केले आहे; परंतु त्यांच्या उत्पादनामुळे उद्योगाची वाढती गरज पूर्ण होत नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे साहजिकच जुन्या यंत्रांच्या मदतीने उत्पादन करावे लागते. आपल्या देशात निर्माण केलेल्या यंत्राची किंमत आयात केलेल्या यंत्राच्या किंमतीपेक्षा जास्त येत असल्यामुळे उद्योगापुढे पेचप्रसंग निर्माण झाला आहे. म्हणूनच भारत सरकारने यंत्रसामुग्री आयात करण्याचे परवाने दिले आहेत. जुनाट यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने उत्पादन कमी होत असल्यामुळे सिमेंटची याविषयी एकूण मागणी पूर्ण होऊ शकत नाही याविषयी दि टॅरिफ कमिशनने (१९७२) खालील प्रकारचे मत मांडले आहे. 'The need for maximising production of Cement was more pressing than over, and modernising and renovating old plant and machinery' had become imperative to fully utilise the existing plants.'

**(१) सिमेंटचे अयोग्य वाटप :** सिमेंटची मागणी विविध घटकाकडून येत असते. आपल्या देशातील सिमेंट–उत्पादन मूलतः कमी आहे असा पूर्वग्रह उपभोक्त्यांच्या मनात रुजला आहे. त्यामुळे साहजिकच जास्त किंमतीला सिमेंट खरेदी केले जाते. वास्तविक सिमेंटची मागणी फारच कमी असते. आपल्या सिमेंट–परवाना–पद्धतीत अनेक स्वरूपाचे दोष आहेत. सिमेंटची टंचाई निर्माण करून जास्त किंमत मिळविणे हे उदाहरण व्यापारी प्रवृत्ती दर्शवीत आहे. म्हणूनच सिमेंटवर नियंत्रण लादण्यात आले आहे. आज सिमेंटचे योग्य प्रकारे वाटप केले जाते.

**(३) सिमेंटची नासधूस :** आपल्या देशात निर्माण होणाऱ्या सिमेंटचे संवेष्टन अयोग्य असल्यामुळे हजारो टन सिमेंट वाया जाते. म्हणूनच सिमेंट वेष्टनाची समस्या महत्त्वाची मानली जाते. सिमेंटचे पोते अत्यंत पातळ असल्यामुळे वाहतुकीच्या वेळेस सिमेंट वाया जाते. यासाठीच प्रत्येक सिमेंटच्या पोत्यात प्लॅस्टिकच्या पिशव्या असल्यास नासधूस होणार नाही. सिमेंटचे संवेष्टन उच्च व चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक झाले आहे.

**(४) सिमेंटच्या वाहतुकीचा प्रश्न :** सिमेंट उद्योगाचे स्थायिकीकरण विशेषतः कच्चा माल जवळच झाल्यामुळे सिमेंटची वाहतूक इतर ठिकाणी करावी लागते. त्यात वेळोवेळी रेल्वेवॅगन्सची टंचाई व वाहतूकखर्च जास्त यामुळे उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. म्हणूनच सिमेंटच्या वाहतुकीसाठी रेल्वेवाहतुकीचे दर कमी असणे आवश्यक आहे. सिमेंट वाहतूकीस रेल्वेवॅगन्सचा योग्य पुरवठा होणे उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**(५) सिमेंट किंमतीचा प्रश्न :** भारतात सर्वच वस्तूंच्या किंमती वाढतात. सिमेंट उत्पादनास आवश्यक असणारा कच्चा माल, वाहतूक, मजुरी, गोदाम इ. अनेकांच्या खर्चात वाढ झालेली असल्यामुळे उत्पादनखर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन सिमेंटच्या किंमतीतही वाढ झालेली आढळते. सिमेंटची कृत्रिम टंचाई निर्माण केल्यास जादा किंमत मिळते. म्हणूनच भारत सरकारने सिमेंटचे भाव खालच्या पातळीवर नियंत्रित केले.

**(६) कच्च्या मालाची कमतरता :** सिमेंटच्या उत्पादनास कोळसा, चुना, जिप्सम व लाइमस्टोन हा कच्चा माल आवश्यक असतो. परंतु त्याची उपलब्धता कमी असल्यामुळे त्यासंबंधी नवीन शोध घेणे आवश्यक झाले.

सारांश : आर्थिक विकास साध्य करण्यासाठी विविध उद्योगधंदे स्थापन करावे लागतात. शेतीसारख्या क्षेत्रात पाटबंधाऱ्यासारख्या योजना राबविणे आवश्यक असते. त्याच प्रकारे बळकट अशा इमारतीच्या बांधणीसाठी सिमेंट मुख्य घटक आहे. त्यासाठी सिमेंटच्या अधिक उत्पादनास चालना दिल्यास भारतासारख्या विकसनशील देशातील मागणी पूर्ण होईल. आयात, मागणी व पुरवठा यात समन्वय घडवून आणणे महत्त्वाचे आहे. जुनाट यंत्राच्या मदतीने उत्पादन केल्यामुळे उत्पादन-खर्च वाढून नफ्याचे प्रमाण घटते. परिणामी भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण कमी होते म्हणूनच भारत सरकारने अधिक भांडवल गुंतवणूकीस चालना देणे आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

❋

---

संदर्भ–ग्रंथ


(1) India–1974,

(2) The Report on currency and Finance, Reserve Bank of India–1973.

(3) The Times of India Directory and year-book–1974–75

(4) Commerce, July 26, 1975.

# उद्योग वार्ता

**प्रा. प्र. वि. सोवनी**

## खेळांच्या साहित्याची परदेशी निर्यात

नव्या दिल्लीतील ट्रेड डेव्हलपमेंट ॲथॉरिटीच्या सर्वेक्षण समूहाने युरोपातील बाजारपेठांची पाहाणी केली. त्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून **भारतीय खेळ-साहित्याला परदेशांत चांगली मागणी येऊ शकेल व हे क्षेत्र पद्धतशीर प्रयत्न करून काबीज करण्यासारखे आहे असे दिसून येते.**

भारतातून ६० हून अधिक देशांकडे खेळांचे साहित्य रवाना होते. त्यामध्ये इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान, कॅनडा, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, स्वीडन, पोलंड, न्यूझीलंड, इटली, बल्गेरिया यांसारखे पुढारलेले देश आहेत. **निर्यात होणाऱ्या मालांपैकी सर्वांत मोठा वाटा फुटबॉलचा,** (सुमारे ४० टक्के इतका) आहे. इतर मालांत टेनिस व बॅडमिंटन रॅकेट्स, हॉकी स्टिक्स, क्रिकेट बॅटी आणि क्रिकेट व हॉकीचे बॉल्स यांचा समावेश होतो. **१९६९–७० मध्ये खेळांच्या साहित्याची निर्यात १ कोटी ३५ लक्ष रु. ची झाली होती.** हा आकडा वाढत वाढत गेल्या वर्षी म्हणजे **१९७३–७४ मध्ये तो ६ कोटी रु. वर गेला आहे.**

अलीकडे गेल्या दोन-तीन वर्षांत स्वित्झर्लंड या देशातही भारतातून वाढत्या प्रमाणात खेळ-साहित्याची निर्यात होऊ लागली आहे. १९७२–७३ मध्ये या देशाने भारतातून फक्त साडेतेरा हजार रु. चे क्रीडा-साहित्य खरेदी केले होते, तर त्याच्या पुढच्याच वर्षी १९७३–७४ मध्ये हा आकडा एकदम वाढून साडेचार लाख रु. वर गेला. स्वित्झर्लंडमध्ये फार मोठ्या प्रमाणावर क्रीडा-साहित्याची आयात होत असते. १९७३ मध्ये या देशाने १० कोटी स्विस फ्रँक किंमतीच्या क्रीडा-साहित्याची एकूण आयात केली होती. त्याचा अर्थ असा की भारताने नेटाने प्रयत्न केल्यास स्वित्झर्लंडमध्ये भारतीय क्रीडा-साहित्याचा खप खूपच मोठ्या प्रमाणात वाढू शकेल. **स्वित्झर्लंड हो युरोपची क्रीडाभूमी समजली जाते.** विशेषत: हिवाळ्यात स्किईंग आणि उन्हाळ्यात इतर फुटबॉल, टेनिस इत्यादी खेळ या देशांत फार मोठ्या प्रमाणावर चालू असतात. स्वित्झर्लंडमध्ये दरवर्षी आयात होणाऱ्या क्रीडा-साहित्यामध्ये भारतीय साहित्याचा वाटा १९७३ मध्ये अवघा ०·२ टक्के होता, तो १९७४ मध्ये २ टक्क्यांपर्यंत वाढला आहे; पण हा वाटा अजून किती तरी पटींनी वाढण्यास वाव आहे.

## ॲल्युमिनियमच्या वीजवाहक तारा

भारताच्या औद्योगीकरणाबरोबर विजेचे उत्पादन आणि विजेचा वापर झपाट्याने होत आहे. वीजकेंद्रात निर्माण झालेली वीज जागोजागी कारखान्यात आणि खेडोपाडी पोचवावयाची म्हणजे त्यासाठी वीजवाहक तारांचीही गरज वाढत्या प्रमाणावर लागणार हे उघड आहे. **वीजवाहतुकीच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट धातू म्हणजे चांदी;** पण चांदीची किंमत इतकी प्रचंड आहे की कोणत्याही देशाला चांदीच्या तारा करणे परवडणारे नाही. **चांदीच्या खालोखाल उत्कृष्ट धातू म्हणजे तांबे** आणि आजपर्यंत सर्वत्र तांब्याचाच वापर वीज-वहाळीसाठी होत आलेला आहे; पण भारतात ताम्रधातुका-चीही फार मोठी वाण असल्यामुळे भारताला तांब्याच्या तारा-सुद्धा परवडणाऱ्या नाहीत. त्या मानाने **भारताजवळ बॉक्साइटचा म्हणजे ॲल्युमिनियमच्या धातुकाचे विपुल साठे असल्यामुळे वीजवाहतुकीसाठी थोड्या निकृष्ट असल्या तरी न गंजणाऱ्या आणि खूपच स्वस्त अशा टिकाऊ ॲल्युमिनि-यमच्या तारांचा वापर वीजवहाळीसाठी करण्याचे धोरण अंगीकारण्यात आले आहे.**

सुमारे २५ वर्षांपूर्वी भारतात ॲल्युमिनियमच्या वीजवाहक

केबलचे उत्पादन करण्याच्या उद्देशाने 'ॲलिड' (ॲल्युमिनियम इंडस्ट्रीज लिमिटेड) या कंपनीची स्थापना करण्यात आली. सुरुवातीचे उत्पादनाचे उद्दिष्ट वार्षिक १५०० टन वीजवाहक केबलचे होते; पण वाढत्या वीजउत्पादनाबरोबर तारांची मागणी वाढू लागली तसतसे या कारखान्याचे उत्पादनही वाढत राहून ते आता वार्षिक १८ टनांवर गेले आहे.

'ॲलिड' कंपनीचा मुख्य कारखाना आणि कार्यालय केरळ प्रदेशात क्विलॉन या शहरापासून १३ किलोमीटर अंतरावर असलेल्या 'कुंदारा' या ठिकाणी आहे. या कारखान्यात प्लॅस्टिकचे जाड आवरण दिलेल्या ॲल्युमिनियम केबल्स, तसेच खांबावरून नेण्याच्या वीजवाहक तारा, कांबी इत्यादींचे उत्पादन होते. कुंदारा केबल्स या कारखान्याशेजारीच जपानी कोकोकू आयर्न ॲण्ड स्टील कंपनीच्या तांत्रिक सहकार्याने उभारलेला या कंपनीचा पोलादी तारा तयार करण्याचा कारखाना आहे. ॲल्युमिनियमच्या वीजवाहक केबल्समध्ये मजबुतीसाठी या पोलादी तारांचे वळलेले दोरखंड गाभ्यासारखे वापरलेले असतात.

भारतात इतरही अनेक महत्त्वाच्या जागी ॲलिड कंपनीचे कारखाने आहेत. त्या कारखान्यांतून ई. सी. दर्जाचे ॲल्युमिनियम रॉड्स, पोलादी तारांनी मजबुती आणलेल्या ॲल्युमिनियम केबल्स, पूर्णतः ॲल्युमिनियमचेच असणारे वीजवाहक, वीजरोधी वेष्टण असलेल्या (इन्सुलेटेड) ॲल्युमिनियम तारा, विविध प्रकारच्या आणि व्यासाच्या पोलादी व ॲल्युमिनियमच्या तारा तयार करण्याची यंत्रसामग्री, उच्च दाबाचे स्विचगिअर इत्यादी विद्युत्सामग्रीचे उत्पादन होत आहे.

ओरिसा प्रदेशात हिराकुड येथे ॲलिड कंपनीचा ॲल्युमिनियम वाहकतारांचा एक कारखाना आहे. आंध्र प्रदेशातील हैद्राबाद येथे जपानच्या मियाशाकी आयर्न ॲण्ड स्टील वर्क्स कंपनीच्या तांत्रिक सहकार्याने उभारलेला तारा तयार करण्याच्या यंत्रसामुग्रीचे उत्पादन करणारा कारखाना आहे. केरळ प्रदेशातील अलेप्पी गावानजीक मन्नार येथे ॲलिड कंपनीच्या एका विभागाचा हायव्होल्टेज सर्किट ब्रेकर, उच्च दाबाचे ट्रॅन्सफॉर्मर इत्यादी वीजसामग्री तयार करण्याचा कारखाना आहे.

ॲलिड कंपनीने गेल्या ८-१० वर्षांपासून परदेशातही वीजवाहक तारांची निर्यात करण्यास सुरुवात केली आहे व हे निर्यातीचे प्रमाण सतत वाढत आहे. १९६२ मध्ये या कंपनीने प्रथम श्रीलंका येथे तारांची निर्यात केली. त्यानंतर आग्नेय आशियातील देश, पश्चिम आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, द. अमेरिका इत्यादी अनेक देशांतून ॲल्युमिनियम केबल्स आणि इतर वीजवाहक तारांची निर्यात केली जात आहे. १९७२-७३ या वर्षी हा निर्यातीचा आकडा ४० लक्ष रु. वर गेला होता. गेल्या १० वर्षांत या निर्यातीतून कंपनीने एकूण ११। कोटी रु. चे परकीय चलन मिळवले आहे. आता फिलिपाइन्स, लिबिया, झांबिया, टांझानिया इत्यादी देशांतूनही कंपनीच्या मालासा मागणी आली आहे.

## भारतातून कोयनेलची निर्यात

गेल्या १०० वर्षांपासून भारतात कोयनेल (क्विनाइन)चे उत्पादन सुरू आहे. तामिळनाडू (पूर्वीचे मद्रास) प्रदेशातील निलगिरी टेकड्यांवर त्याचप्रमाणे बंगालमध्ये दार्जिलिंग जिल्ह्यात १८६० पासून सिंकोना (कोयनेल) वनस्पतीची लागवड करण्यात येत आहे. त्यानंतर थोड्याच वर्षांत प. बंगालमध्ये मुंगपू आणि तामिळनाडूत मदुवट्टम् या दोन ठिकाणी क्विनाइन तयार करण्याचे कारखानेही सुरू झाले. या कारखान्यात क्विनाइन सल्फेट, क्विनाइन हायड्रोक्लोराइड, टोटाक्विना, सिंकोना फेब्रिफ्यूज इत्यादी अनेक औषधी रासायनिक द्रव्ये तयार होत असतात. सध्या भारतात क्विनाइन औषधी पदार्थांच्या उत्पादनाचे तीन मोठे कारखाने असून त्यांच्यांतून सालिना उत्पादन सुमारे ३९हजार किलोग्रॅम इतके होत असते.

तामिळनाडू सरकारने क्विनाइनचे औद्योगिक प्रमाणावर उत्पादन करणे आणि निर्यात यासाठी एक स्वतंत्र 'सिंकोना खाते' स्थापन केले आहे. या खात्यातर्फे प्रामुख्याने क्विनाइन सल्फेट, क्विनाइन हायड्रोक्लोराइड आणि क्विनिडीन सल्फेट या तीन औषधी द्रव्यांची निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते. याशिवाय क्विनाइन बायसल्फेट व क्विनाइनची इतर संयुगे यांची मागणी आल्यास पुरवठा करण्याची तयारी ठेवलेली आहे. गेल्या पाच वर्षांत क्विनाइन औषधी द्रव्यांच्या निर्यातीमधून या खात्याने सुमारे पावणेदोन कोटी रु. चे परकीय चलन मिळवले आहे.

## विक्रमी कापूस-उत्पादन

कर्नाटक प्रदेशातील रायचूर जिल्ह्यात १९७३-७४ या वर्षी एकूण १ लक्ष ३६ हजार हेक्टर जमिनीत कापसाचे पीक घेण्यात आले. त्यापासून ४ लक्ष गाठी कापूस उत्पादन

झाले. या उत्पादनाची किंमत ८० कोटी रु. हून अधिक होते. आता या जिल्ह्यातील शेतकरी जुन्या जातीबरोबरच हम्पी, लक्ष्मी, जयधारा, एच-वाय-४ यासारख्या नवीन सुधारित जातींच्या कापसाचीही लागवड करीत आहेत. त्यामुळे कापसाच्या दर्जातही खूपच सुधारणा झाली आहे.

---

## व्यवस्थापनाचे मानवतेशी कसे असे नाते ?

व्यवस्थापनाचे मानवतेशी कसे असे नाते ?
मानवतेचे वैशिष्ट्य मानले जाते त्याते !
उपरि वैशिष्ट्याचा दाखला असे कसा,
मानव इतर प्राणिमात्राहूनो वेगळा असे जसा
मानवाचे हे वेगळेपण असे कशात,
ते असे त्याचे बुद्धिमत्तेत !
मानवी बुद्धिमत्तेची अभिव्यक्ति होई कशात,
ती होतसे त्याचे व्यवस्थापनकौशल्यात
मानवी जीवनसाफल्याचे बीज असे कशात
ते असे त्याचे उत्पादकतेच्या पूर्तीत.
उत्पादकतेची यशस्वी पूर्ति होई कशाने
होई ती मानव्य, अर्थ, यंत्र नि साधनसामुग्रीमूल्याचे
सुसंकलनाने
उत्पादकता मूल्यांचे साधर्म्य असे कशासी
ते असे मानवी शरीरस्थ अवयवांशी.
मानवी मेंदू हा असे व्यवस्थापनेचा केन्द्रबिंदू,
नेत्र दर्शविती आर्थिक परिस्थतीचा ताळेबंदू.
हस्त पाद होती यंत्र नि साधनसामुग्रीक,
नाक, कान, मुख नि हृदय करिती मानवी मूल्याची जपणूक,
आर्थिक ताळेबंद व्यवस्थापनाचा असलेने अग्रदूत,
युक्त असे अध्ययन–मनन ' अर्थ ' विषयांचे सतत.
' अर्थ ' नियतकालिकाचे आद्य संस्थापकासी करुनी अभिवादन,
करू या नवोदित ' अर्थ ' मासिकाचे सदैव अभीष्टचिंतन !

श्री. आर. डी. कुलकर्णी, अक्कलकोट
[ अर्थचे एक जुने वाचक ]

---

॥ श्री ॥

संपादक ' अर्थ ' मासिक, ६९० शिवाजीनगर, पुणे ४

स. न. वि. वि.

आपल्या अर्थ मासिकाचा मी / आम्ही वर्गणीदार होऊ इच्छितो.

कृपया ______________ महिन्यापासून अंक पाठविणेस सुरुवात करावी. कळावे.

व्यक्ती वा संस्थेचे नाव ______________

पत्ता ______________

ठिकाण ______________ दिनांक ______________

आवेदक

**शेती ग्रामीण उद्योग सहकार**

# वस्तुरूप शेतसारा योजना

**प्रा. एस्. एन्. माने**
अर्थशास्त्रविभागप्रमुख, बळवंत कॉलेज, विटे

प्रा. माने ह्यांनी डॉ. ए. सी. अँग्रिश ह्यांच्या 'डायरेक्ट टॅक्सेशन ऑफ ॲग्रिकल्चर इन इंडिया' या ग्रंथाच्या समीक्षणाच्या अनुरोधाने वस्तुरूप जमीनमहसुलाची योजना भारतात कितपत योग्य ठरेल ह्याविषयीची विस्तृत चर्चा ह्या लेखात सादर केली आहे. शेतीविषयक करपद्धतीत कोणत्या सुधारणा होणे शक्य आहे हे समजावून घेण्यास ह्या चर्चेचा उपयोग होईल.

पैशाला पारदर्शक पडदा म्हटले तर कराला वस्तू व सेवा यांच्यावरील मागणीच्या स्वरूपातील पैशाच्या स्वामित्वाचे फेरवाटप करण्याचे साधन म्हणावे लागेल; मात्र पीटरला केवळ पैसे देण्यासाठी पॉलवर कर लादणे समर्थनीय ठरत नाही. आधुनिक आर्थिक सिद्धान्तामध्ये सरकारचे करविषयक धोरण महत्त्वपूर्ण ठरत आहे. आधुनिक राज्यसंस्था कल्याणकारी आहे. कर हा त्या आर्थिक कल्याणाचा अविच्छिन्न भाग आहे. आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यांवर असलेल्या देशात आर्थिक विकासाच्या कार्यक्रमामुळे नक्त राष्ट्रीय उत्पन्न वाढत जाते. किंबहुना ते वाढले पाहिजे. त्याशिवाय कर समर्थनीय ठरत नाहीत; परंतु त्या विकासकार्यक्रमाचा दुसरा एक परिणाम अनुभवास येतो.. त्या विकासाची अधिकतर फळे थोड्या सधन व्यक्तीपुरतीच मर्यादित होतात. विशेषत: भारतासारख्या अर्धविकसित अर्थव्यवस्थेच्या देशात याचा अपरिहार्यपणे अनुभव येत आहे. राष्ट्रीय उत्पन्न वाढले असले तरी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा त्यामधील हिस्सा घटण्याची प्रवृत्ती दिसते. म्हणून आर्थिक विकासातून किंवा त्याबरोबर निर्माण होणाऱ्या या शापावर उःशाप शोधण्याची जोखीम स्वाभाविकपणेच अर्थशास्त्रज्ञावर पडते; परंतु तो उःशाप शोधताना आर्थिक विकासाला प्रतिरोध करणाऱ्या प्रक्रिया निर्माण होणार नाहीत याविषयी त्याला दक्षता घ्यावी लागते. अन्यथा, वस्तू व सेवा यांच्यावरील मागणीच्या स्वरूपातील पैशाच्या स्वामित्वाचे वाजवी फेरवाटप करण्याचे करविषयक धोरणाचे उद्दिष्ट गाठता येणार नाही. धनोत्पादनसाधनाची वाण असलेल्या भारतातील करारोपणावरील ही मर्यादा ध्यानात घेऊन अलीकडे काही अर्थतज्ज्ञांनी करविषयक धोरणात काही बदल सुचविले आहेत. कंपनीच्या नफ्यावरील कराऐवजी कंपनीच्या खर्चावरील कर, उणे उत्पन्न कर किंवा प्रोत्साहक-हमीयं जमा (Incentive–Guaranteed Income Plan) आणि मूल्यबेरजेनुसार कर (Value–Added Tax) यांचा निर्देश करता येईल. या संदर्भात भारतातील धनोत्पादनसाधनांची वाण ध्यानात घेऊन शेतीच्या क्षेत्रातील प्रचलित करमध्ये आवश्यकतेनुसार बदल करून साधनसामुग्रीचे प्रवाहीकरण करण्यासाठी त्या करांची क्षमता वाढविण्यास बराच वाव आहे असे डॉ. अँग्रिश* यांचे प्रतिपादन आहे. आपल्या ग्रंथाचा हेतु स्पष्ट करताना डॉ. अँग्रिश म्हणतात, 'प्रस्तुत ग्रंथ म्हणजे, देशासाठी शेतीविषयक प्रत्यक्ष करांची विवेकाधिष्ठित अशी एक योजना सुचविण्याच्या हेतूने करारोपणाची आधुनिक तत्त्वे व देशाच्या आर्थिक विकासाच्या गरजा यांच्या अनुरोधाने शेतीविषयक प्रत्यक्ष करांच्या विविध रूपांचे पृथःकरण करण्याचा हा विनम्र प्रयत्न होय.' (प्रस्तावना : पृ. VII).

* अँग्रिश ए. सी. : डायरेक्ट टॅक्सेशन ऑफ ॲग्रिकल्चर इन इंडिया (वुइथ स्पेशल रेफरन्स टु लँड रेव्हिन्यू अँड ॲग्रिकल्चरल इनकम टॅक्स); सोमय्या पब्लिकेशन्स प्रा. व्हेट लि.; बाँबे–न्यू देहली, १९७२; प्रकरणे ९, पृ. ३३९, कि. रु. २५·००.

अलीकडे जमीनमहसूल नष्ट करावा अशी मागणी वारंवार पुढे येत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. अँग्रिश यांचा प्रस्तुत

झाले

व इगदी योग्य वेळी प्रसिद्ध झाला असे म्हणावे लागेल. कारण इतर क्षेत्रातील करांशी तुलना करता शेतीविषयक करपद्धती बरीच अपरिवर्तनीय व प्रतिगामी ठरत असताना जमीनमहसूल नष्ट करणे गैरवाजवी आहे. त्यात काही बदल करावयाचाच असेल तर किमत, उत्पादन व उत्पन्न तसेच व्यापाराच्या अनुकूल अटी, आंतरविभागीय सम्यकता व सार्वजनिक खर्चाचे फायदे' यांच्या आधारे जमीनमहसुलाचा दर वाढविणे अत्यावश्यक आहे असा डॉ. अँग्रिश यांचा दावा आहे आणि शेतीविषयक प्रत्यक्ष करांवरील काही मोजक्या ग्रंथांच्या तुलनेने हे या ग्रंथांचे एक वैशिष्टय आहे असे म्हणावयास हरकत नाही; परंतु या ग्रंथाचे ठळक वैशिष्टय कोणते असेल तर ते म्हणजे डॉ. अँग्रिशनी वस्तूरूप जमीनमहसूल गोळा करण्याची (In–kind Collection of Land Revenue) केलेली शिफारस होय. कारण डॉ. इ. टी. मॅथ्यू (अॅग्रिकल्चरल टॅक्सेशन अॅंड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट इन इंडिया, १९६८) किंवा भारतीय रिझर्व बँकेच्या पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या १९६४ मधील अभ्यासाचा निष्कर्ष शेतीवरील कारभाराचे न्यून प्रमाण प्रस्थापित करण्यास पुरेसे आहेत. म्हणून डॉ. अँग्रिश यांच्या वस्तूरूप जमीनमहसुलाविषयीचा निष्कर्ष कितपत सरस व समर्थनीय ठरेल याचा विचार करण्यापूर्वी ते त्या निष्कर्षाप्रत कसे आले याविषयी संक्षेपाने पाहाणे आवश्यक ठरते.

ग्रंथाची एकूण ९ प्रकरणे असून त्यांची ३ भागांत विभागणी करण्यात आली आहे.

पहिल्या भागात भारतातील शेतीविषयक कर (जमीनमहसूल व शेतीविषयक उत्पन्न–कर) कसे उत्क्रांत होत गेले याची चर्चा करण्यात आली आहे. वैदिक काळात जमिनीची व्यक्तिगत मालकी हक्काची पद्धती प्रचलित होती. शेती कसणाऱ्या जमीनमालकाकडून 'बली' (Bali) हा सक्तीचा कर वसूल करण्यात येत असे. त्या काळाला अनुसरून तो कर धान्य किंवा गुरेढोरे यांच्या स्वरूपात दिला व घेतला जाई. पुढे मुगल अमदानीत अकबराने तोडरमल व मुझाफर खान यांच्या मदतीने जमिनीच्या उत्पादकतेच्या आधारे जमीनमहसूल निश्चित केला. त्यासाठी 'चांगली,' 'मध्यम,' व 'वाईट' असे जमिनीचे वर्गीकरण करण्यात येई. बिघा हे प्रत्येक प्रकारच्या जमिनीचे परिमाण ठरविण्यात येई. तीन बिघ्यातून येणारे उत्पादन एकत्रित करून जी सरासरी येईल तिचा ⅓ भाग राजाकडे जमा होई. जमीनमहसूल तो हाच. पुढे भारत इंग्लंडची वसाहत झाली. ईस्ट इंडिया कंपनीने १७६५ मध्ये बंगाल, बिहार व ओरिसाची दिवाणी मिळविली. कंपनीने जमीनदारांकडील जमीन व शेती कसणारांनी त्यांना द्यावयाचा खंड निश्चित करण्यासाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती केली. १७९३ मध्ये कायमधारापद्धती आली. जमीनदारांना जमिनीचे हक्क मिळाले. जमीनमहसूल एकदाच ठरविण्यात येऊ लागला. त्यानंतर शेतीमालांच्या किमती वाढल्या तरी जमीनमहसुलात सहसा बदल होत नसे. त्याचा फायदा जमीनदारवर्गाला मिळू लागला. तात्पर्य, जमीनमहसूल ठरविताना जमिनीची प्रत, तिची उत्पादकता व बाजाराचे सान्निध्य हे घटक विचारात घेतले गेले नाहीत. कमी-अधिक प्रमाणात ते दोष आजही दिसून येतात.

ब्रिटिश नियंत्रणाखाली जमिनीचे मालकी हक्क व जमीनमहसूल यांच्या बाबतीत नियमितपणा आला असे आपण वाचतो व मानतो देखील; परन्तु भारतातील करक्षमता विचारात घेतल्यानंतर सर्वच कर कसे जाचक होते. हे प्रथम दादाभाई नवरोजींनी लुटीचा सिद्धान्त मांडून स्पष्ट केले. भारतात दरडोई कराचे दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण ६ शि. : ४० शि. (म्हणजे जवळजवळ १५ टक्के) इतके होते आणि इंग्लंडमध्ये ते २ पौं. १० शि. : ३० पौं. (म्हणजे जवळजवळ ८ टक्के) इतके होते. दोन्ही देशांतील करक्षमता विचारात घेऊन दादाभाई म्हणतात : हत्तीला एक टन वजनाचे काही वाटत नाही; परन्तु काही पौंडांच्या ओझ्याने लहान मूल चिरडून जाईल. ही उपमा सार्थ आहे.

भाग २ पृथक्करणात्मक असून त्यात ४ प्रकरणांचा समावेश आहे. त्यांच्यामध्ये जमीनमहसूल व शेतीविषयक उत्पन्न–कर यांचे घटकराज्यसरकारांच्या अनुक्रमे एकूण करातील उत्पन्नाशी व एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण, शेतीविषयक करांचा भार, मूल्यमापन आणि जमीनमहसुलाचे स्वरूप कायम करून त्यात वाढ करणे यांची चर्चा केली आहे.

१९५१–५२ मध्ये जमीन महसुलाचे घटकराज्यांच्या एकूण करातील उत्पन्नाशी व त्यांच्या एकूण उत्पन्नाशी असलेले प्रमाण अनुक्रमे १७·०८ टक्के व १२·१२ टक्के इतके होते. १९६८–६९ मध्ये ते ६·८८ टक्के व ४·२० टक्के इतके झाले. जी गोष्ट जमीनमहसुलाची तीच शेतीविषयक उत्पन्नकराची. पंचवार्षिक योजनांच्यासाठी देशातील साधनसामुग्रीचे प्रवाहीकरण करण्याची गरज असताना शेतीविषयक करांचे अपरिवर्तनीय व प्रतिगामी स्वरूप त्या मार्गात अडथळे निर्माण करते, हा डॉ. अँग्रिशनी काढलेला निष्कर्ष आता प्रस्थापित झाला आहे आणि म्हणून ५ व्या प्रकरणात जमीनमहसूल नष्ट करण्याच्या मागणीशी ते सहमत नाहीत. उलट त्यात गरजेनुसार वाढ करावी असे आग्रही प्रतिपादन ते करतात आणि त्याविषयी

दुमत होण्याचे कारण नाही.

ग्रंथाचा ३ रा भाग आणि विशेषतः त्यातील ९ वे प्रकरण अधिक महत्त्वाचे आहे. आतापर्यंतच्या चर्चेच्या आधारे डॉ. अँग्रिशनी प्रतिगामी, अपरिवर्तनीय व असम्यक अशा प्रचलित जमीनमहसुलाचे, त्याच्यामध्ये सुधारणा करण्याच्या हेतूने, काही पर्याय सांगितले आहेत. (अ) प्रत्येक वर्षी किंवा वारंवार जमीनमहसुलाची आकारणी व वसुली करण्याऐवजी एकदाच कायमचा जमिनीच्या भांडवली मूल्यावर कर लादणे. (ब) जमीनमहसुलाऐवजी शेतीमालावर विक्रीकर लादणे, (क) जमिनीच्या भांडवली मूल्यावर मिळकतकर लादणे, (ड) निवडक वस्तूंच्या खरेदी–विक्रीतील सरकारी मक्तेदारी व (इ) शेतीविषयक उत्पन्नकर, असे पर्याय दिले आहेत; परंतु भारतात त्यांच्या आकारणीत व वसुलीत येणाऱ्या प्रशासकीय अडचणींचे निवारण करता येणार नाही. विशेषतः शेतीविषयक उत्पन्नकरापासून मिळणारे उत्पन्न जमीनमहसुलापेक्षा बरेच कमी असणार. शिवाय, नुकताच आलेला गव्हाच्या व्यापारातील सरकारी मक्तेदारीचा कडवट अनुभव अद्याप ताजा आहे. व्यावसायिक अर्थशास्त्रज्ञांचे अनुमान व सरकारी धोरण यांच्यात प्रत्यक्षात ताळमेळ राहात नाही. या व इतर कारणांमुळे प्रचलित जमीनमहसूल अधिक प्रगामी करण्याच्या हेतूने डॉ. गुलाटी व डॉ. खुस्रो यांनी सुचविलेल्या सुधारणा उपरिनिर्दिष्ट पर्यायांबरोबर बडतर्फ करण्याचे साहस डॉ. अँग्रिशनी दाखविले ही गोष्ट खरी; परन्तु डॉ. गुलाटी व डॉ. खुस्रो यांच्या सुधारणा किंवा ते पर्याय यांच्यापेक्षा डॉ. अँग्रिशनी सुचविलेला वस्तुरूप जमीनमहसूल व्यावहारिक दृष्टीने अधिक सरस व समर्थनीय आहे किंवा काय असे वाटू लागते. त्यासाठी त्यांच्या वस्तुरूप जमीनमहसुलाची संक्षेपाने माहिती करून घेणे आवश्यक ठरते. त्याशिवाय निर्माण होणाऱ्या शंकेविषयी निश्चित निर्णय करणे योग्य ठरणार नाही.

वस्तुरूप जमीनमहसुलाच्या योजनेत सांगितल्याप्रमाणे जमीनमहसुलाची आकारणी रोख पैशात करावयाची आहे; परन्तु तो वस्तूमध्ये द्यावयाचा आहे. रोख पैशाचे वस्तुत रूपान्तर करण्यासाठी आधार म्हणून सुगीच्या हंगामातील धान्याची किंमत विचारात घ्यावयाची आहे. आकारणी, वसुली व करपात्र शेतीउत्पादनाची विल्हे लावण्याचे अधिकार ग्रामपंचायत, भारताचे अन्नमहामंडळ, घटकराज्यातील गोदामे व सरकारी कोषागार यांच्याकडे सोपविण्यात यावयाचे आहेत. अशी योजना प्रशासकीय भूमिकेतून सुसाध्य व आर्थिक भूमिकेतून मजबूत करण्यासाठी डॉ. अँग्रिशनी काही गृहीते, कारणे व वस्तुरूप जमीनमहसूल भरण्यात अपराधी ठरणाऱ्या व्यक्तीविरुद्ध दंडाची तरतूद सांगितली आहे.

प्रस्तुत योजना कार्यवाहीच्या दृष्टीने सुकर होण्यासाठी डॉ. अँग्रिशनी काही गृहीते धरली आहेत. त्यांचे काही नमुने पुढे दिले आहेत. मानवी स्वभाव परिपूर्ण होईल, सध्याच्या जमीनमहसुलाऐवजी सुकलेले व सामान्य प्रतीचे धान्य प्रामाणिकपणे दिले जाईल, चोरी किंवा उंदीर-घुशी यांच्यापासून होणाऱ्या गोदामातील धान्याची नुकसानी अगर नासाडीच्या बाबतीत अधिकाऱ्यांकडून पुरेशी हमी घेण्यात येईल आणि जमा झालेले धान्य साठविण्यासाठी गोदामांची पुरेशी व्यवस्था केली जाईल.

प्रदीर्घ काळात मानवी स्वभाव परिपूर्ण होणार नाही असे नाही; परंतु या योजनेची कार्यवाही ज्या मध्यस्थ संस्थांवर सोपविण्यात यावयाची आहे त्यांना भारतीय शेतीच्या विशिष्ट परिस्थितीतून उद्‌भवणाऱ्या अडचणींवर मात करता येईल असे वाटत नाही. वस्तुरूप जमीनमहसुलाची योजना प्रजासत्ताक चीन किंवा कोरियाच्या प्रजासत्ताकात यशस्वी ठरली म्हणून भारतात ती यशस्वी ठरण्याची अपेक्षा करता येणार नाही. चीनमध्ये बंदरात धान्य उतरताना एक कण देखील वाया जाणार नाही याची दक्षता घेतली जाते, असे इंग्लंडच्या धान्यवाहू बोटीच्या कप्तानाचे निवेदन प्रसिद्ध झाले होते. त्याच कप्तानाचा भारतातील अनुभव उलटा आहे. शिवाय, गोळा केलेल्या धान्याची गैरव्यवस्था, गैरहिशेब व चोरी यांच्यामुळे काही टन धान्याचा अपव्यय होतो. तामीळनाडूच्या कायदेमंडळाच्या अंदाजसमितीचा १९७३–७४ चा अहवाल अधिक बोलका आहे. भात सडण्याच्या गिरणीचे मालक सरकारला संबंधित अधिकाऱ्यांच्या संमतीने फसवितात. त्या गिरणी-मालकांना त्यांच्या गिरण्यांच्या भात सडण्याच्या क्षमतेपेक्षा अधिक भात पुरविला गेला आणि जादा भात बनावट परवान्यांच्या आधारे दुसऱ्या घटकराज्यांमध्ये निर्यात करण्यात आला आणि ते धान्य उंदीर-घुशींनी खाऊन टाकले असे कागदोपत्री दाखविण्यात आले. अशा प्रकारे नागरी-पुरवठाखात्याचे लाखो रुपये गैरहिशेबात जिरून गेले असे प्रसिद्ध झाले आहे. तात्पर्य, डॉ. अँग्रिशनी मानलेली गृहीते चालू परिस्थितीत अवास्तव ठरतात.

प्रचलित जमीनमहसुलातील तुटपणा व असम्यकता दूर करणे हे सर्वच योजनांचे एक समान उद्दिष्ट आहे. डॉ. गुलाटी व डॉ. खुस्रो यांच्या योजनांमध्ये ठरलेल्या अंतिम मर्यादेपर्यंत जमीनमहसुलाचा दर जमीनधारणक्षेत्राच्या ठराविक प्रमाणात वाढत जातो; परंतु डॉ. अँग्रिश यांच्या योजनेत तो दर सुगीच्या हंगामातील धान्यांच्या किंमतीनुसार बदलण्यात यावयाचा

आहे. म्हणजे धान्यांच्या किमतीत वाढ झाली तर स्वाभाविकपणेच जमीनमहसुलात त्या प्रमाणात वाढ होईल. हे एक कारण देऊन डॉ. अँग्रिश म्हणतात की त्यांची योजना अधिक परिवर्तनीय व सम्यक आहे; परंतु डॉ. अँग्रिश यांच्या योजनेचा योग्य आदर राखून देखील त्यांनी त्यासंबंधी केलेली कारणमीमांसा व्यावहारिक दृष्टीने निर्दोष आहे असे म्हणता येणार नाही. त्यांच्या योजनेत सांगितल्याप्रमाणे जमीनमहसुलाची आकारणी करणारे अधिकारी किंवा संस्था रोख पैशाचे वस्तूत रूपांतर करण्यासाठी सुगीच्या हंगामातील किमतीचा आधार म्हणून स्वीकार करणार आहेत. डॉ. अँग्रिश यांचे अनुमान काहीही असले तरी सर्वसाधारण अनुभव असा आहे की सुगीच्या हंगामात अन्नधान्यांच्या किमती तुलनात्मकदृष्ट्या कमी असतात. उपलब्ध आकडेवारीवरून असेदिसते की शेतीउत्पादनाच्या सुमारे $\frac{1}{2}$ ते $\frac{2}{3}$ अन्नधान्यांचा शेतीच्या क्षेत्रातच फडशा पाडला जातो. परिणामत: बाजारात विक्री केलेल्या धान्यांचे शेतीउत्पादनाशी असलेले प्रमाण अल्प असते. बहुसंख्य गरीब व छोट्या शेतकऱ्यांवर व्यापाऱ्यांना किंवा सावकारांना बरेच धान्य सक्तीने विकण्याची पाळी येते. कारण त्या शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणावरील कर्जाची गरज ते व्यापारी किंवा व्यावसायिक सावकार आज देखील भागवीत आहेत. बरेच सावकार व्यापारी असल्यामुळे धान्यात कर्जफेड करवून घेणे ते अधिक पसंत करतात. गरीब व छोटे शेतकरी त्यांचे धान्य स्वस्त बाजारात विकतात व परत महाग बाजारात खरेदी करतात. अशा विचित्र परिस्थितीत धान्यांच्या किमती मागणी-पुरवठ्याच्या सामान्य यंत्रणेनुसार ठरविल्या जातात असे क्वचितच दिसते. शिवाय, भारतातील शेतकऱ्याला उद्योगसंस्थेच्या मालकाप्रमाणे उत्पादनखर्चाचा काटेकोरपणे हिशेब ठेवता येत नाही किंवा हिशेबतपासनीसाला नेमून देखील घेता येत नाही. उत्पादनखर्चाच्या पुरत्या ज्ञानाच्या अभावी बाजारभाव व्यापारी-सावकारांच्या मर्जीनुसार ठरतात. '

आपली योजना 'प्रशासकीय भूमिकेतून सुसाध्य व आर्थिक भूमिकेतून मजबूत करण्यासाठी' त्या योजनेची गृहीते व तिच्या समर्थनाची कारणमीमांसा पाहिल्यानंतर तिच्यातील अपराध्याविरुद्ध डॉ. अँग्रिशनी दिलेल्या दंडाविषयीच्या तरतुदीचा विचार करणे शिल्लक राहाते.

वस्तुरूप जमीनमहसुलाच्या योजनेत धान्यमळणी करून तयार झाल्यानंतर एक महिन्याच्या आत शेतकऱ्यावर जमीनमहसूल देण्याचे बंधन आहे; परंतु पुढील काही महिन्यांत अन्नधान्यांच्या किमती वाढतील असा अंदाज जर करदात्या शेतकऱ्यांनी (ज्यांच्यामध्ये अर्थातच सधन शेतकऱ्यांचा अधिक भरणा असणार) केला, तर त्यांच्या ठिकाणी वस्तुरूप जमीनमहसूल वेळेत भरण्याची टाळाटाळ करण्याचे प्रलोभन निर्माण होईल आणि ते स्वाभाविक आहे. त्यामुळे कर भरण्यास विलंब होईल. त्याविरुद्ध खबरदारीची उपाययोजना म्हणून डॉ. अँग्रिशनी दंडाची योजना केली आहे. नेमून दिलेल्या वेळेत जर कर भरला नाही, तर एक ते दोन महिन्यांपेक्षा कमी थकबाकीसाठी ५% दंड लादण्यात यावा आणि सहा महिन्यांपेक्षा अधिक काळातील थकबाकीसाठी जादा २०% दंड लादण्यात यावा. इतके करूनही कर भरला नाही तर प्रकरण पुढील कारवाईसाठी पंचायतकोर्टाकडे पाठविण्यात यावे. (पृ. २५७)

ही दंडाची तरतूद आवश्यक असली तरी पुरेशी ठरणार नाही. बेसुमार किमत-वाढीच्या परिस्थितीत वस्तुरूप जमीनमहसूल भरणारी व्यक्ती सर्वाधिक २०% दंड भरून देखील अधिक सधन होण्याची परिस्थिती नाकारता येणार नाही. कारण त्या वेळी धान्यांच्या किमतीमधील वाढ २०% दंडाच्या प्रमाणाबाहेर असू शकेल. म्हणून अन्नधान्यांच्या किमतीतील अतिरिक्त वाढ मर्यादित करण्यावर या योजनेचे यश अवलंबून आहे. वस्तुत: अशा अतिरिक्त किमतवाढीला रोखण्यासाठी या योजनेत विचार करण्याची गरज निर्माण होते. तसा विचार न करता डॉ. अँग्रिशनी कर बुडविण्याच्या प्रवृत्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई म्हणून पंचायतकोर्टाचा आसरा घेतला आहे. कारण व परिणाम यांची गल्लत करण्याचा हा एक प्रकार होय. कदाचित अतिरिक्त किमत-वाढीला रोखण्याचा विषय त्यांच्या ग्रंथाच्या व्याप्तीबाहेरील असावा असे बंधन डॉ. अँग्रिशनी स्वत:वर घालून घेतले असावे.

प्रचलित जमीनमहसुलातील ताठरपणा व असम्यकता दूर करण्यासाठी व आर्थिक विकासास आवश्यक साधनसामुग्रीचे प्रवाहीकरण करण्यासाठी कोणतीही एक योजना स्वतंत्रपणे विश्वसनीय ठरत नाही. स्वतंत्रपणे मांडलेल्या योजना जर गरजेनुसार एकत्रित केल्या व निवडक भूमिकेतून त्यांना अतिभाराची (Surcharge) जोड दिली, तर निर्माण होणारी परिपूर्ण योजना स्वीकारण्यास अधिक योग्य होईल. अतिभाराची आकारणी एकूण जमीनमहसुलाच्या किंवा जमीनधारणाक्षेत्राच्या आधारे करावी. मात्र अशा वेळी त्या जमिनीत घेतलेल्या पिकाचा प्रकार विचारात घ्यावा. असे केल्यास प्रचलित जमीनमहसुलातील असम्यकता व ताठरपणा कमी करण्याच्या कामी चांगलीच मदत मिळू शकेल आणि आज शेतीमालाच्या किमती स्वत:च्या मर्जीप्रमाणे ठरविण्यात व्यापारी किंवा सावकार यांच्याकडून येणारा दबाव कमीत कमी होईपर्यंत वस्तुरूप जमीनमहसुलाची योजना लांबणीवर टाकण्यात यावी. ❋

# कापूसचळवळीचे तात्त्विक अधिष्ठान

**डॉ. व्यं. मु. पाटणकर**

शिवाजी शिक्षण प्रसारक संस्थेचे
आर्टस व सायन्स कॉलेज, धुळे

एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरू झाल्यापासून विदर्भातील कापूस-उत्पादकात निर्धारित किमती व सरकारी यंत्रणेकडून ज्या पद्धतीने पैसे अदा केले जातात त्याबद्दल पुरेसे समाधान नाही. ह्या समस्येच्या अनुरोधाने शेतमालाच्या उत्पादकांना आवश्यक त्या सवलती व संरक्षण देण्याचे तात्त्विक निकष डॉ. पाटणकर ह्यांनी ह्या लेखात सुचविले आहेत. गोखले इन्स्टिटयूटमध्ये डॉ. पाटणकर ह्यांनी आपला Ph. D. चा प्रबंध पुरा केला. कृषि-अर्थशास्त्र व सहकारी चळवळ हे त्यांचे विशेष जिव्हाळयाचे विषय: वऱ्हाड, नागपूर ह्या भागांशी निकटचा संबंध म्हणून त्यांनी व्यक्त केलेल्या विचारात तिकडील समस्येचे आकलन प्रतिबिंबित दिसेल. पश्चिम महाराष्ट्रातील वाचकांस ह्या समस्येची ओळख करून घेण्यास हा लेख उपयुक्त ठरेल.

सुमारे चार वर्षांपूर्वी विदर्भात प्रारंभ झालेल्या कापूस-आंदोलनाची व्याप्ती आता जवळपास राष्ट्रीय स्वरूपाची बनलेली आहे. अर्थ-समाजकारणाचे अभ्यासक, राजकीय पुढारी, प्रशासक आणि कारभारतज्ज्ञ यांच्यासमोर चळवळीने काही नवीन आव्हाने उभी केली आहेत, नव्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत आणि त्याचबरोबर काही नवे आदर्शही निर्माण केले आहेत. या चळवळीचा समग्र आणि टीकात्मक आढावा घेण्याचा मात्र येथे हेतू नाही. बुद्धिमंतांकडून थोडयाशा उदासीनतेने आणि उपेक्षेने पाहिल्या जाणाऱ्या या आंदोलनाची तात्त्विक भूमिका उलगडून दाखविण्याचा अल्पसा प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे.

केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर सबंध देशाच्या शेती-अर्थव्यवस्थेचे एक अविभाज्य आणि महत्त्वपूर्ण अंग म्हणूनच कापूसअर्थव्यवस्थेकडे पाहिले पाहिजे. अन्नाखालोखाल मूलभूत गरज भागविणाऱ्या कापूस-अर्थव्यवस्थेच्या विविध घटकांमध्ये कापूसउत्पादक, शेतमजूर, जिनिंग-प्रेसिंग, सूतगिरण्या, विणकर, यंत्रमाग-हातमाग चालविणारे व्यवसाय, कापड-गिरण्या या व्यवसायांमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचा वर्ग आणि सर्वांत महत्त्वाचा म्हणजे कापडाचा अंतिम ग्राहक असे अनेक हितसंबंध गुंतलेले आहेत. या विभिन्न आणि काही वेळेला विरोधी असणाऱ्या घटकांच्या हितसंबंधांचा योग्य तो मेळ साधणे ही कापूस-अर्थव्यवस्थेबरोबरच एकंदर राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या निकोप आणि समतोल विकासाची खरी महत्त्वाची निकड मानली पाहिजे. आणि हीच व्यापक भूमिका विदर्भातील कापूसचळवळीने पायाभूत मानली आहे.

या चळवळीच्या वैशिष्टयांमध्येच तिच्या यशस्वितेची बीजे आढळतात. या चळवळीचा केंद्रबिंदु आहे कापूसउत्पादक. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील कापूस पिकविणाऱ्या ८–९ राज्यांतील उत्पादकांना संघटित करून त्यांना त्यांच्या न्याय्य-मागण्यांची पूर्तता करून घेता यावी यासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करण्याचा उद्देश या चळवळीच्या प्रवर्तकांनी प्रामुख्याने आपल्या समोर ठेवलेला आहे. एका अर्थाने ही एक समाज-प्रबोधनाचीच चळवळ आहे. आपल्या कार्याचे एक महत्त्वाचे आणि अविभाज्य अंग म्हणून या चळवळीचे वैचारिक नेतृत्व करणाऱ्यांनी कापूसअर्थव्यवस्थेच्या विविध घटकांच्या तांत्रिक आणि आर्थिक विश्लेषणाला प्राधान्य देऊन उपलब्ध होणाऱ्या आकडेवारीची शास्त्रीय रीतीने तपासणी आणि संकलन करून परिश्रमपूर्वक वस्तुनिष्ठ युक्तिवादाची मांडणी करण्यावरच आपले लक्ष केंद्रित केलेले आहे. या चळवळीची प्रेरणा केवळ भावनिक न राहता सुसंगत तार्किक युक्तिवादाचा आश्रय घेणारी आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते यातच तिचे सामर्थ्य दडलेले आहे. विविध राजकीय पक्षोपपक्षांचा सद्‌भाव आणि शांततामय, सनदशीर आणि विधायक आंदोलनाच्या द्वारा आपल्या भूमिकेचा निष्ठेने पाठपुरावा ही या चळवळीची अन्य वैशिष्टये सांगता येतील.

आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वैगुण्यांचे नेमके स्वरूप कोणते याबाबत तज्ज्ञांचेही आता फार मोठे मतभेद राहिलेले नाहीत. विवाद्यता आहे प्रामुख्याने उपाययोजनेसंबंधी, धोरणांच्या आखणी–अंमलबजावणीसंबंधी. शेतीच्या क्षेत्रामध्ये उत्पादन आणि उत्पादकता वाढीचे प्रयत्न ज्या प्रमाणात सफल होतील त्या प्रमाणात ग्रामीण विभागाच्या ऊर्जितावस्थेला हातभार लागणार हे उघड आहे. असे प्रयत्न तांत्रिक आणि संघटनात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर अभिप्रेत आहेत. शेती-व्यवसायाच्या आदानविषयक गरजा–पाणी, बीज, खते, बी-बियाणे इ.–पूर्ण करणाऱ्या संस्थात्मक सुविधा आणि शेती-मालाला रास्त भावमानाची हमी मिळवून देणारी प्रभावी आणि कार्यक्षम बाजारयंत्रणा यांच्या निर्मितीवरच अशा प्रयत्नांचे यश प्रामुख्याने अवलंबून राहणार हे विसरून चालणार नाही. किफायतशीर किमतींची हमी सर्व प्रकारच्या शेतमालाला मिळाल्याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आजचे विदारक चित्र बदलले जाणे अशक्यप्राय आहे याही भूमिकेला प्रत्यवाय नसावा. मूलभूत गरजेची पूर्तता करणाऱ्या वस्तोत्पादनातील साधन-वस्तू या दृष्टीने 'कापसाची किमत कापूस-उत्पादकाबरोबरच अंतिम कापडग्राहकाच्या हितसंबंधांचीही जपणूक करणारी हवी. कापसापासून कापडापर्यंतच्या किमतीचे गणित अशा रीतीने मांडायला हवे. कापूसचळवळीच्या प्रवर्तकांनी नेमकी ही गोष्ट हेरलेली असून विशिष्ट प्रकारच्या कापसाच्या उत्पादनाचा तपशीलवार खर्च, कापसाचा सुतामध्ये रूपांतर करण्याचा खर्च आणि सुताचा कापडामध्ये रूपांतर करण्याचा खर्च आणि कापसाच्या, सुताच्या आणि कापडाच्या किमती यासंबंधीची उपलब्ध आकडेवारी आणि स्वतंत्र पहाणीच्या द्वारा गोळा केलेली आकडेवारी यांच्या संकलन आणि विश्लेषणाच्या आधारे स्पष्ट होणारे निष्कर्ष लक्षात घेऊनच आपली तात्त्विक भूमिका निश्चित केलेली आहे. अन्य समाजघटकांप्रमाणे कापूसउत्पादकांनाही किमान राहणीमानाच्या पातळीशी शाश्वती मिळवून देण्याचे उद्दिष्ट अर्थातच सर्व खर्चवेच वजा जाता त्यांना मिळत असलेल्या उत्पन्न-पातळीशी निगडित राहणार हे उघड आहे. अशा उत्पन्न-पातळीचा विचार शेतमालाला लाभत असलेल्या भावमानाच्या संदर्भातच केला जायला हवा. अनियंत्रित बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थांमधील यासंबंधीचा आजवरचा अनुभव विशेषत्वाने लहान आणि मध्यम शेतीउत्पादकांच्या दृष्टीने केवळ निराशाजनकच नव्हे तर अन्यायमूलक असल्याचे सप्रमाण सिद्ध करणे अवघड नाही.

शेतमालाच्या उत्पादनखर्चाच्या गणनेसंबंधी पद्धतिविषयक आणि अन्य अडचणींच्या निरनिराळ्या अभ्यासकांनी केलेल्या विश्लेषणाचा विस्ताराने परामर्श घेणे येथे शक्य नाही. अशा विश्लेषणांच्या द्वारा मांडल्या जाणाऱ्या एकदोन भूमिकांची येथे नोंद घेणे उपयुक्त ठरेल. एकाच प्रकारच्या शेतमालाच्या उत्पादनाखालील भूक्षेत्राची प्रतवारी, आकारमान, भांडवल, तंत्र, श्रम, व्यवस्थापन इत्यादी घटकांमधील व्यापक विविधता लक्षात घेता उत्पादनखर्चाच्या पातळ्यांमध्ये लक्षणीय अंतर राहणार हे उघड आहे. उत्पादनखर्चामधील नेमक्या बाबी कोणत्या, त्यांचे स्वरूप काय आहे, त्यांचे मापन कसे करता येईल यासंबंधी तात्त्विक मतभेद आहेत; व्यावहारिक अडचणीही आहेत. प्रातिनिधिक किंवा प्रमाणित खर्च निर्धारित करण्यामधील अडचणी शेतमालापुरत्याच मर्यादित मानण्याचे कारण नाही. बहुविध वस्तूंचे आधुनिक प्रगत पद्धतींच्या सहाय्याने उत्पादन करणाऱ्या कारखानदारीमधीलही अनुभव या बाबतीत मूलतः भिन्न नाही. शेतमालाच्या संदर्भातील व्ययचिकित्सेसंबंधीच्या पारंपारिक पद्धतीविषयी आपले साधार आक्षेप कापूसचळवळीचे बौद्धिक नेतृत्व करणाऱ्या अभ्यासकांनी मांडले आहेत. त्यांच्या मते शेतमालाच्या उत्पादनखर्चाच्या प्रचलित मीमांसेची फेरतपासणी व्हायला हवी. शेतीउत्पादक हा एक संजोजक आहे हे लक्षात घेऊन व्यवस्थापकीय कामाचा मोबदला, व्यवसायानिमित्त होणारा प्रवास व अन्य खर्च, धोका पत्करण्याबद्दलचा मोबदला, भांडवली साधनसामुग्रीची झीज इत्यादींचा उत्पादनखर्चाच्या गणनेमध्ये अंतर्भाव हवा.

कापसाला अधिक किंमत दिल्यास कापडाच्याही किंमती वाढून अंतिम ग्राहकावर तो बोजा टाकला जाण्याच्या परिचित युक्तिवादाचा फोलपणा सप्रमाण सिद्ध करण्याचा परिश्रमपूर्वक प्रयत्न या चळवळीच्या समर्थकांनी केलेला आहे. ( संदर्भ : नागपूरहून प्रसिद्ध होणारे महाराष्ट्र कापूस उत्पादक संघाचे मासिक मुखपत्र–'इंडियन कपास बुलेटिन्') कापडउत्पादनाच्या तांत्रिक अंगांचा चिकित्सकरीत्या अभ्यास करून आजच्या संघटित कापडउद्योगाकडून अंतिम ग्राहकांची आणि कापूसउत्पादकांची कशी पद्धतशीर लूट केली जात आहे यावर झगझगीत प्रकाश टाकणारी माहिती उपरोक्त नियतकालिका-मध्ये आढळेल. कापूसउत्पादकांच्या मागणीनुसार विशिष्ट जातीच्या कापसाची क्विंटलला सुमारे ६०० रु. निश्चित करूनही कापडाच्या बाजारपेठेतील किमती सामान्य ग्राहकालाही परवडतील अशा ठेवणे सहज शक्य आहे या निष्कर्षापर्यंत या चळवळीचे नेते आलेले आहेत. भक्कम पुराव्याच्या आधाराने सादर केलेल्या आपल्या युक्तिवादाचे खंडन करण्याचे आव्हानही त्यांनी दिले आहे.

संघटित कापड–उद्योग आणि कारखानदारीच्या क्षेत्रा-

मधील इतर व्यवसायांचे 'कॉस्ट ऑडिट' करण्याची एक महत्त्वपूर्ण मागणी या आंदोलनाने शासनाकडे केलेली आहे. कारखानदारीमधील विविध वस्तूंच्या उत्पादनाचे खर्च आणि त्यांच्या बाजारामधील किमती यामध्ये केवढी प्रचंड तफावत आहे याचा अंदाज अशा सार्वजनिक व्ययतपासणीवरून उघड होईल आणि संघटित भांडवलदारवर्गाच्या एकंदर नफेबाजीचे भयानक चित्र त्यावरून स्पष्ट दिसेल असा निर्वाळा या आंदोलनाने दिलेला आहे. कापूसबाजारातील दलाल, सटोडिये आणि संघटित कापडउद्योगाच्या अनेक दशकांच्या मगरमिठी-मधून कापूस-उत्पादकाचे विमोचन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानाच्या व्यापक कार्यक्रमामधील पहिला टप्पा मानून शासकीय एकाधिकार कापूस खरेदी योजनेचे प्रभावी समर्थन आणि स्वागत या आंदोलनाने केलेले आहे.

कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमधील रचनात्मक परिवर्तनाची दिशा कोणती असावी याचे दिग्दर्शन हे या सर्व प्रयत्नांच्या पाठी-मागचे मुख्य विचारसूत्र आहे. ग्रामीण क्षेत्रामधील शेती आणि अन्य संलग्न व्यवसायांवर उपजीविका चालविणाऱ्यांची आर्थिक स्थिती त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नावर म्हणजेच त्यांनी निर्माण केलेल्या वस्तूंना-सेवांना प्राप्त होणाऱ्या मूल्याशीच निगडित राहणार हे स्पष्ट आहे. या उत्पन्नाच्या पातळीवरच ग्रामीण लोकसंख्येचा उपभोगखर्च अवलंबून राहणार. शेतमालाच्या एका परिमाणाच्या मोबदल्यात नागरी क्षेत्रात निर्माण होणारी बिगर शेतमालाची किती परिमाणे उपलब्ध होतात यावरच ग्रामीण लोकांच्या आर्थिक परिवर्तनाचे स्वरूप मूलतः अवलंबून राहणार हे ओळखले पाहिजे. म्हणून हा प्रश्न आहे व्यापारा-च्या शर्ती ( Terms of Trade ) ग्रामीण लोकसंख्येच्या दृष्टीने अनुकूल बनविण्याचा वा त्यातील प्रतिकूलतेचे प्रमाण कमी करण्याचा. या मार्गाने उत्पन्नाचे आणि क्रयशक्तीचे नागरी क्षेत्रामधून ग्रामीण क्षेत्रात होणारे संक्रमण हे केवळ ग्रामीण-नागरी स्थैर्याच्याच दृष्टीने नव्हे तर पर्यायाने संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासाची नवी दालने खुली करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. ग्रामीण उत्पन्नपातळीतील वाढीचा सुपरिणाम बिगर शेतमालाच्या बाजारपेठांची क्षितिजे रुंदावण्यामध्ये होऊ शकेल आणि निकोप आर्थिक विकासाला अनुकूल वातावरण त्यामुळे निर्माण करण्यास सहाय्य होईल असा आशावाद या चळवळीने बाळगलेला आहे. ❋


# आमची प्रकाशने

एस्. एस्. सी. नंतर
कॉलेज शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
सुमारे २०० अभ्यासक्रम व व्यवसाय ह्यांची
माहिती देणारी

## व्यवसायमार्गदर्शनपुस्तिका भाग १

प्रा. कमलाकर परचुरे
किंमत २ रुपये

एस्. एस्. सी.पर्यंत
शिक्षण न घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
सुमारे १०० अभ्यासक्रम व व्यवसाय ह्यांची
माहिती देणारी

## व्यवसायमार्गदर्शनपुस्तिका भाग २

प्रा. कमलाकर परचुरे
किंमत १ रुपया फक्त


हायरसेकंडरी, पदवीपूर्व अर्थशास्त्राच्या
विद्यार्थ्यांकरता उपयुक्त अभ्यासपुस्तक

## मिनि अर्थशास्त्र

प्रा. कमलाकर परचुरे

नव्या आवृत्तीकरता मागणी नोंदवावी.
वरील पुस्तकांकरता खालील ठिकाणी
संपर्क साधा.

**सत्यशिवसुंदर प्रकाशन**
१०६ शिवाजीनगर, पुणे ४.



## नवीन यंत्रे प्रक्रिया व प्रकल्प

# श्रीसाई सर्व्हिस स्टेशनचे

### तीन संचालक
### सुरेश, श्रीधर व मुकेश कलमाडी ह्यांची मुलाखत


राजेंद्र पटवर्धन

सहा पाकळ्यांचे एक पिवळ्या रंगाचे फूल आणि भोवतालो निळ्या पार्श्वभूमीवर 'साई सर्व्हिस' असे लेबल (स्टिकर) शेकडो गाड्यांच्या पाठीमागल्या काचेवर आपल्याला दिसतं. संभाजी पार्कजवळील 'साई सर्व्हिस स्टेशन' हे पुण्यातल्या काही प्रमुख सर्व्हिसिंग स्टेशनपैकी आहे. गेल्या दीड एक वर्षात ह्या सर्व्हिसने पुण्यात व महाराष्ट्रात आपले एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविले आहे. सहसा उपलब्ध नसतील अशी अद्ययावत यंत्रे, अत्याधुनिक उपकरणे व व्यवस्थापनाच्या नव्या तंत्रामुळे आर्थिक उलाढाल, ग्राहकांना अधिक तत्पर सेवा ह्या बाबतीत ह्या युनिटला जास्त प्रमाणावर यश मिळाले आहे.

पेट्रोल हा एक खऱ्या अर्थाने 'पेटता' प्रश्न आहे. ह्या ७–८ दिवसांत पेट्रोलच्या किमती अजूनही दहा टक्क्यांनी वाढणार आहेत. पेट्रोलमुळे आपल्या भारताच्या आयातीवरची ताण सुमारे १२० कोटींनी वाढणार आहे. अशा वेळी पेट्रोलच्या विक्री करणाऱ्या ह्या संस्थेकडून मिळणारी माहिती वाचकांना उद्बोधक वाटेल.

**साई सर्व्हिस हा एक अगदी वेगळ्या प्रकारचा व्यवसाय आपण कसा व केव्हा सुरू केलात? ह्या व्यवसायाची आपल्याला ह्यापूर्वी काही माहिती होती काय?**

आपल्याला माहीतच आहे की मी भारतीय विमानदलातील एक अधिकारी होतो. माझी बदली ज्या वेळेस पुण्याच्या NDA मध्ये झाली त्या वेळेपासून मला असे वाटू लागले की नोकरी सोडून पुण्यात स्थाईक व्हावे. मी थोरला मुलगा म्हणून वडिलांजवळ येऊन रहावे अशी त्यांची इच्छा होती. माझा मधला भाऊ श्रीधर त्या वेळी मंगलोरला होता व सर्वांत धाकटा मुकेश हा कॉलेजातच होता. तेव्हा विमानदलातील चांगली नोकरी सोडून एक धाडस करायचं तर ते तितकंच योग्य हवं ही त्या वेळी 'पूना कॉफी हाऊस' चालवायला मिळण्याची एक अपेक्षा होती. संधी चालून आली. मला वाटलं, हॉटेलव्यवस्थापन जमेल मला. मुकेशचीही थोडी मदत घेता येईल. कारण आमचा मुकेश पहिल्यापासून हिशेब व जमाखर्चात निष्णात. शिवाय M. B. A. ला त्याने 'फायनॅन्शियल मॅनेजमेंट' हा त्याचा आवडीचा विषय घेतलेला. त्यावेळी दुसरी एक अनपेक्षित संधी आली. ती म्हणजे पूना कॉफी हाउसच्याच जवळ जरा नटराज ओलांडलं म्हणजे संभाजीपार्कच्या अलीकडे जंगलीमहाराज रस्त्यावर नावारूपाला आलेले साई सर्व्हिसिंग स्टेशन व पेट्रोलपंप मिळण्याची. मला हे कळण्याचा अवकाश, कॉफी हाउसचे राहिले बाजूलाच... मी तडक ओळख, पूर्वपरिचय नसता त्याचे संचालक श्री. नाडकर्णी ह्यांना जाऊन भेटलो. साराच योगायोग! मला वास्तविक चालवायचे होते हॉटेल; पण नशिबात पहिल्यांदा होता पेट्रोलपंप. डिसेंबर ७३ मध्ये 'साई सर्व्हिस स्टेशन'शी आमचा संबंध जडला. माझा भाऊ श्रीधर हा त्या वेळेला मंगलोरला टी. व्ही. एस. नावाच्या, आशियातील पहिल्या क्रमांकाच्या वाहतूककंपनीचा ऑटोमोबाइल इंजिनिअर म्हणून काम करत होता. आमच्या वाटाघाटी चालू झाल्यावर मी त्याला पुण्यात बोलावून घेतले व डॉ. बेक आणि कं. प्रा. लि. ह्या पुण्याच्या कंपनीत काही दिवस ऑटोमोबाइल इंजिनिअर म्हणून त्याने नोकरी केली. सर्व्हिसिंग स्टेशनच्या धंद्याचा जम बसू लागल्यावर त्याने बेक कंपनीचा राजीनामा दिला व पूर्णपणे 'साई सर्व्हिस स्टेशन'ची प्रमुख जबाबदारी पत्करली. हे सर्व घडताना माझ्या कॉफी हाउसबद्दलच्या वाटाघाटीही यशस्वी झाल्या व मे १९७४ मध्येच म्हणजे पंप मिळाल्यावर २–४ महिन्यांतच कॉफी हाउस चालवायला मिळाले. त्यानंतर मी माझे जास्त लक्ष कॉफी हाउसकडे द्यायला सुरुवात केली. म्हणजे गंमत अशी झाली की कॉफी हाउसच्या ऐवजी साई सर्व्हिस स्टेशनच्या




**श्रीसाई सर्व्हिस स्टेशनचे प्रवेशद्वार – कलमाडी बंधू : उभे डावीकडून – श्री. मुकेश, सुरेश व श्रीधर.**

अगदी सर्वस्वी अनभिज्ञ व्यवसायात मला उडी घ्यावी लागली. हे धाडस करताना फक्त एवढीच खात्री होती की माझा मधला भाऊ मला निश्चितपणे सावरेल. धाकटा भाऊ मुकेश हा एक Silent worker आहे आणि आम्हा दोघांना, जे गणित जमत नाही, त्यात तो पक्का आहे. त्याचा आमच्यावर तसेच पैशाच्या व्यवहारात आवश्यक तो, अंकुश आहे. थोडक्यात हा आमच्या तिघांच्या संयुक्त साहसाचा भाग आहे. ' We work like a team. We are made for each other. आमच्यातला कोणीही एकच... एक, काहीही करू शकणार नाही. ' तेव्हा हा व्यवसाय एका मनाच्या, एका विचाराच्या आम्हा तीन सख्ख्या भावांचा आहे.

**साई सर्व्हिसस्टेशन सुरू करताना तुम्हाला कोणत्या अनुकूल गोष्टी वाटल्या ?**

प्रथमतः साई सर्व्हिसस्टेशनचा लौकिक व त्याबद्दल कारच्या मालकांना वाटणारा विश्वास. ह्याचे श्रेय अर्थातच आमचे ज्येष्ठ भागीदार श्री. नाडकर्णी ह्यांनाच द्यावे लागेल. नाडकर्णीसाहेब पहिल्यांदा पेट्रोलियम कंपनीतच कामाला होते. त्यांना पेट्रोलची माहिती होती. शिवाय त्यांचे Contacts चांगले. स्वतःची करडी देखरेख व कामाचा वक्तशीरपणा व चोखपणा ह्यावर भर. आमच्या पंपावर मिळणारी सर्व्हिस पुण्यातील एक नमुनेदार सर्व्हिस होती; मिळणाऱ्या पेट्रोलची शुद्धताही तितकीच विश्वासार्ह. गाडी बाळगणाऱ्या उच्च व्र वर्गाला गुणाची पारख जास्त असते. **हजारो रुपयांची गाडी बिनधोकपणे सर्व्हिसला ठेवून जाऊन बिनधास्तपणे लांबच्या प्रवासाला निघताना चांगल्या इमानदार सर्व्हिसची जरूर असते.** आमच्या पंपाने प्रथमपासूनच ग्राहकाचा हा विश्वास कमावला होता. ते आम्हाला मिळालेलं ' गुड वुइल ! ' ह्या-शिवाय सर्व्हिसस्टेशनची जागा इतकी सोयीची, मोक्याची, हमरस्त्यावर व प्रशस्त. आमच्या पेट्रोलटाकीची क्षमता देखील जास्त आहे. स्टेशनवर जुने, जाणते, शिस्तबद्ध व कार्यक्षम असे नोकरही होते. गिऱ्हाईक जोडलेले होते. त्यामुळे ' साई सर्व्हिस स्टेशन ' चालवायला घेणे ही गोष्ट लाभदायक होती. अवघड

ोत्या त्या गोष्टी म्हणजे आमचं कोवळं वय, धंद्याचा अनुभव अजिबात नसणे, एवढ्या नोकरांना वागवून काम करून घेण्याकरता आवश्यक त्या प्रौढपणाचा अभाव आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे... पैसा. तो कुठे होता ? नुसत्या हिंमतीला काही अर्थ नाही. साई सर्व्हिस स्टेशनसारखे पुण्यातले एक बडे सर्व्हिसकेंद्र चालवायचे म्हणजे काही हजारांचा खेळ नव्हता तर ती कमिटमेंट काही लक्ष रुपयांची होती. पाठीमागे वळून पाहिलं तर वाटतं— एवढी प्रचंड भांडवलाची जमवाजमव व गुंतवणूक करण्याचं धाडस मी एक पायलट ऑफिसर म्हणूनच करू शकलो !

**साई सर्व्हिस स्टेशनच्या जुन्या स्टाफच्या बाबतीत आपण कोणते निर्णय घेतले ?**

जुन्या स्टाफला शक्य तितके सांभाळून घ्यायचे, त्यांना अंतर द्यायचे नाही असे आमचे धोरण होते. सुरुवातीच्या पहिल्या सहा महिन्यांत आम्ही त्यांच्या कामातील दोषांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. नवीन व्यवस्थापन व नवीन संचालक आले म्हणजे जुन्यांच्या मनात एक प्रकारची अढी व पूर्वग्रह असतो. आम्ही तीघांनी, प्रथमतः त्यांचे संचालक व त्यांचे मालक या दृष्टीने त्यांच्या मनात स्थान मिळविले व मग अर्थातच त्यांना आमच्या धोरणाशी सुसंगत होईल अशी शिस्त त्यांच्या कामाला लावून दिली. शक्यतोवर आम्ही कुणालाही कामावरून कमी केले नाही. ज्यांना आमच्याबरोबर काम करणे जड वाटले ते सोडून गेले; पण असे थोडे अपवाद असतातच.

**तुमच्या ह्या व्यवसायाची प्रामुख्याने कोणती विविध अंगे आहेत ? व्यवस्थापनाच्या दृष्टीने तुम्ही किती विभाग पाडले आहेत ? त्या विभागांचे स्वतंत्र कार्य व त्यांचे संघटन (Co-ordination) कसे करता ?**

साई सर्व्हिसस्टेशन हा एक संमिश्र उद्योग आहे. त्याची विविध अंगे अशी :

(१) पेट्रोल, डिझेल व निरनिराळी ऑइल्स देणे.
(२) सर्व्हिसिंग करून देणे— कारची देखभाल इ.
(३) कारला लागणाऱ्या वस्तूंची विक्री.
(४) कार—दुरुस्ती
(५) दुरुस्तीच्या वेळी आवश्यक असणारे विश्वासार्ह स्पेअर्स ग्राहकांना उपलब्ध करून देणे.

व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्रत्येक स्वतंत्र विभागाला एक प्रमुख आहे. स्टोअरचा एक विक्रेता, हिशोबाला एक मदतनीस, पत्रव्यवहाराला एक क्लार्क, टाकीवर पहारा ठेवणारे रक्षक, पेट्रोल भरून देणारी मुले ही आमच्या पंपाच्या दर्शनी भागात आहेत. पंपाच्या उजव्याच हाताला तीन रॅम्पस आहेत की ज्यांच्यावर एकाच वेळी गाड्यांचे सर्व्हिसिंग चालते. सर्व्हिसिंग करताना किमान ६ माणसांची टोळी लागते. त्यातील एक मुरब्बी व अनुभवी असा सुपरवायझर असतो. अगदी उजव्या कडेला, कुंपणालगत, आमचे टायर्समध्ये हवा भरून देण्याचे दोन पॉइंटस् आहेत. त्याच अंगाने म्हणजे नटराजच्या बाजूने पंपाच्या पिछाडीस गेल्यास, पहिल्यांदा आमचे स्टोअर लागते. त्याच्या पलीकडे वर्कशॉप. डाव्या हाताला गाड्या धुण्याची जागा—तसेच वळसा घालून पंपाच्या डाव्या भागात आले म्हणजे ऑफिसलगत एक मोठी भुयारी टाकी आहे. त्यात आमचे पेट्रोल असते. स्टोअरविभागाला स्टोअरकीपर आहे व त्याचे मदतनीस. वर्कशॉपमध्ये वर्कशॉप—सुपरवायझर व त्याचे मदतनीस आणि रिपेरिंग विभागात—इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, गाडीच्या कुशन्स इ. ठिकाणचे गादीकाम आणि दारे-खिडक्यांची कामे करणारे मिस्त्री असे प्रत्येक कामातले कसबी मेकॅनिक आहेत. स्कूटरदुरुस्तीचाही एक उपविभाग आम्ही ठेवला आहेच.


आता उच्चपातळीवरील व्यवस्थापनाच्या दृष्टीने सर्व्हिसस्टेशनचे सर्व निर्णय व प्रशासकीय नेतृत्व मी करतो. श्रीधर रिपेरिंग, सर्व्हिसिंग इ. तांत्रिक बाजूवर जातीने देखरेख करतो व मुकेश स्टोअर, वर्कशॉप्स—स्टॉक्स, पेट्रोलविक्री व सर्व प्रकारचे हिशेब, ग्राहकांकडून वसुली, तसेच स्मरणपत्रे, पेमेंटस् आणि बँक—व्यवहार पाहतो.

**तुमच्या साई सर्व्हिसस्टेशनच्या धंद्याचे स्वरूप कसे आहे ? ग्राहकवर्ग पहिल्यापेक्षा वाढला आहे काय ? दर महिना प्रत्येक विभागातील उलाढाल किती आहे ?**

मोठ्या प्रमाणावर धंदा करणाऱ्या आमचे सर्व्हिसस्टेशन पुण्यातल्या काही मोजक्या सर्व्हिसस्टेशनपैकी आहे. आम्ही चालवायला घेतल्यापासून आमच्या ग्राहकवर्गात १–२ वर्षांतच सुमारे ५०% वाढ झाली आहे. सर्व्हिसस्टेशन हा आमच्या कमाईत जास्त भर टाकणारा विभाग. त्यानंतरचा आम्हाला उत्पन्न देणारा विभाग म्हणजे रिपेरिंग व स्पेअर्सविक्री. हल्ली पेट्रोल महाग झाल्यामुळे, व पेट्रोलमध्ये तोट्याचेच प्रमाण वाढल्यामुळे आमचा उत्पन्नाचा नेहमी पहिला असणारा व मुख्य व्यवसाय—आता तिसऱ्या क्रमांकाचा आहे आणि त्यानंतर कारला लागणाऱ्या इतर गोष्टींची विक्री. उदा. बॅटरी, टायर्स, ट्यूब्ज इत्यादी. सर्व्हिसस्टेशन ही आमच्या अभिमानाची गोष्ट आहे. पुण्यात साई सर्व्हिसस्टेशन कारसर्व्हिसिंगच्या बाबतीत गुणवत्ता व जॉब्सची संख्या ह्या दोन्ही दृष्टींनी—निर्विवादपणे पहिल्या क्रमांकाचे आहे. दररोज सरासरी २० गाड्यांचे सर्व्हिसिंग आम्ही करतो, तसेच २० गाड्यांची रिपेर पूर्ण



अर्थ



सर्व्हिसिंग चालू असताना.

करतो. म्हणजे महिन्यात कमीत कमी १००० गाड्यांची कामे आम्ही पुरी करीत असतो. पुण्यातील साई सर्व्हिसचे स्टिकर गाडीच्या मागल्या काचेवर अभिमानाने लावून घेणारे आमचे असंख्य ग्राहकच, आमच्या सर्व्हिसची शिफारस करीत असतात. आमच्या ग्राहकात बडे उद्योगपती, व्यापारी, डॉक्टर, वकील, बँकर्स, पुण्यातल्या मोठ्या कंपन्या, सरकारी कार्यालये, बँका; तसेच जुन्नर, मंचर, संगमनेर, नासिक, प्रवरानगर, राहुरी, कोपरगाव, बारामती, फलटण, अकलूज इ. ठिकाणचे सहकारी कारखाने व प्रगतिशील शेतकरी ह्यांचा प्रामुख्याने भरणा आहे. दर महिना खात्यावर पेट्रोल घेणाऱ्या व्यक्ती व संस्थांची संख्या २०० आहे. ३ ते ४ आठवड्यांत आमच्या पंपावर सरासरी ८०,००० लिटर पेट्रोलची आणि डिझेलची विक्री होते. आमच्याकडे प्रॉम्प्ट सर्व्हिस व रिपेरिंगला आम्ही फार महत्त्व दिले आहे. साधारणपणे इंजिन ओव्हरहॉलिंगचे किचकट काम आम्ही आठवडाभरात करून देतो व इतर साधी कामे २-३ दिवसात. कारसर्व्हिसिंगला आली की चार तासात डिलिव्हरी देऊन मोकळे. कारवाले लोक फार फास्ट असतात. त्यांना साऱ्या गोष्टी झटपट हव्या असतात. साधं कारमध्ये पेट्रोल घेताना देखील त्यांना वेळ गमवायला आवडत नाही. ग्राहकांचं हे मानसशास्त्र आम्ही ओळखलंय म्हणूनच आम्ही पेट्रोल फार तत्परतेने भरून देतो; शिवाय पेट्रोल भरून घेताना वातावरण उल्हसित होण्याकरता आम्ही पंपावर संगीत ऐकवण्याची सोय केली आहे. त्यामुळे ग्राहकाचा मूड बदलतो व थोडासा वेळ लागला तरी त्याचा पारा फारसा चढत नाही.

प्रत्येक विभागाला उलाढालीची पर्याप्त मर्यादा मी ठरवून दिली आहे. त्याच्या खाली जर तो विभाग आला तर महिन्यातून एकदा विभाग प्रमुखांची बैठक घेऊन, त्यांच्या अडचणी–सूचना समजावून घेऊन मी त्यांना त्यांचा इष्टांक देतो ( Target ). त्या इष्टांकाच्या वर काम झाले तर, त्या विभागातल्या कर्मचाऱ्यांना मी प्रोत्साहक वेतन (Inceintives) देतो. आमच्या व्यवसायात ह्या इन्सेंटिव्हज्‌नी फार मोठी कमाल व जादू घडवून आणली आहे. कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता

त्याला अधिक वेतन देण्यानेच वाढते असे माझ्या अनुभवास आलें आहे. काही लोक त्यांना महिन्याचा पगार बांधून देतात व कामाचे तासही ठरीव असतात. जादा कामाकरता बक्षिसी देण्याच्या व पर्याप्त काम नित्याचे झालेच पाहिजे ह्या दंडकांमुळे आमचे कर्मचारी 'साई सर्व्हिस'चा वेग व गुणवत्ता टिकविण्यास आमचे बरोबरीचे वाटेकरी आहेत. स्टोअर, रिपेरिंग विभाग, सर्व्हिसिंग, फिलिंग स्टेशन, हवा भरणारे तसेच विक्री ह्या सर्व विभागातील लोकांना नित्याच्या कामापेक्षा जास्त काम केल्यास जादा वेतन मिळते. म्हणूनच आम्ही इतक्या गाड्यांचे काम तडफेने उरकू शकतो. साई सर्व्हिस ही एकच सर्व्हिस रात्रंदिवस ग्राहकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहे. आमच्याकडे तीन पाळ्या आहेत व त्यामुळे ही अर्ध्या रात्री उपयोगी पडणारी भरंवशाची सर्व्हिस झाली आहे.

**तुमच्या व्यवस्थापनात तुम्ही कोणत्या नव्या गोष्टी, नवे तंत्र व नव्या सुधारणा केल्या आहेत? त्यांचा लाभ किती प्रमाणात झाला?**

पेट्रोलपंप म्हटला की आपल्यासमोर एक ओंगळवाणं, तेलकट, कळकट, घाण वास येणारं ठिकाण डोळ्यांसमोर येतं. तिथली माणसं—काळ्याकुट्ट ऑइलचे डाग असणारे डगले घातलेले तिथले कर्मचारी, त्यांचे तांबरलेले डोळे, त्यांचे उर्मट वागणे, त्यांच्या कामातली बेदरकारी, तसेच शिव्यागाळ, कामातली दिरंगाई, अडवाअडवी, बनबाबनवी इ. इ. ह्या साऱ्या गोष्टी सर्वसामान्यपणे प्रत्येक पंपावर कमी–अधिक प्रमाणात दिसतीलच. आमची व्यवस्था सुरु झाल्यावर प्रथम आम्ही जी गोष्ट केली ती म्हणजे हे सर्व चित्र आमूलाग्र बदलण्याची. आमच्या पंपावरील प्रत्येक चौरस फूट आम्ही लखलखीत ठेवण्याची दक्षता घेतो. पंपाचे ऑफिस, दर्शनी इमारती, लॅंप पोस्टस्, डोळ्याला आल्हाद देतील अशी पोस्टर्स, डेकोरेशन, तसेच स्वच्छता ही आमची वैशिष्ट्ये आहेत. आमच्या पंपावरचा प्रत्येक कर्मचारी निळ्या रंगाच्या गणवेषात काम करताना दिसेल. त्याची ग्राहकांशी वागण्याची पद्धत आमच्या इभ्रतीला शोभेल अशीच असली पाहिजे असा कटाक्ष आहे. साई सर्व्हिसचे पेट्रोल म्हणजे शंभर नंबरी सोनं अशी ग्वाही आम्ही देऊ शकतो. त्यात भेसळ होणार नाही. सर्व्हिसला गाडी आल्यावर त्यातले पार्टस् बदलले जाणार नाहीत—नवे घातले तर चांगलेच घातले जातील—गाडीची रिपेर करताना योग्य सल्ला दिला जाईल, ग्राहकाच्या बजेटची कल्पना घेतली जाईल. तसेच त्याला आवश्यक त्या खर्चाचा अंदाज दिला जाईल. इ. इ. प्रत्येक रिपेरिंग जॉबवर आमचे स्वतःचे लक्ष असते. ग्राहकाची फसवणूक होणार नाही ह्याची काळजी घेतली जाते. **'सेवा आणि सचोटी' हे साई सर्व्हिसचे ब्रीदवाक्य आहे.**

आमच्या रिपेरिंग वर्कशॉपमध्ये आम्ही नुकतीच परदेशातून काही मशिन्स आणली आहेत. त्यातील एक म्हणजे व्हील अलाइनमेंट—की ज्यात कँबर, कॅस्टर व टोइन—ह्यांच्या सहाय्याने गाडीची चाके योग्य प्रमाणे बसली आहेत, त्याचप्रमाणे फ्री आहेत तसेच स्टिअरिंगव्हीलप्रमाणे फिरत आहेत की नाहीत हे चेक करता येते. दुसरं मीटर आहे इलेक्ट्रिकल सर्किट तपासण्याचे. त्यामुळे गाडीमधला इलेक्ट्रिकल फॉल्ट चटकन डिटेक्ट होतो. तिसरं मशीन आहे गाडीचं एंजिन चेक करण्याचं. त्यामुळे इंजिन डाउन करून फॉल्ट शोधत बसावे लागत नाही. त्याचप्रमाणे गाडीचे टायमिंग, फायरिंग ऑर्डर, चेक करून ती व्यवस्थित करण्याचे एक मीटर आहे. ह्या अद्ययावत यंत्रांमुळे (Sophisticated gadgets) आमच्या वर्कशॉपमध्ये पुण्यातील इतर गॅरेजेस्‌मधील दुरुस्ती करणारे लोकही येतात व ह्या मशिन्सचा फायदा घेतात. ह्या मशिनरीकरता आम्हाला फार पैसे खर्च करावे लागले; पण त्यामुळे कामाची Accuracy वाढली व Efficiency देखील.

ह्यापेक्षा एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कुठल्याही पेट्रोल–पंप व गॅरेजच्या कामात हिशोबाची व लिहिण्या–टिपणाची हेळसांड केली जाते. आम्ही आमच्याकडे जॉबकार्ड सुरू केले आहे. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलेल्या पेशंटच्या केसपेपरप्रमाणेच हे जॉबकार्ड असते. त्यात गाडीचा नंबर, इतर तपशील, गाडीतील पेट्रोल, गाडीबरोबर आलेल्या सामानाची नोंद, तसेच करावयाचे जॉब्स, त्याला लागणारा अंदाजे खर्च, इलेक्ट्रिकल सामानाची नोंद, स्पेअर पार्टस्, इतर मजुरी, ऑइल, ग्रीस, ओव्हरटाइम इत्यादी प्रत्येक बाबीचे तपशीलवार बिल असते. ह्या जॉबकार्डमुळे ग्राहकाला देखील, आपण आपल्या गाडीचे कोणते काम करून घेतले आहे त्याचे रेकॉर्ड मिळते. ह्या जॉबकार्डचा ताळा 'स्टॉककार्ड.' वर होतो. स्टॉककार्डवर स्टोअरमध्ये आलेला माल व बाहेर गेलेला माल व शिल्लक ह्यांच्या नोंदी असतात. 'सर्व्हिसकार्ड' एक वेगळेच आहे. त्यात एंजिन ऑइल, ऑइल फिल्टर, गेअर ऑइल, टायर रोटेशन, स्पार्क प्लग क्लीनिंग, रेडिएटर, ब्रेकसेटिंग, एंजिन ट्यून–अप इत्यादी तपशीलवार कामांचे बिल मांडले जाते. सर्व्हिसकार्ड व स्टॉककार्ड ह्यांचा ताळा होऊ शकतो. ह्याशिवाय सर्व्हिस आणि सेलसरेकॉर्ड तसेच इन्स्पेक्शनरिपोर्ट हे दोन, प्रत्येक कारच्या बाबतीत भरले जातात. ह्या सर्व लेखी कामामुळे—स्टोअर, स्पेअर्स, स्टॉक्स, जॉब्स व विक्री ह्या सर्वांवर चांगले नियंत्रण रहाते. ब्याच गॅरेजेसमध्ये काही वेळा कामे जास्त होऊनही विस्मरणामुळे बिल कमी लावले जाते. स्टोअरमधून मालाची अफरातफर होते. इ.



गाड्यांचा रिपेअरिंग विभाग

ह्याशिवाय ग्राहकांना विशेष सोयी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आम्ही 'कारची सर्व जोखीम व काळजी घेण्याचा वर्षाचा करार' तसेच वर्षाची सर्व्हिस ह्याकरिता खूप सवलतीचे दर आकारतो. सर्व्हिस आवश्यक झाली की आमचे स्मरणपत्र बिनचूकपणे ग्राहकाकडे जाते. थोडीशी हेळसांड झाली की गाडीच्या बाबतीत शेकडो रुपयांची हानी होण्याचा संभव असतो. साधं डिफरन्शिलमधलं ऑइल बदललं नाही तर गाडीच्या मागल्या आसातील महत्त्वाचे भाग निकामी होतात. ग्राहकाला सल्ला देण्याचं काम आमचेकडून आम्ही करत असतो. ग्राहकाला हल्ली कार मेंटेन करणं जड जातं. त्यामुळे आमच्या सल्ला पटूनही साऱ्याच गोष्टी व्यवस्थित करता येत नाहीत. **तरी त्यातल्या त्यात महत्त्वाच्या गोष्टी आम्ही त्याला करायला भाग पाडतोच.**

**ह्या धंद्यात तुम्हाला कोणत्या समस्या व अडचणी आहेत?**

आमचा खरा आधार आणि मुख्य धंदा म्हणजे पेट्रोलविक्री; पण पेट्रोलपंप चालवणे म्हणजे एक तोट्याचा धंदा करणे असं समीकरण झालं आहे. पेट्रोलविक्रीचे आमचे कमिशन गेल्या वीस वर्षांत एका पैशानेदेखील वाढले नाही. मात्र पेट्रोलचे दर मात्र दर लिटरमागे भडकत गेले. लोकांची समजूत असते, पेट्रोल महाग झालं आहे-पेट्रोलवाले बख्खळ पैसा मिळवत असतील; पण ह्या भाववाढीचा यत्किंचितही कुणानेही फायदा आम्हाला झालेला नाही. उदाहरणार्थ पाहा :

| वर्ष | पेट्रोलदर | डीलरचे कमिशन दर लिटरमागे | कमिशनची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९५५ | रु. ००-७० पैसे | ४ पैसे | ७% |
| १९७५ | रु. ३-५० पैसे | ४ पैसेच | १% |

पेट्रोल भरताना जे उडून जाते त्याचे दर लिटरमागे प्रमाण १ टक्का असते. म्हणजे आम्ही १ लिटर पेट्रोल ग्राहकाला दिले की ३·५ पैशांचे पेट्रोल उडते. आमची कमाई असते लिटरमागे ४ पैसे तेव्हा सरकारने जेमतेम अर्धा पैसा आमच्याकरता राखून ठेवला आहे. ह्याच्या तुलनेने इतर देशांचा पेट्रोल-डीलर्सचे कमिशन-दर पाहा :

| | | | |
|---|---|---|---|
| जपान | १३% | थायलंड | १०% |
| हॉलंड | ११% | इटली | १५% |
| ब्राझील | ५% | भारत | १% |

ह्या अन्यायाविरुद्ध अखिल भारतीय पेट्रोल डिलर्स असोसिएशनने सतत दाद मागितली आहे. श्री. शांतिलाल शहा समिती (१९६८) ने मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार केला होता. ऑक्टोबर१९७३मध्ये जेव्हा आम्ही हा धंद बंद करण्याचा निर्णय घेतला त्या वेळी पेट्रोलमंत्र्यांनी आमचे कमिशन वाढविण्याची लोकसभेत घोषणा केली होती. कमिशन तर वाढले नाहीच मात्र आमची परवाना-फी (खंड) मात्र वाढला. त्यात १०० टक्क्यांनी वाढ झाली आहे. शिवाय परवाना कोणतेही कारण न देता ९० दिवसांच्या पूर्वसूचनेने रद्द करण्याची तरतूद 'आमचा मानसिक ताण' वाढविणारी आहे. माझ्या इतर सहकाऱ्यांना तूर्तास प्रामुख्याने खालील समस्या आहेत :

१. पेट्रोल-डिझेल धंद्यातील प्रचंड भांडवली गुंतवणूक व अलीकडे कंपन्यांनी सुरू केलेले मागणी-ड्राफ्टचे व्यवहार. त्यामुळे डिलरला आपला रोख पैसा अगोदर गुंतवावा लागतो. पूर्वीसारखे क्रेडिट त्याला मिळत नाही. मात्र त्याने पेट्रोल विकल्यानंतर कालांतराने त्याचे पैसे वसूल होत असतात. काही वसूल होतच नाहीत. (Bad debts) त्यामुळे व्याजाचा बोजा वाढतो.

२. पेट्रोलकंपन्या प्रत्येक डीलरवर त्यांनी उत्पादन केलेला माल विकण्याची सक्ती करतात. त्यात अडकून रहाणारे भांडवल.

३. पेट्रोल भरण्याकरता लागणारी साधने, उपकरणे, मजुरीचे युनिफॉर्म इत्यादी सर्व खर्च डीलरलाच सोसावा लागतो. पूर्वी कंपन्या तो सोसत असत.

४. गेल्या २० वर्षांत किमान मजुरीत झालेली १००% वाढ, प्रॉव्हिडंट फंड, बोनस इ. चा खर्च.

५. त्याचप्रमाणे स्टेशनरी, पोस्टेज, स्थानिक व इतर कर, वीज, पाणी, ग्रीस, ऑइल इत्यादींचा वाढता खर्च.

६. बँकेच्या व्याजाचा दर जास्त / खाजगी बँकरचा त्याहून जास्त.

७. बऱ्याच पंपांना परवानगी देण्याचे धोरण. त्यामुळे प्रत्येक पंपाच्या गिऱ्हाईकींवर परिणाम.

८. पेट्रोलच्या दरात प्रचंड वाढ झाल्यामुळे ग्राहकांची पेट्रोलची मागणीदेखील ३० टक्क्यांनी घटली आहे. जितक्या गाड्या पळत नाहीत तितका त्यांचा सर्व्हिसिंग, रिपेरिंग खर्चही कमी झाल्यामुळे पंपांना तोटा.

९. काही कंपन्या डीलर्सकडून ठेवींची मागणी करतात.

१०. मालमत्ता-कर व इतर करांपैकी ९०% रक्कम कंपन्या डिलर्सकडूनच वसूल करत आहेत.

११. पुण्यात दर महिन्यातून दोनदा पाणीपुरवठा बंद असतो. त्यामुळे सर्व्हिसिंगचे काम स्थगित करावे लागते. पॉवरकटमुळे कॉम्प्रेसर बंद ठेवावा लागतो. म्हणून सर्व्हिसिंगचे जॉब्स जास्त होत नाहीत.

सारांश पेट्रोलविक्री हा आमचा धंदा हल्ली नुकसानीचा आहे. आम्ही त्यातून डोके वर काढतो ते आमच्या सर्व्हिसिंग, रिपेरिंग इ. विभागांमुळे; पण ज्यांना त्या गोष्टींची जोड नाही त्यांची आर्थिक परिस्थिती कठीण आहे. गेल्या २–३ वर्षांत बरेच पंप बंद पडले किंवा त्यांच्या मॅनेजमेंट बदलत राहिल्या–आडमार्गी मिळणाऱ्या पंपावर शुद्ध पेट्रोल मिळेलच ह्याची खात्री राहिली नाही. सारांश धंद्यातला हा तोटाच धंदा करणाऱ्या माणसाला खोट्या गोष्टी करायला भाग पाडतो असे दिसते.

भारतात माझा पंप धरून एकूण सुमारे ११००० पंप आहेत. त्यातले ८५०० पंप ४०,००० लिटरपेक्षा कमी पेट्रोलची दरमहा विक्री करत असतात. २ लिटरला १ पैसा कमिशन धरले तर त्यांची कमाई २०००० पैसे म्हणजेच २०० रुपये दरमहा आहे. म्हणजे पंप चालविणाऱ्या मालकाला सामान्य मजुराचे किमान वेतन जे २०० रु. आहे ते मिळण्याची सोय उपलब्ध आहे. आपल्या पुण्यात १०७ पंप आहेत. त्यातल्या ५० टक्के पंपांची दर महिन्याला विक्री फक्त २०००० लिटर आहे. आमच्यासारखे काही थोडे पंप सोडले तर इतरांची स्थिती चांगली नाही. तरीही अजून लोक पंपाचा धंदा करतात...केवळ आशा आहे...कारण दुसरा पर्यायच नाही ! बरं, भांडवलाचंच पहा ना. २०,००० लिटर पेट्रोल घ्यायला किमान ६०,००० रु. चा डिमांड ड्राफ्टने भरणा मात्र आगाऊ करावा लागतो. सारांश भांडवल व त्यावरचा लाभांश (Return) ह्यामध्ये काहीच मेळ दिसत नाही.

**नव्याने ह्या धंद्यात प्रवेश करणाऱ्यांना तुम्ही कोणता कानमंत्र द्याल ?**

मी एवढंच सांगेन की ऑटोमोबाइल इंजिनिअर म्हणून ह्या धंद्यातले तांत्रिक कसब प्रथम आवश्यक. त्यानंतर धंद्याची साहसी दृष्टी व हिशोबीपणा. ह्या सर्वांचा झकास मेळ जमला तर रिपेरिंग, सर्व्हिसिंग, स्पेअरविक्री ह्यांत अजून बऱ्यापैकी नफा आहे; पण ह्याकरता 'केवळ सचोटी' व ग्राहकाला मनपसंत सेवा' ह्या गोष्टींखेरीज अन्य कशाचीही जरुरी नाही. लहान गॅरेज, लहान वर्कशॉप, लहान पंप इ. सगळीकडे वाईट अनुभव घेत घेत शेवटी मोटरवाला माणूस हा चांमलाच

सुप्रतिष्ठित, विश्वसनीय सर्व्हिसिंग स्टेशनवरच येतो व त्याला अंतिमपणे हे कळते की छोटया गॅरेजमधले काम हे दीर्घ काळात जास्त महागडे व हानिकारक होते तर मोठ्या गॅरेजचे काम प्रथमदर्शनी महाग वाटते; पण परिणामी हिताचे असते. तेव्हा ह्या धंद्यात वाव आहेच, पेट्रोल महाग झालं तरी ज्यांची कार मेंटेन करण्याची कुवत आहे त्यांच्या मागणी व गिऱ्हाइकीवर काहीच परिणाम झालेला नाही व होणारही नाही. शिवाय कंपन्या, सरकारी व सहकारी संस्था ह्यांना तर गाड्यांची गरज लागणारच नाही असे कसे म्हणता येईल ?

**तुम्ही कारच्या मालकांना कोणता अनुभवी सल्ला द्याल ?**

पहिला सल्ला हा की ह्या महागाईच्या काळात ज्यांना दरमहा ५०० रु. कारकरताच केवळ खर्च करण्याची ऐपत आहे, तसेच कारच्या आकस्मिक (Contingent) दुरुस्तीकरता ज्यांना सदैव १००० रु. बाजूला काढून ठेवता येतील त्यांनीच कार ठेवावी. ते शक्य नसल्यास स्कूटर घ्यावी. जरा Less Comfortable होईल; पण Happy life मिळेल. ज्या वेळी सर्व कुटुंबाला एकत्र जायचे आहे त्या वेळी रिक्शा व टॅक्सी करणे ह्यातच आर्थिक दृष्टया शहाणपण आहे. दुसरं म्हणजे पेट्रोल दिवसेंदिवस महाग होत आहे म्हणून कारचे ट्यून-अप व सर्व्हिसिंग जास्त तीव्रतेने आवश्यक झाले आहे. कारण जितकी कार व्यवस्थित तितकी पेट्रोलची सरासरीही अधिक मिळते. अलीकडे कारचे रनिंग जास्त होत नाही. त्यामुळे बॅटरी, एंजिन इ. तितकेसे कार्यक्षम रहात नाहीत. त्याकरताच देखभालीची जरूर आहे. सर्व्हिसिंग करून घेताना नट, बोल्ट चेक करणे, ग्रीसिंग, ऑइल इ. महत्त्वाचे. केवळ कार सुंदर चकचकीत दिसणे म्हणजे देखभाल करणे नव्हे. तिसरं म्हणजे कारमालकांनी सर्व्हिसिंग करताना हयगय करू नये. कारण Servicing in time, saves repairs many times. चौथी गोष्ट ही लक्षात घ्यावी की कारमध्ये वेगवेगळ्या ४०–५० गोष्टी (Systems) असतात की ज्यामुळे परफेक्ट कंडिशनमध्ये कार असणे कठीण असते. गाडी रिपेरिंगला दिली किंवा सर्व्हिसिंगला दिली म्हणजे गिऱ्हाईक जितक्या गोष्टी करायला सांगते तेवढेच काम केले जाते. सर्व्हिसिंग झाल्यावर पाण्यामुळे इलेक्ट्रिकल फॉल्ट होण्याची कधी वेळी शक्यता असते. अशा वेळी आपली गाडी घेऊन जाताना लगेच लक्षात येत नाही. काही वेळानंतर परत कारमालक सर्व्हिस-स्टेशनकडे तक्रार करण्याकरताच येतो. एखादे चांगले काम झाले, प्रवास विनात्रास सुरेख झाला, गाडी देताना गिऱ्हाइकाची वेळ साधली—अशा काही चांगल्या गोष्टी घडल्या तरी फारच थोड्या व्यक्तींकडून शाबासकीचे शब्द मिळतात. नाही तर कार सर्व्हिसिंगच्या धंद्यातील लोकांना सतत तक्रारीच व कटु शब्दांचं हलाहलच जास्त वेळा पचवावं लागतं. ग्राहकांनी Encouragement व Appreciation चे केवळ दोन शब्द आम्हास द्यावे असं आम्हाला वाटतं.

**तुमच्या भावी योजना कोणत्या ? तुम्हाला असं वाटतं का की नव्या योजना बास करून आहे तितकंच सांभाळावं ?**

आहे तितकंच सांभाळावं...असं वाटायला माझं काही वय झालेलं नाहीय. उलट मला असं वाटतं की 'साई सर्व्हिस' अजून विस्तारली पाहिजे. ह्याकरता काही योजना मी घेतोय. पहिली म्हणजे कार-ओनर्संना, कारची काळजी कशी घ्यावी, सर्व्हिसिंगवर देखरेख कशी करावी, एखादा Fault झाल्यास दुरुस्ती करून गाडी अडलेल्या स्थितीतून घरी सुखरूप कशी आणावी ह्याचे प्रशिक्षण देणारे कोर्स मला सुरू करायचे आहेत. विशेषत: महिलावर्षाच्या निमित्ताने, महिलांचे गाडीची दुरुस्ती शिकवण्याचे वर्ग घ्यावेत असा विचार आहे. वर्गानंतर त्यांची परीक्षा, बक्षिसे, प्रमाणपत्रवितरण इ. करावे. इतर पंपांवरची माणसे आमच्या पंपावर प्रशिक्षित करणे, पुण्यातल्या इतर सर्व्हिसिंग स्टेशनमध्ये सहकार्य वाढवणे, ट्रान्स्पोर्ट सर्व्हिस सुरू करणे, संबंधितांना कन्सल्टिंग देणे इत्यादी इत्यादी. जितकं जमेल तितकं करायचं. कारण मी आहे एक वैमानिक. मला उड्डाणाचे व्यसन आहे आणि आकाश एवढीच मर्यादा मला माहीत आहे !


अर्थची वर्गणी पाठवतांना चेक वा मनीऑर्डर इत्यादी पुढील नावाने पाठवावे.

" अर्थ मासिक ARTHA (Monthly) "

पत्रव्यवहाराचा पत्ता–संपादक अर्थ

C/o श्री. सुभाष बर्वे, ९०६, शिवाजीनगर, पुणे ४.

वर्गणीदारांकरिता अर्थ मासिकाचा कुठल्याही प्रकारचा अर्ज, फॉर्म इ. भरावा लागत नाही.

वर्गणी मनीऑर्डर वा चेकने वरील पत्त्यावर पाठविल्यास अंक रवाना होणे सुरू होईल.

# नावीन्यपूर्ण प्रकाशने

- **परिमलदेशचा राजकुमार :–** लेखक डॉ. म. स. नगरकर; मूल्य दोन रु.; किशोर-वाचकांना मंत्रमुग्ध करणारी कथा, आकर्षक मुखपृष्ठ, सुंदर चित्रे, मोठा टाइप.
- **पानफूल ( निवडक कविता ) :–** सूर्यकान्त खांडेकर; मूल्य पाच रु.; अभिरुचिसंपन्न, आनंदयात्री कलावंत हृदयाची भावमधुर स्पंदने.
- **भांडवलशाही आणि समाजवाद :–** लेखन प्रा. प्र. गो. ठोम्बरे; मूल्य सात रु.; व्याख्या, वैशिष्टये, गुणदोष, भवितव्य या मुद्द्यांच्या आधारे दोन्ही अर्थव्यवस्थांचे साधार व निर्विकार विवेचन.
- **भारतातील साखर उद्योग :–** लेखक प्रा. प्र. गो. ठोम्बरे; मूल्य चार रु.; साखरउद्योगाच्या आर्थिक बाजूने विहंगमावलोकन; प्रस्तावना – ना. अण्णासाहेब शिंदे.
- **भारतातील कागदउद्योग :–** लेखिका प्रा. सौ. शान्ता पंडित; मूल्य दहा रु.; 'भारतीय कागदउद्योगाचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातून परामर्श घेणारा मराठीतील पहिलावहिला ग्रंथ; पुरस्कार – ना. रत्नाप्पा कुंभार.
- **छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण ( एक चिकित्सक अभ्यास ) :–** छत्रपती शाहूंच्या लोकोद्धारक धोरणाची अर्थशास्त्रीय निकषाद्वारे चिकित्सा करणारा आगळा प्रबंध; सडेतोड, साधार व निष्कर्षयुक्त विवेचन.
  लेखक–डॉ. वि. बा. घुगे, एम्. ए., पीएच्. डी.
  प्रस्तावना–डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, पीएच्. डी.
  मूल्य– वीस रुपये
- **Advanced Commercial Correspondence :–**
  by Prof. Subbash Dapke, M. A., Price Rs. 6/–
  The book designed to meet the requirements of students preparing for B. Com. Part II and other business examinations. Foreward by Prin. K. Bhogishayan.

**आपल्या पुस्तकविक्रेत्यांकडे मागणी करा**
**अथवा प्रकाशकास लिहा.**

प्रकाशक

## The Kolhapur Writers' Co-op. Society Ltd.

**1049, E Ward, Shahupuri, 6th Lane,**
**KOLHAPUR – 416 001**



तरुणांचे मनोगत

# शालांत परीक्षेनंतर पुढे काय ?

श्री. द. जळूकर
बी. ए. बी. एड्.

पुणे विद्यार्थी गृहाचे एक घटक श्री. जळूकर ह्यांनी व्यवसायमार्गदर्शनावरच्या लेखमालेत काही माहिती समाविष्ट करावी, ह्या दृष्टीने काही अभिनव व रूढ अर्थाने वेगळे असे अभ्यासक्रम प्रस्तुत लेखात सुचविले आहेत.

कार्यवाह, व्यवसायमार्गदर्शन मंडळ, पुणे १२

दहावी–अकरावीच्या मित्रांची परीक्षेनंतर पुढे काय करावे ? या प्रश्नामुळे अर्जुनासारखी किंकर्तव्यमूढ स्थिती होते. सगळ्यांनाच पुढचे शालेय किंवा कॉलेजचे शिक्षण घेता येत नाही. परिस्थिती, बुद्धीचा आवांका आणि आर्थिक अडचणीमुळे शालेय शिक्षण थांबवून दुसरे काही तरी उत्पन्नाच्या दृष्टीने उपयोगी असे शिकायची गरज निर्माण होते. त्या दृष्टीने अल्पमुदतीचे अभ्यासक्रम कोणते आहेत ही माहिती असणे जरुरीचे व उपयोगी ठरेल.

अल्प मुदतीचे म्हणजे काही आठवड्यांत किंवा काही महिन्यांत अथवा १–२ वर्षांत पूर्ण होणारे अभ्यासक्रम ! त्यापैकी काही अभ्यासक्रम पूर्ण करताना विद्यावेतन, शिष्यवृत्त्या वगैरे मिळू शकतात. काहीसाठी अल्प फी असते. अशा प्रकारचे अभ्यासक्रम पूर्ण करून व्यवसाय किंवा नोकऱ्या मिळवून घेणे ही आजच्या दृष्टीने मध्यम वर्गीय ग्रामीण विभागात व शहरातून सिंगल रूममध्ये राहणाऱ्या गरीब कुटुंबात मोठीच गरज आहे.

## ग्रंथपालन–सहाय्यक

शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना उन्हाळी सुटीत सकाळसंध्याकाळ सवड असलेल्यांना हा कोर्स करता येतो. फक्त सहा आठवडे म्हणजे सुमारे दीड महिन्यात हा कोर्स पूर्ण होतो. पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद या शहरांत ही सोय आहे. सरकारी मान्यतेचे प्रमाणपत्र मिळाल्यावर दरमहा सुमारे ३०० रुपये वेतनावर खाजगी वा सरकारी वाचनालयात अथवा शालेय किंवा कॉलेजात ही 'पार्ट टाइम' ग्रंथपाल मदतनीस म्हणून काम मिळू शकते.

पत्ते : (१) साहित्य सहकार संघ लिमिटेड, नारायण पेठ, पुणे ३०. (२) साहित्य सहकार संघ लि., नायगाव, क्रॉस रोड, मुंबई १४. (३) साहित्य सहकार संघ लि., औरंगपुरा, औरंगाबाद. (४) साहित्य सहकार संघ लि., लिमयेवाडा, सिताबर्डी, नागपूर.

कोर्सची फी सुमारे शंभर रुपये असून १६ वर्षांवरील कोणीही स्त्री–पुरुष कोर्सला प्रविष्ट होऊ शकतो.

## टेलिफोन मेकॅनिकल ऑपरेटर

शालान्त परीक्षा पास, इंग्रजी, गणित आवश्यक. वय १६ ते २१, मुदत १ वर्ष. विद्यावेतन दरमहा ६५ रु. मिळते. टेलिफोनयंत्रणेतील दुरुस्त्या करणारे तंत्रज्ञ ( मेकॅनिक ) हे त्याचे स्वरूप. टेलिमेकॅनिक हा सरकारी नोकरच असतो. टेलिफोन–ऑपरेटर होण्यासाठी अटी वरीलप्रमाणेच असतात. तथापि मुदत फक्त दोन महिने. उच्चार सुस्पष्ट व बहुभाषिकत्व असल्यास प्रवेश लवकर. भाषेतील गोडवा व नम्रता हे गुण ऑपरेटरला असावेच लागतात. या क्षेत्रात टेलिफोन–ऑपरेटर्स म्हणून पुष्कळशा मुली व स्त्रिया काम करू शकतात. पुरुष टेलि–ऑपरेटर्सही असतात.

या कोर्सनंतर सरकारी नोकरी टेलिफोन एक्स्चेंजमध्ये शहरात मिळू शकते किंवा काही फर्मस्, कारखाने व ऑफिसेस-

मध्येही रिसेप्शनिस्ट कम ऑपरेटर म्हणून नोकरी करता येते.

दरवर्षी सरकारी गरजेनुसार पोस्ट अँड टेलिग्राफ खात्यातर्फे वर्तमानपत्रातून प्रकटने देऊन अर्ज मागविले जातात.

## लॅबोरेटरी टेक्निशियन

शालान्त परीक्षा उत्तीर्ण, शास्त्र–रसायन–विषय अपेक्षित मुदत एक वर्ष. केमिकल लॅबोरेटरीज, फार्मसीज् आणि पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरीज ( रक्त, लघवी, थुंकी तपासणीचे ) मध्ये काम करता येते. वय १७ ते २३. कोर्स ऑगस्टमध्ये सुरू होतो.

वरीलप्रमाणेच सर्व अटी प्रवेशास आवश्यक; पण कोर्स चालू असताना सुमारे ५० रुपये विद्यावेतन मिळते. फोटोग्राफी हा आवडीचा छंद म्हणून असेल तर लवकर प्रवेश मिळण्याची शक्यता.

पत्ते : ग्रँट मेडिकल कॉलेज, भायखळा, मुंबई ८ आणि मेडिकल कॉलेज, औरंगाबाद. याशिवाय ससून हॉस्पिटल, पुणे, यासारख्या ठिकाणीही चौकशी करावी.

## (१) क्राफ्टस्मन कोर्स इन कंपोझिंग अँड प्रिंटिंग

सामान्यपणे ९ वी–१० वी पर्यंत शिक्षण झालेल्यांना प्रवेश मिळू शकतो. मुदत एक वर्ष. सरकारी प्रमाणपत्र मिळते. फी सुमारे १०० रुपये. खाजगी छोट्यामोठ्या छापखान्यात नोकरी मिळते. सरकारी मुद्रणालयात सुद्धा शक्यता असते.

## (३) हँड कंपोझिंग अँड प्रूफ रीडिंग

हाताने खिळे जुळवणे व छपाईसाठी मजकूर तयार करून देणे हे कंपोझिटरच्या कामाचे स्वरूप. मजकूर तयार झाल्यावर त्यातील शुद्ध-अशुद्धता तपासून देणे हे प्रूफ रीडरचे काम छापखान्यात असते. कोर्स नोकरी : धंदा सांभाळून पार्टटाइम शिकून पूर्ण करता येतो. रोज सायंकाळी ५–३० ते ७–३० या वेळात मुंबईस सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाईड आर्ट, डी. एन्. रोड, मुंबई–१ येथे चौकशी करावी.

## (४) ॲडव्हान्स सर्टिफिकेट कोर्स इन् प्रिंटिंग

एस्. एस्. सी. नंतर तीन वर्षांचा कोर्स. कंपोझिंग–प्रिंटिंग या क्षेत्रातील सूक्ष्म ज्ञान दिले जाते. कोर्स पूर्ण झाल्यावर छोट्या–मोठ्या छापखान्याचा सुपरवायझर होण्याइतपत प्रगती करता येते. आय. टी. आय. मध्ये इन्स्ट्रक्टर म्हणूनही काम नोकरी मिळू शकते. त्यासाठी पुणे विद्यार्थी गृह, महाराष्ट्र मुद्रणशाळा, सदाशिव पेठ, पुणे ३० येथे चौकशी करता येईल.

## रेडिओ टी. व्ही. मेकॅनिक

पुणे येथे सी. वाडिया कॉलेज पुणे १ किंवा मुंबई, सोलापूर, नागपूर, अमरावती येथील आय्. टी. आय. मध्ये शिक्षण घेता येते. टी. व्ही. च्या जमान्यातील आधुनिक गरजेचा हा कोर्स एस्. एस्. सी. नंतर करता येईल. शास्त्र, गणित हे विषय आवश्यक. चित्रकला सरकारी परीक्षा दिल्या असल्यास अधिक पसंती. याशिवाय शहरातूनही अनेक ठिकाणी खाजगी रीतीने हा कोर्स शिकवला जातो.

## सिनेमा क्षेत्र

सिनेमा क्षेत्रात जाण्यासाठी एस्. एस्. सी. झालेल्यांना वाव कमी आहे. कॉलेजची एक–दोन वर्षे झाल्यावर मात्र प्रवेश मिळविता येतो. त्या पातळीवरही लहान मोठे अभ्यासक्रम बरेच आहेत. या शिक्षणाची सोय पुणे व दिल्ली या दोन ठिकाणीच प्रामुख्याने आहे. या क्षेत्रात मराठी भाषीय विद्यार्थी कमी असतात. इंग्रजी, हिंदी भाषांचे उच्चारण अभिनयकुशलता, व्यक्तित्वसंपन्नता व सौंदर्य या गोष्टी अपेक्षित. कोर्सेसची फी सुमारे २५० रुपये असते. सरकार एका उमेदवारामागे कोर्स पूर्ण होईपर्यंत अनेक प्रकारचा खर्च ५–७ हजारपर्यंत करते.

सामान्यपणे हे कोर्सेस दीडदोन वर्षे मुदतीचे. ग्रॅज्युएशननंतरही त्यातील तांत्रिक अभ्यासक्रम पदोन्नती व चांगले भवितव्य निर्माण करून देणारे ठरतात. याविषयी इच्छुक मुला-मुलींनी पूर्ण अधिकृत माहिती मिळविणे व नंतर प्रवेश करणे ही आवश्यक व धोक्याची सूचना देणे येथे जरुरीचे आहे. फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट, प्रभातनगर, पुणे ४. हे सरकारी अधिकृत माहितीकेंद्र आहे.

## शाळेत मार्गदर्शन सोय हवी

व्यवसायमार्गदर्शन व शैक्षणिक मार्गदर्शनासाठी पूर्वी झालेय १० वी साठी सप्ताहात एक तासिका ठेवण्यात आली होती. नवीन अभ्यासयोजनेत, नव्या आकृतीबंधात १० वी मध्ये असलेल्याना वरील प्रकारचे मार्गदर्शन अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने शासनाची काही योजना असेल तर अनेकांचे कल्याण साधता येईल.

# पदवी
## नोकरी मिळवण्याचे साधन ?

**प्रा. बाळकृष्ण दत्तात्रय कुलकर्णी, एम्. ए.**
अर्थशास्त्रविभागप्रमुख.
श्री. छत्रपती शिवाजी कॉलेज, जुन्नर.

'पदव्या नकोत, नोकऱ्या हव्यात' ही तरुणांची आजची मागणी आहे. आजच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न चाललेला आढळतो. शिक्षण आणि नोकरीव्यवसाय यांची सांगड घालण्याच्या आवश्यकतेवर भर दिला जातो. महाविद्यालयीन शिक्षणानंतर नोकरीच्या शोधात असलेला तरुण त्याची पदवी नोकरी मिळवून देण्यास अपुरी पडते हे दिसताच बैतागतो.

'लग्नाचे बोहल्यावर चढेपर्यंतचा काळ कॉलेजात घालवू इच्छिणाऱ्या तरुणींना कॉलेज ही वेटिंग रूम वाटते.' नोकरीचे शोधात असताना तरुणाने तीच भूमिका स्वीकारावी काय असाही एक प्रश्न विचारला जातो. महाविद्यालयीन शिक्षण-प्रसारामुळे ग्रामीण भागातील तरुणांना या शिक्षणाची संधी प्राप्त झाली. आज महाविद्यालयामध्ये 'व्यावसायिक मार्ग-दर्शन' 'आय. ए. एस. एक्झमिनेशन कोचिंग क्लासेस' हे उपक्रम सुरू झाले आहेत. ते स्तुत्य आहेत. तथापी त्याचा ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उत्साह-जनक नाही. गुणवत्ता पात्रता लक्षात घेऊन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची या उपक्रमासाठी निवड करावी असे ठरले तर ती संख्या फारच सीमित होते व मूठभरांसाठी वेगळा आगळा उपक्रम असा त्याचा नावलौकीक होतो. सर्वांसाठी खुला ठेवला तर त्यातील आशय व विषय यांचे आकलन होणे कठीण जाते. दुसरे असे की निव्वळ विविध कोर्सेसची माहिती देण्यामुळे त्याचे सामान्यज्ञान वाढेल; पण त्याची पात्रता, तयारी व जिद्द यावरच त्याचे भवितव्य अवलंबून असल्याचे इंग्रजी म्हणी-प्रमाणे We can bring the horse to the water we cannot make him drink' ही अवस्था होते.


व्यावसायिक मार्गदर्शन योजना किंवा आय. ए. एस्. वर्ग महाविद्यालयीन इतर शिक्षणे व तत्सम परीक्षांचे मार्गदर्शन तर उपक्रमांप्रमाणे 'नेमेची येतो मग पावसाळा' या पद्धतीचे वर्ष साजरे करण्याचे विभाग असू नयेत. त्याची फलश्रुती परि-संवाद, इंटरव्ह्यू देण्याच्या पद्धती, लेखी परीक्षा व विषयातील सखोल व अद्यावत ज्ञान मिळवणे या तत्त्वांनी परिबद्ध असा-वीत. विशेषतः प्रथम वर्ष-वर्गातील विद्यार्थ्यास त्याचा लाभ दोन-तीन वर्षे मिळाला तर पदवी घेणारा तो विद्यार्थी स्पर्धा-त्मक रोजगार बाजारात आपले मेरिट सिद्ध करू शकेल.

**तसेच महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठाच्या एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजशी संलग्न स्वरूपाचे एक केंद्र असावयास हरकत नाही. विद्यार्थी आपले नाव या महाविद्यालयीन एम्प्लायमेंट ब्युरो-मार्फत डिस्ट्रिक्ट एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजकडे नोंदवू शकेल. शैक्ष-णिक गुणवत्तेमध्ये होणारे बदल तो यामार्गे योग्य वेळी नोंदवू शकेल.**

महाविद्यालयीन स्तरावर पाठ्यपुस्तकांचे सान्निध्यात पूर्व-नियोजित. व विद्यापीठाने निश्चित केलेला अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांस पदवीपरीक्षेसाठी तयार केला जातो. त्याला व्यावसायिक उपक्रमांची जोड देणे विशेषतः ग्रामीण महा-विद्यालयीन पातळीवर आवश्यक वाटते. 'सेल टॅक्स, इन्कम टॅक्स, विक्रीकला, शॉर्टहॅंड इ. सारखे अल्प मुदतीचे कोर्सेस महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठाच्या अनुमतीने सुरू करता आले तर नोकरीसाठी शिक्षण याऐवजी व्यावसायाभिमुख शिक्षण ह्याकडे लक्ष देता येईल.

तो नव्या अभ्यासक्रमात १० वी एस्. एस्. सी. होणारा ११ वी, १२ वी नंतर कॉलेज अशा मार्गे पदवीपर्यंत येणार आहे. ग्रामीण भागात माध्यमिक वा अन्य माध्यमिक स्तरावर कोणत्याही कारणाने आवश्यक ती भाषाशास्त्र अगर समाज-शास्त्र विभागातील विषय त्यास अभ्यासता आला नाही तर त्यास पदवीव्यतीरिक्तअन्य व्यावसायाभिमुख कोर्सेसचा लाभ घेता येणार नाही.

सारांश पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या माहितीबरोबरच पदवी अभ्यासक्रम पूर्ण करत असताना या विद्यार्थ्यास डोळस व प्रबुद्ध करणेची आवश्यकता आहे. **रोजगारहमीयोजनेप्रमाणे पदवी अगर किमान आवश्यक शिक्षणाने तो विद्यार्थी रोजगार मिळवू शकला पाहिजे किंवा रोजगारनिर्माता ठरला पाहिजे.**




# भारताची अर्थव्यवस्था

## ( भाग दुसरा )

लेखक : प्रा. रामचंद्र महादेव गोखले
प्रकाशक : कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०
पृष्ठसंख्या ४१०–किंमत २२ रुपये

मुद्रक : शशिकांत महादेव देव, सुलभ मुद्रणालय, पुणे ३०

पुणे विद्यापीठाने तृतीय वर्ष बी. ए. (T. Y. B. A. Special) ह्या परीक्षेसाठी सुधारित अभ्यासक्रमानुसार १९७५ च्या जूनपासून अर्थशास्त्र प्रश्नपत्रिका क्र. ५, भारतीय अर्थव्यवस्था भाग २–ह्या विषयासाठी नेमलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार हे पाठ्यपुस्तक प्रा. रा. म. गोखले ह्यांनी लिहिले आहे.

अर्थशास्त्र व राज्यशास्त्र ह्या विषयांवर हे पुस्तक धरून एकूण पंचवीस पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. गेली सुमारे २० वर्षे अर्थशास्त्राच्या विविध अभ्यासक्रमावरची पाठ्यपुस्तके त्यांनी सातत्याने लिहिण्याचा एकप्रकारचा विक्रमच केला आहे. जेमतेम एक पुस्तक पुरे करताना लेखकाला किती यातायात करावी लागते ह्याचा अनुभव लक्षात घेता इतकी पुस्तके लिहिण्याचे काम पार पाडणे ह्याला नियमितपणे लेखनाची सवय, शारीरिक प्रकृतीची जोड, चिकाटी व प्रचंड इच्छाशक्ती ह्यांची आवश्यकता असते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन अध्यापन करण्याचा प्रदीर्घ अनुभवही आवश्यक. प्रा. गोखले ह्यांना ह्या सर्व गोष्टींची अनुकूलता असल्यामुळे त्यांनी 'भारताची अर्थव्यवस्था' हे पुस्तकही त्यांच्या नेहमीच्या शैलीदार भाषेत, नेटक्या नियोजनाने व अद्ययावत माहिती व ब आकडेवारीचा उपयोग करून प्राध्यापक व विद्यार्थ्यांस एक उपयुक्त पाठ्यपुस्तक सादर केले आहे.

पुणे विद्यापीठाच्या बी. ए. अर्थशास्त्र स्पेशलच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना ह्या पेपरकरिता दुसरे 'कोणतेही पाठ्यपुस्तक इतक्या वेगाने लिहून प्रसिद्ध झालेले नाही. अर्थात अन्य पुस्तकेही अजून प्रसिद्ध झाली किंवा प्रसिद्ध झालेली असली तरी प्रा. गोखले ह्यांच्या पुस्तकाची प्रियता कमी होईल, असे नाही. सर्वसामान्य विद्यार्थ्याला अभ्यासक्रमावर भर देणाऱ्या, सुबोध व सरल पुस्तकाची जरुरी भासते. ह्या पुस्तकाची रचना करताना प्रा. गोखले ह्यांनी प्रथम नवा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सादर केला आहे. भारतीय चलनपद्धती, बँकव्यवसाय, परराष्ट्रीय व्यापार, वित्तव्यवहार व आर्थिक नियोजन अशा पाच प्रकरणांत विषयाची मांडणी केली आहे. पुस्तकाच्या शेवटच्या भागात अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने जे संभाव्य प्रश्न विचारले जातील ते देऊन विद्यार्थ्यांना त्या विषयाचा स्वाध्याय करण्यास, एक दिशाही दिली आहे.

ह्या पुस्तकात भारतीय अर्थव्यवस्थेतील नवी माहिती देण्याकरता विशेष कष्ट घेतले आहेत असे दिसते. उदाहरणार्थ, आंतरराष्ट्रीय चलन व वित्तीय विविध संघटना, वित्तमहामंडळ, आशियाई विकास बँक, चलनवाढ, नाणेबाजाराचे संघटन, परदेशी विनिमय बँका, व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण, ठेवी, विमा महामंडळ, इंडिअन बँकिंग कमिशनरच्या शिफारसी, भारताचा परराष्ट्रीय व्यापार, अर्थमंडळाच्या शिफारसी, करविषयक दृष्टिकोन, वांछू समिति, शेती-उत्पन्न, आर्थिक नियोजन, राजसमिती, – प्रो. वकील व प्रो. ब्रह्मानंद ह्यांनी दिलेली निवेदनपत्रिका, तुटीचा अर्थभरणा, नियोजनकाळात झालेल्या प्रगतीचा आढावा इत्यादींविषयी लिहिलेला भाग पूर्वीच्या त्यांच्या पुस्तकाचा विचार करता ताजा व अद्ययावत वाटतो.

पुस्तकात सुस्पष्टपणा आहे व प्रत्येक भागावर सीमित व संतुलित असा भर दिला गेला आहे; पण आर्थिक प्रश्नांचे विवेचन करताना टीकात्मक अभिप्राय (Comments) आणि सूक्ष्म विश्लेषण (Subtle Analysis) ह्यांची जरुरी असते. एखाद्या व्यवस्थेचे चार-पाच गुण-दोष वा नऊ-दहा फायदे-तोटे सांगून ते काम भागण्यासारखे नाही. असो. स्पेशलच्या विद्यार्थ्यांना त्या दृष्टीने दर्जेदार मासिकात व्यावसायिक अर्थशास्त्रज्ञांनी लिहिलेली आर्टिकल्स उपयुक्त असतात. ती वाचण्यापूर्वी मात्र विषय समजावून घ्यायला हे पाठ्यपुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल.

पुस्तकाची छपाई समाधानकारक झाली आहे. किंमतही कमी ठेवण्याचा प्रकाशकांनी प्रयत्न केलेला दिसतो. मात्र सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या क्रयशक्तीचा विचार करता असल्या प्रकारचे पुस्तक हे अजूनही स्वस्त करता आले तर बरे होईल. ●

# भारताचे परराष्ट्रीय धोरण

**संपादक : प्रा. सुनील दाते**

**प्रकाशक : विचार प्रकाशन**

२ समाधान कॉलनी,
सेशन्स कोर्टामागे, औरंगाबाद

मुद्रक : ज. रा. बर्दापूरकर, सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद
प्रथमावृत्ती : १९७४, किंमत रु. १२.००, पृष्ठसंख्या २२९

औरंगाबाद येथील प्रख्यात सरस्वतीभुवन कॉलेजमधील वीसएक प्राध्यापकांनी एकत्र येऊन, सहकारी तत्त्वावर त्यांची पुस्तके प्रसिद्ध करण्याकरता व त्यायोगे चांगल्या साहित्याचा प्रसार व्हावा ह्या ध्येयवादाने, 'विचार प्रकाशन' ही संस्था नुकतीच उभी केली आहे. १९७३ मध्ये त्यांनी 'भारतीय मध्यमवर्ग' नावाचे पहिले पुस्तक प्रसिद्ध केले. त्या पुस्तकात राजकीय, सामाजिक, आर्थिक, मानसशास्त्रीय अशा विविध दृष्टींनी भारतीय मध्यमवर्गाचा अभ्यास त्या त्या शास्त्रातील प्राध्यापकांचे लेख एकत्र करून सादर करण्यात आला होता. ह्या निबंधांचे एकसूत्र संचलन करताना विविध ज्ञानशाखांच्या अभ्यासकांनी एकत्र येऊन विचारांचे आदान-प्रदान करण्याचा हेतु फारच लक्षणीय व अभिनंदनीय आहे. हे पुस्तक महाराष्ट्रातील विद्यापीठातील सामाजिक संशोधनसंस्था तसेच संलग्न महाविद्यालयातील चिकित्सक वाचकांच्या पसंतीस उतरले व त्याचे स्वागतही चांगल्या प्रकारे झाले.

त्याच संस्थेचे हे दुसरे प्रकाशन. 'भारताचे परराष्ट्रीय धोरण, ह्या विषयावर जेवढे साहित्य तयार होईल तेवढे हवेच आहे. शेकडो वर्षे भारताचा संबंध जगातील इतर देशांशी आलाच नाही. पारतंत्र्याच्या काळात तो ब्रिटन व ब्रिटनच्या साम्राज्यांतर्गत देशांशीच थोडाफार आला. स्वातंत्र्योत्तर काळात पं. जवाहरलाल नेहरूंच्यामुळे आंतरराष्ट्रीय धोरणाचा पाया घातला गेला. भारताचे स्वतःचे असे एक आगळे स्थान व प्रतिमा निर्माण करण्याचे काम त्यांच्या परराष्ट्र-नीतीमुळे साध्य झाले. तथापी पहिल्या १०–१५ वर्षांत भारतातील सर्वसामान्य व्यक्तीला आंतरराष्ट्रीय राजकारणातील बारकावे कळून घ्यायला सुबोध व पुरेसे साहित्य उपलब्ध नव्हतेच. राष्ट्रीय नेत्यांपैकी फारच थोड्या नेत्यांना जागतिक प्रश्नांची नस समजून घेता येत असे. १९६५ नंतर भारताचा स्वतःबद्दलचा न्यूनगंड कमी होत आहे असे दिसते आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात मुत्सद्दीपणाचे व दूरदर्शीपणाचे निर्णय आता वेगळ्या आत्मविश्वासाने घेता येऊ लागले आहेत. १९७० नंतर भारताला काही आर्थिक संबंधातून राजनैतिक संबंध सुधारणे व काही राजनैतिक स्नेहातून आर्थिक विकासाला गती देणे शक्य होणार आहे. त्या दृष्टीने आपली शेजारील राष्ट्रे, तसेच जगातील राजकारणावर प्रभाव पाडणारी समर्थ राष्ट्रे, नव्या अस्मिता व आकांक्षा बाळगणारी विकसनशील राष्ट्रे ह्यांचा बारकाईने अभ्यास करणे अगत्याचे झाले आहे.

सदरहू पुस्तकात एकूण दहा निबंध आहेत. ते म्हणजे : (१) भारताचे परराष्ट्रीय धोरण– प्रा. दाते. (२) अलिप्तता– प्रा. वि. सी. जोशी. (३) परकीय मदतीमागचे बड्या शक्तींचे राजकारण– प्रा. प्र. रा. कुलकर्णी. (४) भारत आणि अमेरिका– प्रा. देशपांडे. (५) भारत आणि रशिया– प्रा. मुळे. (६) भारत आणि चीन– प्रा. जोशी. (७) भारत आणि पाकिस्तान– प्रा. दिनकर बोरीकर. (८) भारत, बांगला देश, नेपाळ व लंका– प्रा. बोरीकर. (९) भारत आणि इस्रायल– सौ. कमल मुळे आणि (१०) भारत आणि जपान– प्रा. जीवन देसाई.

वरील विषयांची निवड संपादकांनी मोठ्या कौशल्याने केली आहे. आवश्यक त्या ठिकाणी नकाशे दिले आहेत. अधिक चिकित्सक वाचकांच्या अभ्यासासाठी परिशिष्टात प्रमाणभूत अशा संदर्भसाहित्याची सूची दिली आहे. लेखकांनी आपआपल्या विषयाची मांडणी करतांना संदर्भसाहित्याचा कमून उपयोग केलेला दिसतो. परराष्ट्रीय राजकारण ज्या व्यक्तींनी प्रत्यक्ष खेळले आहे, ज्यांचा संबंध परराष्ट्रातल्या विविध स्तरांतल्या विभिन्न व्यक्ती वा गट ह्यांच्याशी जेवळून येतो, आंतरराष्ट्रीय राजकारणातील आर्थिक वा राजकीय हितसंबंध कसे असतात, कसे बदलत रहातात ह्याचे मुरब्बी व तरल ज्ञान; प्राध्यापकीय पेशातील व्यक्तींकडून अपेक्षित करणे अन्यायाचे होईल; पण असे लेखन करताना प्राध्यापकांनी अशा अनुभवी व्यक्तींशी चर्चा करून असे लेखन केले तर त्यात अधिक पक्केपणा (Maturity) येईल असे वाटते. तसेच एखाद्या देशाशीच फक्त त्या देशापुरती मर्यादित माहिती दिली तर फारसा बोध होत नाही. चीन व भारत ह्या दोन देशांची तुलना झाली अथवा अमेरिका–रशिया, रशिया–चीन अशी तुलना केल्यासच आंतरराष्ट्रीय राजकारण समजावून घेता येते. केवळ पाकिस्तानमध्ये असलेले रणगाडे व खडे सैन्य ह्यांची संख्या देऊन काहीच बोध होणार नाही. त्याचप्रमाणे राष्ट्राराष्ट्रांमधले वाद, तेढ, स्पर्धा असण्याची कारणे कोणती तेही लक्षात घेतले पाहिजे. निव्वळ राज्यसंस्थेच्या आदर्श कल्पनांमधील मतभेदामुळे नव्या जगात राजनैतिक संबंध बिघडतीलच असे म्हणता येणार नाही. असो. अशा प्रकारच्या पुस्तकाचे लेखन करीत असता, वृत्तपत्रे, मासिके इत्यादींतले लेख व परदेशातील वकील, मुत्सद्दी, पत्रकार ह्यांची पुस्तके अभ्यासताना सारासार

विचार करणारी एक प्रज्ञायुक्त दृष्टी जोपासल्यास उपलब्ध माहितीच्या आधारे जास्त अचूक असे निदान करता येईल.

मराठी भाषेत अशा प्रकारचे पुस्तक हे बहुधा पहिलेच असेल. अशा प्रयत्नांच्या दिशेने केलेली ही सुरुवात आहे. विशेषत: बी. ए. राज्यशास्त्र व अर्थशास्त्र ह्या विषयाच्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक उपयुक्त होईलच; पण सर्वसामान्य मराठी वाचकाला देखील परराष्ट्रांविषयी आता योग्य तितके कुतूहल निर्माण झाले आहे. महाराष्ट्राचे एक कुशल नेते मा. यशवंतराव चव्हाण ह्यांच्याकडे परराष्ट्रमंत्रालयाचे अवघड काम आले आहे. महाराष्ट्रातल्या व्यक्तीस अशी आव्हाने स्वीकारण्यात आनंदच वाटत आला आहे.

आधुनिक भारतातील महाराष्ट्रातल्या नव्या पिढीतील सर्वसामान्य तरुणाने व नागरिकाने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा अधिक डोळसपणे अभ्यास करण्याची आता जरुरी निर्माण झाली आहे. म्हणूनच वरील पुस्तक सार्वजनिक ग्रंथालयात तर असावेच; पण हायरसेकंडरी व कॉलेजमधील ग्रंथालयात असणे अधिक आवश्यक व औचित्यपूर्ण आहे. ●

---

## मौलाना आझाद : पुनर्मूल्यांकन

संपादक– प्रा. मोइन शकीर, प्रा. एस्. ए. अन्सारी, प्रा. एल्. एन्. देशपांडे, प्रा. दिनकर बोरीकर

प्रकाशक– गोविंददास श्रॉफ– संयोजक, मौ. आझाद प्रकल्प, खाराकुंवा, औरंगाबाद.

मुद्रक– ज. रा. बर्दापूरकर, सन्मित्र कॉलनी औरंगाबाद., पृष्ठसंख्या ९६ । मूल्य– चार रुपये.

---

मौलाना अबुल कलम आझाद हे राष्ट्रीय चळवळीतील एक बिनीचे नेते. त्यांच्या जीवन, कार्य व विचारांचे बुद्धिनिष्ठ विवेचन देणारे हे पुस्तक मराठी वाचकांना देण्यात प्रकाशकांनी केवळ पै. आझादांना श्रद्धांजली वाहण्याचे काम केले नसून मराठी वाचकांना मुस्लिम समाजाच्या अंतर्मनाचा कप्पा न् कप्पा खुला करून दिला आहे.

भारताचा अभ्यास करताना हिंदू-मुस्लीम प्रश्नाला दुर्लक्षून चालणार नाही. समाजकारणात, राजकारणात, अर्थकारणात सर्व ठिकाणी हा प्रश्न उपस्थित राहतो. विसाव्या शतकात कोणत्या कारणांनी मुस्लीम लीगची स्थापना झाली. त्याचा तपास करण्यापेक्षा त्याचे किती चमत्कारिक परिणाम भारतीय सामाजिक जीवनावर झाले ते समजून घेणे महत्त्वाचे आहे. भौगोलिक फाळणी तर झालीच; पण भारतात एकत्र राहणाऱ्या हिंदू–मुस्लीमांची मने अजूनही पुरेशी सांधली गेली नाहीत. भारताची एकात्मता भारताच्या राजकारणाला व अर्थकारणाला चांगली कलाटणी देऊ शकेल असे निश्चितपणे सर्वांनाच वाटते. दुर्दैव हे आहे की अशी एकात्मता निर्माण करण्याचे काम फारसे होत नाही.

हे पुस्तक अशी एकात्मता घडवणाऱ्या भावनेचं जिवंत दर्शन आहे! पुस्तकाचे लेखक आहेत श्री. एम्. एन्. मसूद, प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा. मोइन शकीर, डॉ. आलम खुंदमिरी, प्रा. हाफीज मलीक, प्रा. एस्. ए. अन्सारी, प्रा. दिनकर बोरीकर, प्रा. एल्. एन्. देशपांडे व स्वत: श्री. गोविंदभाई श्रॉफ. श्री. मसूद हे मौलानांचे खाजगी चिटणीस व सौदी अरेबियातील भारताचे वकील आहेत. प्रा. मोइन शकीर औरंगाबाद येथे सरकारी कॉलेजमध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत. डॉ. खुंदमिरी हे उस्मानिया विद्यापीठातील रीडर, प्रा. हाफीज मलीक हे एन्. सिल्व्हानिया विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक, प्रा. अन्सारी, आझाद कॉलेज, औरंगाबाद तर प्रा. नरहर कुरुंदकर (नांदेड), प्रा. बोरीकर, प्रा. देशपांडे (सरस्वतीभुवन कॉलेज, औरंगाबाद) व श्री. श्रीपाद जोशी हे मराठी वाचकांच्या परिचयाचे लेखक आहेत. अशांना एकत्र आणण्याचे दुर्घट काम संपादकांनी केले आहे. ह्याकरता त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. मराठी वाचकांना, मुस्लीम समाजातील विद्वान, व्यासंगी व आधुनिक वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवून लेखन करणाऱ्या विचारवंतांचे लेखन वाचायला मिळणे ही एक पर्वणी आहे. मौ. आझाद ह्यांचे चरित्रही अजब आहे. १८८८ मध्ये मक्केत जन्म, १९०२ मध्ये कोवळ्या वयात कुराणावर प्रभुत्व व पत्रकारितेस सुरुवात, १९०५ मध्ये मध्य-आशियातील देशात तत्त्वज्ञानाचे विवेचन करण्याकरता दौरा, १९१२ पासून स्वातंत्र्यचळवळीत भाग, बंगाल ही कर्मभूमी, कांग्रेसमधील महत्त्वाच्या जागा, १९४२ ते १९४७ पर्यंत फाळणी टाळण्याकरता त्यांनी केलेले प्रयत्न, १९४७ नंतर घटनासमिती, संसद व मंत्रिमंडळ ह्यांमध्ये केलेले कार्य असा त्यांचा चरित्रविषयक भाग अनोखा तर आहेच; पण इस्लाममधील महजब व दीन ह्यामधील फरक स्पष्ट करणारी त्यांची सत्यशोधक दृष्टी, कुराणावरील नवे स्वत:चे भाष्य करण्याचे सामर्थ्य व धिटाई तसेच निखळ राष्ट्रवादी निष्ठा व अभिजात रसिकता असे अनेक पैलू ह्यातील लेखांनी स्पष्ट झाले आहेत. ह्यातील सर्वच लेख सुरेख वठले आहेत. सर्वच वाचनीय नव्हेत तर मननीय आहेत. पुस्तकाची छपाई चांगली झाली आहे; पण मुखपृष्ठ तितकेसे चांगले नाही. अर्थात हा वैयक्तिक आवडी-निवडीचा भाग आहे पुस्तकाचे शीर्षकही 'मौलाना आझाद– पुनर्मूल्यांकन' हे खटकते. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृतीमंडळाने ह्याच्या प्रकाशनासाठी अनुदान दिले आहे ते योग्यच आहे. ह्या पुस्तकाचा 'असर' हिंदू-मुस्लीम मनांवर होऊन हिंदू–मुस्लीम ऐक्य, नव्या विचारांनी सांधले गेले तर स्मारकसमितीला धन्यताच वाटेल. पुस्तकाची किंमत फक्त चार रुपये आहे. ❋



# वाचकांची पत्रे

स. न. वि. वि. ९ मे १९७५

अर्थच्या अंकाबद्दल आभार. सोबत अंकाची किंमत म्हणून तीन रुपयांची पोस्टाची तिकिटे ठेवीत आहे.

अंक चांगलाच आहे. तरीही तूर्त वर्गणीदार होत नाही याची क्षमा करावी. अर्थ उत्तरोत्तर अधिक वाचनीय होईल याविषयी मला शंका वाटत नाही.

आपल्या परवानगीने या अंकातल्या एक-दोन गोष्टींबद्दल एक सामान्य वाचक म्हणून लिहितो. प्रा. दाभोळकर ह्यांची मुलाखत समजायला सोपी आहे. विश्वविद्यालयाचा खर्च कितीही असो, कितीही वाढो तिथे उत्पन्न होणाऱ्या सेवांचे मूल्य जर तितक्याच किंवा जास्त प्रमाणात वाढत असेल तर तो अर्थ-व्यवहार फायद्याचाच म्हणायला हवा. सगळ्या मुलाखतीत या उत्पादित सेवांचा दर्जा, मूल्य किंवा अशाच दुसऱ्या संबद्ध गोष्टींविषयी उल्लेख आढळला नाही.

ओनॅसिस ह्यांच्यावरील स्फुटात त्यांनी 'निर्लज्जपणे' खर्च केला असे एक वर्णन आहे. त्यातला भाषाविषयक आणि इतरही औचित्यविचार सोडला तरी असे वैयक्तिक विचार-प्रदर्शन शास्त्रविचार करू पाहणाऱ्या नियतकालिकात कितपत शोभून दिसते अशी शंका मनाला चाटून गेली. उण्याअधिकाबद्दल क्षमा करावी. कळावे.

**विश्राम बेडेकर**
११ पोचखानवाला रोड, मुंबई २५

स. न. वि. वि. १२ मे १९७५

आपण पाठविलेला अर्थचा अंक मिळाला. अर्थ आता नवीन स्वरूपात निघत आहे ह्याचा मला अतिशय आनंद झाला. अशा प्रकारची अर्थसारखी मासिके आपल्या शाळा-कॉलेजांना हवीच आहेत. त्याची नितांत आवश्यकता होती. मी गेली २० वर्षे सतत आर्थिक विषयावर लिखाण करीत आहे. अर्थसाठी मी नियमितपणे जरूर लिहीन. दरमहा काही तरी पाठवेन. प्रा. परचुरे ह्यांना सादर प्रणाम. क. लो. अ.

**प्रा. वा. सी. काळे**
शिवाजी कॉलेज, सदस्य,
अमरावती, जिल्हा नियोजन मंडळ

प्रा. परचुरे ह्यांस, ३ मे १९७५
स. न. वि. वि.

महाराष्ट्र टाइम्सच्या ३ मेच्या अंकात आपण 'अर्थ' सुरू केल्याचे स्वागत-स्फुट वाचले. फार आनंद झाला. आपल्या 'मिनिअर्थशास्त्राच्या'बरोबरीने 'अर्थ' मासिकही लोकप्रिय होवो ही प्रार्थना. यानिमित्त मी माझ्या शुभेच्छा कळवतो. कै. वा. गो. काळे परंपरेचे कार्य आजही हवे आहे. नव्या भारतातील प्रगत महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक विकासाची व प्रगतीची चिंता यापुढेही आपण सापेक्षाने–परखड–सखोल विचारी मार्गदर्शक अशा लेखांनी घ्यावी हे मी आपणास सांगणे नकोच. अर्थचा एक जुना वाचक व हितचिंतक या नात्याने आपले शुभ चिंतून अर्थची भरभराट होवो असे इच्छितो. अस्तु. कळावे.

**वसु धोरे**
कार्लेकर बंगला, पुणे ४

प्रा. परचुरे ह्यांस, १३ मे १९७५
सप्रेम नमस्कार

परवा आपल्या नावाचा व कार्याचा उल्लेख महाराष्ट्र टाइम्समध्ये वाचण्यात आला. त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. आपण कागद व छपाई यांची तीव्र टंचाई असताना ज्या जिद्दीने अर्थ हे मासिक पुन्हा सुरू केले त्याबद्दल जेवढे कौतुक व ऋणनिर्देश करावा तेवढा अपुराच ठरेल. शक्य असल्यास व शिल्लक असल्यास अर्थचे मागील सर्व अंक वरील पत्त्यावर पाठवावेत. क. लो. अ.

**प्रा. रा. वा. गचके**
वाणिज्यविभागप्रमुख,
महाराष्ट्र उदयगिरी विद्यालय, उदगीर

स. न. १७ जून १९७५

आपल्या लोकप्रिय मासिक अर्थकरिता वर्गणीदार म्हणून आमच्या महाविद्यालयाची नोंदणी करावी.

**श्री. द. लडकोकर**
प्राचार्य, अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ

✻

# भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांचा सहभाग : पृष्ठ ८ वरून

| | | |
|---|---|---|
| **M. P.** | | |
| P. R. | 32·72 | 18·65 |
| No. of workers | 67·34 | 37·67 |
| **Maharashtra** | | |
| P. R. | 35·39 | 19·70 |
| No. of workers | 67·88 | 47·87 |
| **Orissa** | | |
| P. R. | 20·24 | 06·81 |
| No. of workers | 17·76 | 07·42 |
| **Punjab** | | |
| P. R. | 04·41 | 01·18 |
| No. of workers | 02·26 | 75 |
| **Rajsthan** | | |
| P. R. | 26·81 | 08·34 |
| No. of workers | 25·72 | 10·24 |
| **Tamilnadu** | | |
| P. R. | 27·93 | 15·09 |
| No. of workers | 46·86 | 30·75 |
| **Uttar Pradesh** | | |
| P. R. | 10·26 | 06·71 |
| No. of workers | 36·01 | 27·72 |
| **W. Bengal** | | |
| P. R. | 09·95 | 04·43 |
| No. of workers | 16·25 | 09·25 |

Source—Census of India 1971

**तक्ता क्र. २ : महिलाकामगारांची एकूण कामगारांतील गटशः टक्केवारी आणि प्रत्येक व्यवसायगटातील महिलाकामगारांची एकूण महिलाकामगारांमधील टक्केवारी.**

| प्रकार | श्रमिक संख्या हजारांमध्ये एकूण | श्रमिक संख्या हजारांमध्ये स्त्रिया | महिला कामगारांची एकूण कामगारांतील त्या गटातील टक्केवारी | एकूण महिला कामगार |
|---|---|---|---|---|
| **प्राथमिक क्षेत्र** (१ ते ४) | १,३०,८८५ | २५,९६७ | १९.८ | ८३.०० |
| १. शेती | ७८,१७६ | ९,२६६ | ११.९ | २९.६ |
| २. शेतमजुरी | ४७,४८९ | १५,७९४ | ३३.३ | ५०.५ |
| ३. दुग्ध, जंगले, मत्स्य, शिकार इ. फळबागा | ४,२९७ | ७८३ | १८.२ | २.५ |
| ४. खाणकाम | ९२३ | १२४ | १३.४ | .४ |
| **दुय्यम क्षेत्र** (५ अ ते ५ ब) | १७,०६८ | २,१९६ | १२.९ | ७.० |
| ५ अ–कारखाने, घरेलु उद्योग, प्रक्रिया इ. | ६,३५२ | १,३३१ | १८.४ | ४.२ |
| ५ ब–इतर उद्योग | १०,७१६ | ८६५ | ८.१ | २.८ |
| **तृतीय क्षेत्र** ( ६ ते ९ ) | ३२,४२० | ३,१३५ | ९.७ | १० |
| ६. बांधणी | २,२१६ | २०४ | ९.२ | .६ |
| ७. व्यापार-उदीम | १०,०३८ | ५५६ | ५.३ | १.८ |
| ८. वाहतूक, गुदामे, संदेशवाहन | ४,४०१ | १४६ | ३.३ | .५ |
| ९. इतर सेवा | १५,७६५ | २,२२९ | १४.१ | ७.१ |
| एकूण | १,८०,३७३ | ३१,२९८ | १७.३५ | १००.० |

संदर्भ–जनगणना १९७१ ( Economic Characteristics of population ) Selected Tables.

**तक्ता क्र. ३ : नोकरी न करणाऱ्या महिलांच्या कामाचे स्वरूप.**

( वय गट ०–१४ आणि १५–१९ )

( हजारांमध्ये )

| वय–गट | नोकरी न करणाऱ्या महिला संख्या टक्केवारी | पूर्ण वेळ विद्यार्जन | घरगुती कामे | आर्थिकदृष्ट्या अवलंबून |
|---|---|---|---|---|
| ०–१४ | १०७१,७२१ | १७२,१९० | १०९,३७५ | ७८८,२३३ |
| | १००% | १६.१% | १०.२% | ७३.५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५–१९ | १८८,७२२ | २७,७३० | १३९,७१६ | १९,८२० |
| | १००% | १४·७% | ७४·०% | १०·५% |
| ग्रामीण | | | | |
| ०–१४ | ८७०,९७३ | १०२,८४८ | ९८,०७८ | ६६८,६५० |
| | १००% | ११·८% | ११·३% | ७६·८% |
| १५–१९ | १४१,६४७ | १०,८०२ | ११५,२८८ | १४,७७७ |
| | १००% | ७·६% | ८१·४% | १०·४% |
| शहरी | | | | |
| ०–१४ | २००,७४८ | ६९,३४२ | ११,२९७ | ११९,५८३ |
| | १००% | ३४·५% | ५·६% | ५९·५% |
| १५–१९ | ४६,०७५ | १६,९२८ | २४,४२८ | ५,०४३ |
| | १००% | ३५·९% | ५१·८% | १०·७% |

संदर्भ–कोष्टक क्र. बी ३–जनगणना १९७१

**तक्ता क्र. ४ : कामानुसार महिला श्रमिकांचे वर्गीकरण.**
**( हजारांमध्ये )**

| प्रदेश | घरगुती कामे | | एकूण काम न करणाऱ्या महिला | |
|---|---|---|---|---|
| | पूर्ण वेळ | अर्ध वेळ | पूर्ण वेळ | अर्ध वेळ |
| भारत | १८४९ | ४४८ | ३३२५ | ५८० |
| टक्केवारी | ५५·६१ | ७७·२४ | १०० | १०० |
| उत्तर भारत | २२३ | ६३ | ३९८ | ८१ |
| टक्केवारी | ५६·०३ | ७७·७८ | १०० | १०० |
| दक्षिण भारत | ५१६ | २०८ | १०३५ | २५५ |
| टक्केवारी | ४९·८६ | ८१·५७ | १०० | १०० |
| पूर्व भारत | ७१२ | १०६ | १०७० | १३९ |
| टक्केवारी | ६६·५ | ७६·२ | १०० | १०० |
| पश्चिम भारत | ३९८ | ७१ | ८१९ | १०५ |
| टक्केवारी | ४८·६ | ६७·६ | १०० | १०० |

**तक्ता क्र. ५ : रोजगारविनिमयकेंद्रामधील नोंदणीच्या आधारे व शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणे काम न करणाऱ्या महिलांचे प्रमाण.**

| शैक्षणिक पातळी | | नोंदणीची टक्केवारी | नोंदणी न झालेल्यांचे प्रमाण | एकूण बेकार महिला (हजार) |
|---|---|---|---|---|
| १. निरक्षर | ग्रा | २·० | ९८·० | १८२४ |
| | ना | ५·० | ९५·० | २९६ |
| | ए | २·५ | ९७·५ | २१२० |
| २. साक्षर (मॅट्रिकच्या खाली) | ग्रा | ५·४ | ९४·६ | ७०८ |
| | ना | ११·० | ८९·० | ३९५ |
| | ए | ७·३ | ९२·७ | ११०३ |
| ३. मॅट्रिकच्या पुढे | ग्रा | ४६·१ | ५३·९ | २७१ |
| | ना | ४६·२ | ५३·८ | ३४४ |
| | ए | ४६·२ | ५३·८ | ६१५ |
| ४. पदवीधर | ग्रा | ४७·४ | ५२·६ | ३८ |
| | ना | ५५·३ | ४४·७ | १०३ |
| | ए | ५३·२ | ४६·८ | १४१ |
| ५. अनिर्देशित | ग्रा | ३३·३ | ६६·७ | ३ |
| | ना | – | १००·० | १ |
| | ए | २५·० | ७५·० | ४ |
| ६. एकूण | ग्रा | ७·८ | ९२·२ | २८४४ |
| | ना | २४·१ | ७५·९ | ११३९ |
| | ए | १२·४ | ८७·६ | ३९८३ |

ग्रा = ग्रामीण, ना = नागरी, ए = एकूण.

टेबल क्र. १६ – जनगणना १९७१

**तक्ता क्र. ६ : सुशिक्षित पुरुष व महिलांमधील बेकारीचे प्रमाण. ( हजारांमध्ये )**

| प्रकार | पुरुष | | स्त्रिया | |
|---|---|---|---|---|
| | एकूण उपलब्ध | त्यांपैकी बेकार | एकूण उपलब्ध | त्यांपैकी बेकार |
| १. इंजिनिअरिंग व टॅक्नॉलॉजी | २४६·२ | २९·४<br>११·९% | ३·५ | १·०<br>२७·०% |
| २. टेक्निकल व व्हेकेशनल ट्रेड | १८·५ | २·५<br>१३·५% | १·२ | ०·२७<br>२३·२% |
| ३. मानव्य / कला | ८४३·८ | १२४·०<br>१४·७% | २९६·१ | १३०·४<br>४४% |
| ४. वाणिज्य | १६८·० | २५·०<br>१४·९% | ३·९ | १·२<br>३१·१% |
| ५. विज्ञानशास्त्रे | ३६८·६ | ६४·१<br>१७·४% | ८१·८ | ३४·४<br>४२·१% |

# भ्रष्टाचाराचे वंगण संपले

भारताच्या राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्यांच्या धोरणासंबंधी निर्देशक तत्त्वे सांगितलेली आहेत. मूळ इंग्रजी शब्द 'डिरेक्टिव्ह' असा आहे. त्याचा अर्थ ती तत्त्वे केवळ शिफारसवजा नसून आज्ञार्थी आहेत. आरोग्याला हानिकारक असणारी मादक पेये व अमली पदार्थ यांना औषधाच्या उपयोगाशिवाय सेवन करण्यास बंदी करण्याचा राज्यांनी प्रयत्न करावयाचा आहे, असे ४७ व्या कलमात म्हटलेले आहे.

दारूसारखी मादक पेये व्यक्तींच्या आरोग्याला हानिकारक असतात, ह्याबद्दल दुमत होण्याचे कारणच नाही. बहुसंख्य लोक दारिद्र्यात जीवन कंठीत असताना त्यांना दारूचे व्यसन लागले, म्हणजे त्यांचे आरोग्य तर बिघडतेच; परंतु त्याचबरोबर त्यांचे कौटुंबिक जीवनही उध्वस्त होते आणि मुलाबाळांच्या विकासावर त्याचा अत्यंत घातक परिणाम होतो.

वैयक्तिक आरोग्याप्रमाणे सामाजिक आरोग्यही दारूमुळे बिघडते. दारूची सवय लागलेला मनुष्य ज्याच्याकडून दारू मिळू शकेल, अशाशीच संबंध ठेवू इच्छितो. दारू न पिणाऱ्या मित्रांना तो दूर लोटतो. दारू दिल्या–घेतल्याचे मित्रमंडळच त्याला आवडते.

एवढ्यावरही थांबत नाही. भ्रष्टाचाराला दारूची सवय पोषक होते. व्यवहारात कायदेशीर मार्गे मिळविलेल्या पैशांचे चलन खेळत असते, त्यात काळा पैसा वावरू लागला आणि कष्टाने कमविलेल्या पांढऱ्या पैशाशी काळा पैसा स्पर्धा करू लागला. काळ्या पैशाच्या चलनाचे पाठोपाठ दारूचे प्रवाही चलनही माजले. जी गोष्ट हजार रुपये करायला लावणार नाही, ती गोष्ट पंचवीस रुपयांच्या दारूचा अंमल सहज करायला लावतो; दारूची अपेक्षासुद्धा ताठ माणसाला लवचीक बनविते. ज्यांच्याकडून काही करून हवे असेल अशांना दारू दिली म्हणजे ते द्रवतात, अडवणूक करीत नाहीत, इतकेच नव्हे तर सदसद्विवेक बुद्धीला न पटणाऱ्या गोष्टीही करण्यास सहज प्रवृत्त होतात.

व्यापारी आणि कारखानदार ह्यांना आपली कामे सुकर करण्यासाठी दारूचा वापर करणे सोईचे वाटू लागले आणि तो वापर नित्याचा होऊन राहिला. ते आपल्या अधिकाऱ्यांना ह्या चलनाच्या वापराबाबत स्वातंत्र्य देऊ लागले; मद्यपान शिष्टसंमत झाले. तळे राखील तो पाणी चाखील, हे मग ओघाने आलेच. ह्या चलनाचे आकर्षण अमर्याद वाढून ज्याला ज्याला काही अधिकार आहे, असा प्रत्येक जण त्याची अपेक्षा बाळगू लागला.

ह्या चलनाची देवघेव काळ्या पैशाप्रमाणे छुप्या मार्गे होत नाही; क्लब, हॉटेल्स इत्यादी ठिकाणी ती राजरोस चालू असते. कारण, दारू पिण्यात कमीपणा नसून न पिण्यात भ्याडपणा आहे, असे मानण्यापर्यंत आर्थिक क्षेत्रातील नेत्यांची मजल गेली.

दारू आणि भ्रष्टाचार ह्यांचा फार घनिष्ठ संबंध आहे. केवळ गंमत म्हणून चारचौघा मित्रांनी दारू पिऊन आनंद उपभोगणे वेगळे आणि दारू देणाऱ्याचा विशिष्ट उद्देश माहीत असूनही दारूच्या आहारी जाऊन सुनीतिपथ सोडून त्याचा उद्देश सफल करणे वेगळे. हा दारू देणारा ओळखीचाही नसला तरी चालतो. दारू महत्त्वाची; देणारा हा फुकट पाजतो म्हणून त्याचे काम करून द्यावयाचे, दारूसाठी अडवावयाचे, असा हा व्यवहार असतो.

गुरुवार, दि. २ ऑक्टोबरपासून अंमलात आलेली बारा कलमी उपाययोजना सबंध देशात संपूर्ण दारूबंदी आणण्याच्या पूर्वतयारीचे पहिले पाऊल आहे. त्यातील एका कलमान्वये हॉटेल्स, वसतिगृहे, क्लब्स आणि स्वागत समारंभ ह्या ठिकाणच्या मद्यपानास बंदी घालण्यात आली आहे. व्यापारी करारमदार, बोलणी, सौदे, कामे करण्यासाठी द्यावयाच्या पैशाचे छुपे व्यवहार, भ्रष्टाचाराच्या, योजनांची आखणी इत्यादींसाठी फर्म्सचे अधिकारी हॉटेल्स आणि क्लब्स ह्यांचा सर्रास उपयोग करीत असत. चलनी नोटांपेक्षा दारूच्या पेल्याचे आकर्षण जास्त असते; सर्व चलनी नोटा सारख्याच असतात; पण वेगवेगळ्या दारूची लज्जत वेगवेगळी असते आणि त्या लज्जतीच्या तृप्तीने मनुष्य तात्काळ विरघळून, अनिष्ट सहकार्यही करण्यास तयार होतो. सरकारी कर्मचाऱ्यांना सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करण्यास बंदी करण्यात आली आहे. अशा रीतीने, भ्रष्टाचाराला उद्युक्त करणाऱ्या हानिकारक चलनाची प्रतिष्ठा काढून घेऊन हकालपट्टी करण्यात आली आहे. भ्रष्टाचाराचे अड्डेच मोडल्यामुळे आर्थिक क्षेत्रातील वातावरण शुद्ध होण्यास मोठीच मदत होईल असे वाटते.

- श्री.पा.वाळे

सत्यशिवसुंदर प्रकाशनाच्या मालकीचे हे मासिक संपादक प्रा. कमलाकर परचुरे ह्यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून ९०६ शिवाजीनगर, पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.

# ‘ अर्थ ’चा डिसेंबर अंक

‘ केन्सनंतरच्या अर्थशास्त्रज्ञांचे रोजगारविषयक सिद्धांतावरील विचार ’
ह्या विषयावर

## प्रा. नी. वि. सोवनी ह्यांचा निबंध

( प्रत्येक कॉलेजमधील अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाने संग्रही ठेवावा असा हा निबंध आहे. )

## हायर सेकंडरी अर्थशास्त्र : अध्यापन : मार्गदर्शनपर लेखमाला

**प्रा. मुकुंद महाजन, मॉडर्न कॉलेज, पुणे.**

हायर सेकंडरीच्या अध्यापक व विद्यार्थ्यांना उपयुक्त होण्याच्या दृष्टीने अर्थशास्त्रावरील अभ्यासक्रमाच्या आधारे वस्तुनिष्ठ प्रश्न ( Objective Questions ) कसे विचारावे तसेच त्यांची उत्तरे कोणत्या पद्धतीने लिहावीत ह्यांचे मार्गदर्शन देणारी, तसेच अभ्यासक्रमातील अडचणी सोडवण्याकरिता अध्यापकांना सल्ला देणारी, एक लेखमाला डिसेंबरच्या अंकापासून नियमितपणे सुरू करीत आहेत. हायरसेकंडरी विद्यालयांनी आपली मागणी नोंदवावी.

---

## जाहिरातीचा मजकूर – ( सूचनांसकट )

# संपादक ‘ अर्थ ’ मासिक

## १०६ शिवाजीनगर, पुणे ४


ह्यांजकडे दि. २९ ऑक्टोबरपर्यंत पोचता करावा.

**जाहिरातीचे दर –**

कोणतेही पूर्ण पान ३०० रु.
,, अर्धे पान १२५ रु.
,, पाव पान ७५ रु.

वितरकांमार्फत जाहिरात पाठविताना ब्लॉक्स इ. साहित्य पाठवावे.

अशा वाचनीय व संग्रहणीय अंकात, कृपया आपली जाहिरात करावयास विसरू नका.


दैन्य सरावे हास्य फुलावे ।
सुख प्राप्तीने साकारावे ॥
हीच प्रार्थना हा संकल्प ।
दीपावलीचा आशादीप ॥
समाजातील आर्थिक दृष्टया
दुर्बल घटकांचे जीवनमान
सुधारावे ही नव्या आर्थिक
कार्यक्रमाची प्रेरणा. याच
जाणीवेने ग्रामीण भागातील
शेतकरी व कारागीर यांना
सदैव मदतीचा हात देत
आलेली बँक ...
M M M
M B
बँक ऑफ महाराष्ट्र
११७७, बुधवार पेठ पुणे-४११ ००२
ही दिवाळी सर्वांना सुख समृध्दीची जावो